# अर्थसंवाद

खंड ४ * अंक ४ * जानेवारी–मार्च १९८१

आर्थिक अभिवृद्धी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची करव्यवस्था

अर्थ शब्दाची वाट पाहे

अर्थशास्त्राची मूलतत्त्वे

अर्थशास्त्रीय अधिवेशने

ग्रंथ-परीक्षण

पत्रव्यवहार

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये । शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

# अर्थसंवाद


जानेवारी – मार्च १९८१

खंड ४ : अंक ४



प्रमुख संपादक : आनंद नाडकर्णी

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता

आनंद नाडकर्णी

अ-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी

६१ अ/९-१० एरंडवणा

पुणे ४११ ००४.

व्यवस्थापकीय पत्ता

रवींद्र सबनीस

कार्यवाह

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई ४०० ०१४.



'मराठी अर्थशास्त्र परिषदे'च्या सभासदांना 'अर्थसंवाद' हक्काने मिळेल.

इतरांसाठी :

वार्षिक वर्गणी : रु. २५/-

सल्लागार मंडळ

**नी. वि. सोवनी**

**वि. वि. बोरकर**

**स. ह. देशपांडे**

**रवीन्द्र दोशी**

साहाय्यक संपादक

**रमेश पानसे**

## या अंकात


१. आर्थिक अभिवृद्धी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार २०२

**भ. ग. बापट**

२. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची करव्यवस्था २३७

**रमेश पानसे**

३. अर्थ शब्दाची वाट पाहे परिभाषा-चर्चा २४८

**सुरेश्वर गोस्वामी**

४. अर्थशास्त्राची मूलतत्त्वे २५४

५. अर्थशास्त्रीय अधिवेशने १९८० २६६

**आनंद नाडकर्णी**

६. ग्रंथ-परीक्षण २७०

**शिवकुमार खोबरे**

७. पत्रव्यवहार २७२

**स. श्री. मुतालिक-देसाई**
**आणि सं. रा. दास्ताने**
**त्र. श्री. पटवर्धन**



आभार

(१) अर्थसंवाद प्रकाशनासाठी **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** आणि **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांच्याकडून अनुदान मिळाले आहे. आम्ही या दोन संस्थांचे आभारी आहोत.

(२) मुखपृष्ठावरील चित्र तयार करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीविषयी सल्ला दिल्याबद्दल **डॉ. अनिल अवचट** यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

# आर्थिक अभिवृद्धी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार
## ( Economic Growth and International Trade )

भ. ग. बापट

[ १ ]

आर्थिक अभिवृद्धी ( economic growth ) चे देशाच्या व्यापार अटी किंवा व्यापार मूल्यतुल्यता दरांवर ( terms of trade ) होणाऱ्या परिणामांविषयीचे विश्लेषणात्मक लिखाण ही अलीकडील काळातील, विशेषत: गेल्या पावशतकातील, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात पडलेली एक उल्लेखनीय भर आहे. पूर्वसूरींच्या लिखाणात निरनिराळ्या तात्कालिक प्रश्नांच्या संदर्भात हा विषय येऊन गेलेला दिसतो. मिल, एजवर्थ, बॅस्टॅबल, ओलिन इत्यादींच्या लिखाणात वरील विषयाची आनुषंगिक चर्चा आढळते. पण सार्वत्रिक समतोलाच्या विश्लेषणाची पद्धती ( tools of general equilibrium analysis ) वापरून आर्थिक अभिवृद्धीच्या प्रक्रियेचे देशाच्या विदेश व्यापार विभागांवर होणाऱ्या परिणामांची सखोल चर्चा, वर म्हटल्याप्रमाणे, गेल्या पावशतकातच झालेली आहे. सर जॉन हिक्स[1] यांच्या १९५३ च्या ऑक्सफर्डमधील व्याख्यानापासून प्रस्तुत विषयावरील चर्चा प्रकर्षाने झालेली आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पहिल्या दहा वर्षांत दोन महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा प्रामुख्याने होत होती. एक म्हणजे सर्वच देशांना ( अमेरिका सोडून ) भेडसावणारा 'डॉलर चणचणीचा' ( dollar-shortage ) प्रश्न, आणि दुसरा प्रश्न म्हणजे केवळ अन्नधान्ये आणि कच्चा माल निर्यात करणाऱ्या देशांना मिळणाऱ्या व्यापार मूल्यतुल्यता दरामधील दीर्घकालीन घसरण ( secular deterioration in

१. पाहा, J. R. Hicks, " An Inaugural Lecture", *Oxford Economic Papers*, Vol. 2. (June 1953), पृष्ठे ११७–२५. थोड्याशा संक्षेपाने हा लेख "The Long-Run Dollar Problem" या मथळ्याखाली, अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशनच्या Richard E. Caves and Harry G. Johnson यांनी संपादित केलेल्या Readings in International Economics, George Allen and Unwin, London, 1968, या लेखसंग्रहात आलेला आहे. पाहा पृष्ठे ४४१–५४. हिक्स यांचे या संबंधातील सुधारित विचार त्यांच्या Essays on World Economics, Clarendon Press, 1959, या ग्रंथात आलेले आहेत. पाहा पृष्ठे २५५–५९.

terms of trade ). राऊल प्रेबिश[२] यांनी आपल्या परिणामकारक विश्लेषणामधून सर्वच विकसनशील राष्ट्रांशी संबंधित अशा या प्रश्नावर तज्ज्ञांचे लक्ष वेधले.

वरीलपैकी डॉलर चणचणीच्या प्रश्नाने प्रमुख अर्थशास्त्रज्ञांना खूपच आकर्षित केलेले दिसते. डॉलर चणचणीच्या प्रश्नावर इतकी चर्चा झाली की पुढे डॉलर चणचण दूर होऊन प्रत्यक्षात डॉलर अतिरिक्ततेचा ( dollar glut ) प्रश्न निर्माण झाला तरी काही काळ डॉलर चणचणीच्या प्रश्नाची चर्चा पूर्वीइतक्याच हिरिरीने चालू राहिली. दुसऱ्या महायुद्धानंतर असा एक समज दृढमूल झाला होता की युद्धजन्य विपन्नावस्थेतून बाहेर पडण्यासाठी युरोपीय आणि इतर राष्ट्रांना अमेरिकेसारख्या अग्रगण्य राष्ट्रावरच अवलंबून राहावे लागणार होते आणि इथेच खरी अडचण होती. अमेरिकेकडून आर्थिक पुनर्रचनेसाठी (reconstruction) साधनसामग्री आयात करावयाची तर त्यासाठी लागणारे डॉलर चलन कोठून आणायचे ? अमेरिकेकडे निर्यात वाढवली गेली तरच इतर देशांना डॉलर चलन उपलब्ध होणार होते. पण युद्धोत्तर परिस्थिती अशी होती की युरोपीय देशांना मोठ्या प्रमाणात आयातीची गरज होती तर त्याउलट त्या देशांची निर्यातशक्ती युद्धकालीन नुकसानीमुळे कमकुवत झाली होती. तुलनेने अमेरिकेची निर्यातशक्ती प्रचंड होती तर तिची आयात गरज खूपच कमी होती. डॉलर चणचणीच्या प्रश्नाचे हे खरे स्वरूप होते. तत्कालीन परिस्थितीत प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष या प्रश्नाकडे वळणे साहजिकच होते. या प्रश्नाची विविध अंगांनी चर्चा त्यामुळेच होत होती.

याच संदर्भात सर जॉन हिक्स यांनी आपल्या पूर्वोक्त व्याख्यानात एक मौलिक विचार मांडला. त्यांचे म्हणणे असे की अमेरिकेतील तंत्रज्ञानामधील संशोधन हे आयात-पर्यायी उद्योगांत ( import-competing industries ) प्रामुख्याने प्रभावकारी ठरत आहे. हिक्स यांच्या म्हणण्यानुसार अमेरिकेतील नवोपक्रम ( innovations ) मुख्यतः आयात-अभिनत ( import-biased ) म्हणजे आयात वस्तूंचे देशांतर्गत उत्पादन वाढवणाऱ्या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे अमेरिकेचे इतर देशावरील आयात-अवलंबन ( import dependence ) कमी होते. याचाच परिणाम म्हणून इतर देशांची अमेरिकेकडे होणारी निर्यात कमी होते आणि त्यांच्या पुढे डॉलर चलनाच्या चणचणीचा प्रश्न उभा ठाकतो.

हिक्स यांनी डॉलर चणचणीच्या प्रश्नाचे स्वरूप निरनिराळ्या अर्थव्यवस्थांमधील तांत्रिक प्रगतीच्या दिशेच्या अनुरोधाने केले आणि त्या अनुषंगाने जी सैद्धांतिक मांडणी केली त्यापासूनच आर्थिक अभिवृद्धी आणि तिचे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम यासंबंधीची चर्चा सुरू झाली.

कॉर्डेन यांनी म्हटल्याप्रमाणे " अमेरिकेतील आयात-अभिनत स्वरूपाच्या तांत्रिक प्रगतीमधून इतर देशांच्या व्यापार-अटींवर होणाऱ्या विपरीत परिणामांच्या हिक्स यांनी केलेल्या मांडणीतूनच शास्त्राची भरीव प्रगती झालेली आहे."[३] त्यानंतर मात्र प्रामुख्याने हॅरी जॉन्सन[४], कॉर्डेन[५], फिन्डले

२. Raul Prebisch, " Commercial Policy in Underdeveloped Countries ", *American Economic Review Proceedings*, Vol. 49, May 1959, pp. 251-273.

३. W. H. Corden, " Economic Expansion and International Trade — A Geometric Approach ", *Oxford Economic Papers*, Vol. 8, 1956, pp. 223-228.

४. Harry G. Johnson, " International Trade and Economic Growth ", George Allen and Unwin, London ( 1958 ), Chap. 3; शिवाय H. G. Johnson, " Economic Development and International Trade ", in Readings in International Economics, edited by R. E. Caves and H. G. Johnson, Richard D. Irwin, 1968, pp. 281-299.

५. W. H. Corden, Op. Cit.

आणि ग्रूबर्ट[७], जगदीश भगवती[८] इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी या विषयाची खूपच सखोल आणि सविस्तर मांडणी केली.

[ २ ]

## आर्थिक अभिवृद्धीचे वर्गीकरण

आर्थिक अभिवृद्धी म्हणजे अर्थव्यवस्थेच्या उत्पादनक्षमतेतील वाढ. एखाद्या अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता आपण ढोबळपणे उत्पादन शक्यता वक्राने ( production possibility curve ) दर्शवतो. आर्थिक अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेचा उत्पादन शक्यता वक्र ( उश वक्र ) उजवीकडे आणि वर सरकेल. याचाच अर्थ अभिवृद्धीमुळे आपल्या प्रतिमानात ( क्ष आणि य या दोन वस्तूंच्या संदर्भात ) क्ष आणि य या वस्तूंचे उत्पादन वाढेल. अभिवृद्धीमुळे वरील वस्तूंच्या उत्पादनातील बदलानुसार उश वक्र बदलेल.

आपण य ही आयात वस्तू ( import good ) आणि क्ष ही निर्यात वस्तू ( export good ) मानू. अभिवृद्धीमुळे आयात आणि निर्यात वस्तूंच्या उत्पादनात वाढ होईल. अभिवृद्धीमुळे जशी उत्पादनात वाढ होते तशी उत्पन्नातही वाढ होते. साहजिकच अभिवृद्धीमुळे आयात-निर्यात वस्तूंच्या मागणी व पुरवठ्यातील बदलानुसार देशाच्या आर्थिक स्वयंपूर्णतेवर परिणाम होईल. अभिवृद्धीमुळे देश जसा अधिक स्वयंपूर्ण होण्याची शक्यता असते त्याप्रमाणे त्याचे आयात अवलंबन ( import dependence ) वाढण्याचीही शक्यता असते. याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापारात देशाला मिळणाऱ्या व्यापार अटी किंवा व्यापार मूल्यतुल्यता दर ( terms of trade ) सुधारण्याची किंवा घसरण्याची शक्यता असते. आर्थिक अभिवृद्धीचा देशाच्या व्यापार दरावर होणारा परिणाम म्हणूनच जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

याद्दष्टीने अभिवृद्धीचे खालील प्रकार कल्पिता येतील :

( १ ) व्यापार अनुकूल अभिवृद्धी ( pro-trade growth ). या प्रकारच्या अभिवृद्धीमुळे य या आयातवस्तूच्या मागणीतील वाढ आणि क्ष या निर्यातवस्तूच्या पुरवठ्यातील वाढ एकूण उत्पादनवाढीच्या प्रमाणापेक्षा अधिक असते.

( २ ) अविकारी अभिवृद्धी ( neutral growth ). या प्रकारच्या अभिवृद्धीत आयात वस्तूच्या मागणीतील वाढ आणि निर्यात वस्तूच्या पुरवठ्यातील वाढ उत्पादनातील वाढीच्या प्रमाणाइतकी असते.

( ३ ) व्यापार प्रतिकूल अभिवृद्धी ( anti-trade growth ). या प्रकारात आयात वस्तूच्या मागणीतील वाढ आणि निर्यात वस्तूच्या पुरवठ्यातील वाढ उत्पादनातील वाढीपेक्षा कमी प्रमाणात असते.

वरील तीन मुख्य प्रकाराव्यतिरिक्त आणखीही दोन प्रकार कल्पिता येतात. ते म्हणजे :

( ४ ) व्यापार अति-अनुकूल अभिवृद्धी ( ultra-pro-trade growth ). या प्रकारात राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीपेक्षा अधिक भाग आयात वस्तूवर ( य ) खर्च केला जातो आणि देशांतर्गत वस्तूच्या ( क्ष ) मागणीत केवळ घट ( absolute fall ) होते. साहजिकच या प्रकारच्या अभिवृद्धीमुळे देशाचे आयात अवलंबन वाढते.

---

७. Ronald Findlay and H. Grubert, " Factor Intensities, Technological Progress and the Terms of Trade", *Oxford Economic Papers*, Vol. 11, 1959, pp. 111 - 121.

८. Jagdish Bhagwati, "International Trade and Economic Expansion", in International Trade, edited by J. Bhagwati, Penguin, 1969, pp. 311-336.

( ५ ) व्यापार अति-प्रतिकूल वाढ ( ultra-anti-trade growth ). या प्रकारात वाढीव राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अधिक खर्च देशांतर्गत वस्तूवर ( क्ष ) खर्च होतो आणि आयात वस्तूच्या ( य ) मागणीत केवल घट ( absolute fall ) होते. साहजिकच या प्रकारच्या अभिवृद्धीमुळे देशाचे आयात अवलंबन कमी होते, म्हणजे देश स्वयंपूर्णतेकडे झुकतो.

**अभिवृद्धी आणि व्यापार मूल्यतुल्यता दर**

वरीलपैकी अभिवृद्धीच्या पहिल्या चार प्रकारांत, **स्थिर व्यापार अटींच्या परिस्थितीत,** अभिवृद्धी होत असलेल्या देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात घसरण ( deterioration in terms of trade ) होते. याउलट पाचव्या म्हणजे व्यापार अति-प्रतिकूल अभिवृद्धीच्या परिस्थितीत व्यापार मूल्यतुल्यता दरात सुधारणा ( improvement in terms of trade ) होते.

अभिवृद्धीच्या पहिल्या चार प्रकारात, स्थिर व्यापार अटींच्या परिस्थितीत, अभिवृद्धी होत असलेल्या देशात ( अ हा देश ) आयात वस्तूच्या ( य ) मागणीत आणि निर्यात वस्तूच्या ( क्ष ) पुरवठ्यात केवळ वाढ ( absolute rise ) होते. दुसऱ्या देशात ( ब देश ) अभिवृद्धी होत नाही असे मानले तर त्या देशाच्या आयात वस्तूला ( क्ष ) असलेल्या मागणीत किंवा निर्यात वस्तूच्या ( य ) पुरवठ्यात काहीही बदल होणार नाही. याचाच अर्थ अभिवृद्धीपूर्व संतुलित व्यापार अटींच्या ( equilibrium terms of trade) परिस्थितीत, एकाच देशात ( अ देशात ) अभिवृद्धी होत असेल तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अ देशाच्या आयात वस्तूसाठी ( य ) अतिरिक्त मागणी ( excess demand for importables ) निर्माण होते. त्याच-प्रमाणे निर्यात वस्तूचा ( क्ष ) अतिरिक्त पुरवठा ( excess supply of exportables ) निर्माण होतो. परिणामतः अ देशाच्या आयात वस्तूची किंमत वाढते तर निर्यात वस्तूची किंमत कमी होते, म्हणजेच

$$\frac{\text{निर्यात वस्तू किंमत } ( क_{क्ष} )}{\text{आयात वस्तू किंमत } ( क_{य} )}$$

हे गुणोत्तर घसरते, म्हणजेच

$$\left(\frac{क_{क्ष}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीपूर्व}} > \left(\frac{क_{क्ष}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीनंतर}}$$

अशी परिस्थिती निर्माण होते. याचाच अर्थ अभिवृद्धी होत असलेल्या देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात घसरण ( deterioration ) होते.

याउलट पाचव्या म्हणजे व्यापार अति-प्रतिकूल अभिवृद्धीच्या परिस्थितीत अभिवृद्धी होत असलेल्या देशाच्या आयात वस्तूच्या ( य ) मागणीत व निर्यात वस्तूच्या ( क्ष ) पुरवठ्यांत केवल घट ( absolute fall ) होते. साहजिकच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अ देशाच्या निर्यात वस्तूसाठी ( क्ष ) अतिरिक्त मागणी निर्माण होते तर आयात वस्तूचा ( य ) अतिरिक्त पुरवठा निर्माण होतो. परिणामतः अ देशाचे

$$\frac{\text{निर्यात वस्तू किंमत } ( क_{क्ष} )}{\text{आयात वस्तू किंमत } ( क_{य} )}$$

हे गुणोत्तर वाढते. म्हणजेच


$$\left(\frac{क_{क्ष}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीपूर्व}} < \left(\frac{क_{क्ष}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीनंतर}}$$

अशी परिस्थिती निर्माण होते. म्हणजेच अभिवृद्धी होत असलेल्या देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात सुधारणा ( improvement ) होते.

खालील तक्त्यात अभिवृद्धीतील अभिनती ( biases in growth ) आणि व्यापार मूल्यतुल्यता दर यामधील संबंध दाखवला आहे.

| अभिनती | व्यापार मूल्यतुल्यता दरांतील बदलाची दिशा : ( – ) घसरण, ( + ) सुधारणा |
|---|---|
| अविकारी ( Neutral ) | ( – ) |
| व्यापार-अनुकूल ( pro-trade ) ( अ ) | ( – ) |
| व्यापार-प्रतिकूल ( anti-trade ) ( प्र ) | ( – ) |
| व्यापार अति-अनुकूल ( ultra-pro-trade ) ( अअ ) | ( – ) |
| व्यापार अति-प्रतिकूल ( ultra-anti-trade ) ( अप्र ) | ( + ) |

अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादन सीमा वाढते, त्याप्रमाणे त्या देशाचा देयता वक्रही ( offer curve ) बदलतो. दिलेल्या आयात वस्तूच्या ( य ) बदल्यात तो देश निर्यात वस्तूची ( क्ष ) जी राशी देण्यास राजी असतो ती माहिती देयता वक्राने दिली जाते. अभिवृद्धीमुळे आयात व निर्यात वस्तूच्या देशांतर्गत उत्पादनात जसा बदल घडतो त्यानुसार देशाच्या देयता वक्रामध्येही साहजिकच बदल घडतो. अशा बदलामुळे देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर कोणत्या परिस्थितीत घसरतो किंवा सुधारतो हे खालील आकृतीने दाखवले आहे.




( आकृती क्र. १ )
**अभिवृद्धीचा व्यापार मूल्यतुल्यता दरावरील परिणाम**

आकृती १ मध्ये अब हा ब देशाचा देयता वक्र आहे. अअ हा अ देशाचा देयता वक्र आहे. य आणि क्ष या अनुक्रमे अ देशाच्या आयात आणि निर्यात वस्तू आहेत. अअ आणि अब हे एकमेकांस इ या बिंदूत छेदतात. इ बिंदूने दोन देशांतील व्यापार समतोल (आयात = निर्यात) दाखवला आहे. अइ ही इ रेषा व्यापार मूल्यतुल्यता दर ( terms of trade ) दर्शवते.

आता असे मानू की, अ देशात आर्थिक अभिवृद्धी होत आहे तर ब देशात कोणताही बदल होत नाही. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे अ च्या आर्थिक अभिवृद्धी-बरोबर अ चा आंतरराष्ट्रीय व्यापारातील देयता वक्र बदलेल. अभिवृद्धीनंतरच्या देयता वक्राचे स्थान अभि-

वृद्धीच्या अभिनतीवर ( bias ) अवलंबून असते. आकृतीमधील अअ[1], अअ[2], अअ[3], अअ[4] हे देयता वक्र आहेत. अअ[1] हा देयता वक्र व्यापार-अति-प्रतिकूल ( ultra-anti-trade ) अभिवृद्धी दर्शवतो. तर दुसरे देयता वक्र अनुक्रमे व्यापार-प्रतिकूल, अविकारी आणि व्यापार-अनुकूल अभिवृद्धी दर्शवतात. आकृतीवरून हे स्पष्ट होते की केवळ व्यापार-अति-प्रतिकूल ( ultra-anti-trade ) अभिवृद्धीच्या परिस्थितीतच व्यापार अटीमध्ये किंवा व्यापार मूल्यतुल्यता दरात सुधारणा होते. याठिकाणी व्यापार समतोल इ[1] या बिंदूने दर्शवलेला आहे. अइ[1] ही व्यापार मूल्यतुल्यता दर दर्शवणारी रेषा काढली असता ती अइ च्या डावीकडे आहे. यावरून

∵ अइ[1] रेषेची प्रवणता > अइ रेषेची प्रवणता
( slope ) ( slope )

$$\therefore \left(\frac{क_{अ}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीनंतर}} > \left(\frac{क_{अ}}{क_{य}}\right)_{\text{अभिवृद्धीपूर्व}}$$

म्हणजेच व्यापार मूल्यतुल्यता दरात सुधारणा होते.

इ[2], इ[3], इ[4] या बिंदूंनी दाखवलेल्या व्यापार समतोलात अ देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर घसरल्याचे स्पष्ट होते. अइ[2], अइ[3], अइ[4] या व्यापार अटी दर्शविणाऱ्या रेषा काढल्या असता त्या अइच्या उजवीकडे असल्यामुळे त्यांची प्रवणता अइ पेक्षा कमी आहे. म्हणजेच व्यापार मूल्यतुल्यता दर घसरल्याचे स्पष्ट होते.

### अभिवृद्धीचे दोन परिणाम : उत्पादन परिणाम आणि उपभोग परिणाम


आर्थिक अभिवृद्धीचा आपण येथवर स्थूलमानाने विचार केला. अभिवृद्धीचा अर्थव्यवस्थेच्या व्यापार अटींवर कोणता परिणाम होतो हे पाहिले, तो कसा होतो आणि कोणत्या परिस्थितीत होतो तेही पाहिले. आता यासंबंधी थोडा अधिक विचार करू.

आर्थिक अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेतील वस्तूंच्या उत्पादनात (पुरवठ्यात) जसा बदल पडतो तसा वस्तूंच्या मागणीतही बदल होतो. अभिवृद्धीबरोबर वाढणाऱ्या उत्पन्नामुळे मागणीत वाढ होते. मागणीतील वाढ अर्थातच सर्व वस्तूंसाठी सारखीच असेल असे नाही. काही वस्तूंची मागणी जास्त वाढेल तर काहींची कमी प्रमाणात वाढेल, किंवा मुळीच वाढणार नाही, किंवा ( ती वस्तू जर inferior वस्तू असेल तर ) पूर्वीपेक्षा कमी होईल. आपल्या प्रतिमानाच्या संदर्भात असे म्हणता येईल की अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेतील आयात व निर्यात वस्तूंची मागणी व त्यांचा पुरवठा बदलतो आणि त्यानुसार अभिवृद्धीची अभिनती ( bias in growth ) ठरते. याचाच अर्थ अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेवर व त्यातून देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावर होणारा परिणाम उपभोग ( मागणी ) आणि उत्पादन यांवर होणाऱ्या परिणामावरून ठरतो. म्हणजे अभिवृद्धीचा परिणाम हा उत्पादन आणि उपभोग परिणामाचा संकुलित परिणाम ( total effect ) असतो. प्रथम आपण उपभोग परिणामाचा ( consumption effect ) विचार करू.

### उपभोग परिणाम

आकृती २ मध्ये आपल्या प्रतिमानातील अर्थव्यवस्थेच्या समतोलाची परिस्थिती दर्शविली

आहे. त्यात तत हा उश वक्र आहे. कल ही आंतरराष्ट्रीय किंमत रेषा, $\left(\frac{क_{क्ष}}{क_{य}}\right)$, म्हणजेच व्यापार-मूल्यतुल्यता दर दर्शवणारी रेषा (terms of trade line) आहे. प बिंदूने उत्पादन समतोल दर्शवलेला आहे. ( प बिंदूपाशी उश वक्राची प्रवणता व्यापार मूल्यतुल्यता दर दर्शवणाऱ्या रेषेच्या प्रवणते बरोबर आहे.) र बिंदूने उपभोगातील समतोल दाखवला आहे. ( किंमत रेषा आणि समवृत्ती वक्र यांच्या स्पर्शबिंदूने उपभोगातील समतोल दाखवला जातो. येथे समवृत्तीवक्र काढलेला नाही ). आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे रन इतकी य वस्तूची आयात केली जाते तर त्याच्या बदल्यात नप इतकी क्ष वस्तूची निर्यात केली जाते. आपणास हे माहीतच आहे की,





( आकृती क्र. २ )
**व्यापार समतोल**

व्यापार मूल्यतुल्यता दर

$$= \frac{रन}{नप} = \frac{निर्यात\ वस्तू\ किंमत}{आयात\ वस्तू\ किंमत} = \frac{क_{क्ष}}{क_{य}}.$$

आकृती ३ मध्ये उपभोगातील समतोलाची परिस्थिती दर्शविली आहे. या ठिकाणी र हा उपभोग बिंदू आहे. आता आपण असे मानू की अर्थव्यवस्थेत अभिवृद्धी झाली आहे. म्हणजेच उश वक्र उजवीकडे सरकला आहे. आपण असे मानू की अभिवृद्धी होत असलेल्या देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर स्थिर आहे. ही गोष्ट कल रेषेस क$^{1}$ल$^{1}$ ही समांतर रेषा काढून दाखविली आहे. अभिवृद्धीनंतर उपभोग बिंदू बदलतो असे आपण पूर्वी पाहिले आहे. नवा उपभोग बिंदू क$^{1}$ल$^{1}$ रेषेवर असेल. नव्या उपभोग बिंदूच्या स्थानावरून आपणास अभिवृद्धीतील अभिनती ( bias in growth ) कोणत्या प्रकारची आहे ते कळू शकते.

आकृती ३ मध्ये अभिवृद्धीपूर्व उपभोग र बिंदूने दर्शविला आहे. अभिवृद्धीनंतर अर्थव्यवस्थेचा उपभोग बिंदूही बदलेल. नवीन परिस्थितीत उपभोग बिंदू र$^{1}$, र$^{2}$, र$^{3}$ याप्रमाणे कोणताही असू शकेल. अभिवृद्धीनंतर मागणी कशी बदलते त्यावर उपभोग बिंदूचे स्थान ठरते. अभिवृद्धीमुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढते आणि त्यामुळे वस्तूंची मागणीही बदलते हे आपण पूर्वीच पाहिले आहे. अभिवृद्धीमुळे आयात वस्तूच्या मागणीतही फरक पडेल. त्याप्रमाणे देशाचे आयात-




( आकृती क्र. ३ )
**अभिवृद्धीचे उपभोग परिणाम**

अवलंबनही ( import dependence ) वाढेल, कमी होईल किंवा तेवढेच राहील. त्यावरून अभिवृद्धीमुळे होणारा उपभोग परिणाम ( consumption effect ) व्यापार-अनुकूल, व्यापार-प्रतिकूल किंवा अविकारी यांपैकी कोणत्या स्वरूपाचा आहे ते ठरवता येते.

या ठिकाणी आपणास सीमांत उपभोग प्रवृत्ती ( marginal propensity to consume ) आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती ( average propensity to consume ) या दोन संकल्पना वापरून उपभोग परिणाम कोणत्या प्रकारचा आहे ते अधिक स्पष्ट करता येईल. त्याचप्रमाणे आयात वस्तूंच्या मागणीच्या उत्पन्न लवचिकतेची ( income elasticity of demand for importables ) कल्पनाही वापरता येईल. खालील तक्त्यात हे स्पष्ट केले आहे.

**अभिवृद्धीचे उपभोग परिणाम** ( consumption effects of growth )

| अभिवृद्धीचा परिणाम किंवा अभिनती | आयात वस्तूंच्या मागणीतील प्रवृत्ती | आयात वस्तूंच्या मागणीची उत्पन्न लवचिकता |
|---|---|---|
| व्यापार अति-अनुकूल | सीउप्र > १ | $\epsilon_{\text{य}}$ > १ |
| व्यापार-अनुकूल | सीउप्र > सउप्र | $\epsilon_{\text{य}}$ < १ |
| अविकारी | सीउप्र = सउप्र | $\epsilon_{\text{य}}$ = १ |
| व्यापार-प्रतिकूल | सीउप्र < सउप्र | $\epsilon_{\text{य}}$ < १ |
| व्यापार अति-प्रतिकूल | सीउप्र < ० | $\epsilon_{\text{य}}$ < ० |

सीउप्र = सीमांत उपभोग प्रवृत्ती


सउप्र = सरासरी उपभोग प्रवृत्ती

$\epsilon_{\text{य}}$ = आयात वस्तूंच्या मागणीची उत्पन्न लवचिकता.

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की उपभोगातील व्यापार-अनुकूल, अविकारी आणि व्यापार-प्रतिकूल अभिवृद्धीत वाढीव उत्पन्नाचा काही भाग आयात वस्तूंवर खर्च केला जातो. व्यापार अति-अनुकूल ( ultra-pro-trade ) परिणामामध्ये वाढीव उत्पन्नापेक्षा अधिक खर्च आयात वस्तूंवर केला जातो. व्यापार अति-प्रतिकूल ( ultra-anti-trade ) परिणामामध्ये आयात वस्तूंवरील खर्चात केवळ घट ( absolute fall ) होते. अर्थात या ठिकाणी आयात वस्तू 'निकृष्ट' ( inferior good ) असली पाहिजे हे उघड आहे.

## उत्पादन परिणाम

आकृती ४ मध्ये अभिवृद्धीपूर्व उत्पादन समतोल प बिंदूने दर्शवलेला आहे. अभिवृद्धीमुळे उत्पादन सीमा वक्र उजवीकडे सरकेल आणि क¹ ल¹ ( क¹ ल¹ || कल ) या स्थिर व्यापार अटी



दर्शविणाऱ्या रेषेला त्यावरील $प^1$, $प^2$ किंवा $प^3$ अशा कोणत्याही बिंदूपाशी स्पर्श करील आणि नव्या परिस्थितीत उत्पादन समतोल प्रस्थापित होईल. अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढते. साहजिकच आपल्या प्रतिमानात आयात ( य ) आणि निर्यात ( क्ष ) वस्तूंचे उत्पादन वाढेल. आयात आणि निर्यात वस्तूंच्या वाढीतील प्रमाणावरून अभिवृद्धी व्यापार अनुकूल की प्रतिकूल ते ठरवता येते. या ठिकाणी आपण आयात वस्तूची ( देशांतर्गत ) पुरवठा प्रवृत्ती ( supply propensities of importables) आणि आयात वस्तूच्या पुरवठ्याची उत्पन्न लवचिकता ( income elasticity of the supply of importables ) या संकल्पना वापरू.

( आकृती क्र. ४ )
**अभिवृद्धीचे उत्पादन परिणाम**

**अभिवृद्धी आणि उत्पादन परिणाम** ( growth and production effects )

| अभिवृद्धीचा परिणाम किंवा अभिनती | आयात वस्तूची पुरवठा प्रवृत्ती | आयात वस्तूच्या पुरवठ्याची उत्पन्न लवचिकता |
|---|---|---|
| व्यापार अति-अनुकूल | सीपुप्र < ० | σ य < ० |
| व्यापार-अनुकूल | सीपुप्र < सपुप्र | σ य < १ |
| अविकारी | सीपुप्र = सपुप्र | σ य = १ |
| व्यापार-प्रतिकूल | सीपुप्र > सपुप्र | σ य > १ |
| व्यापार अति-प्रतिकूल | सीपुप्र > १ | σ य > १ |

सीपुप्र = सीमांत पुरवठा प्रवृत्ती
सपुप्र = सरासरी पुरवठा प्रवृत्ती
σ य = आयात वस्तूची उत्पन्न लवचिकता

**अभिवृद्धीचा संकुलित परिणाम** ( total effect of growth )

अभिवृद्धीचा संकुलित परिणाम हा अभिवृद्धीच्या उत्पादन आणि उपभोग परिणामावरून ठरतो हे आपण पाहिलेच आहे. संकुलित परिणामाविषयी खालील निष्कर्ष मांडता येतील :

( १ ) जेव्हा दोनही परिणाम एकाच दिशेने अभिनत ( biased ) असतात त्या वेळी संकुलित परिणाम त्याच दिशेने अभिनत असतो. उदा. उपभोग परिणाम व्यापार-अनुकूल ( अ ) असेल आणि उत्पादन परिणामही व्यापार-अनुकूल ( अ ) असेल तर संकुलित परिणाम व्यापार-अनुकूल ( अ ) होईल.

( २ ) ज्या वेळी एक परिणाम अविकारी ( neutral ) असतो त्यावेळी दुसऱ्या परिणामाची जी अभिनती ( bias ) असते त्याच दिशेने संकुलित परिणामाचीही अभिनती असते. उदा. उत्पादन परिणाम अविकारी असेल आणि उपभोग परिणाम व्यापार-अनुकूल ( अ ) असेल तर संकुलित परिणाम व्यापार-अनुकूल ( अ ) असेल.

( ३ ) ज्या वेळी दोनही परिणाम एकमेकांविरुद्ध असतात त्यावेळी संकुलित परिणामाची अभिनती ठरवणे कठीण असते. त्यामुळे संकुलित अभिनती व्यापार अनुकूलते ( अ ) पासून व्यापार प्रतिकूलते ( प्र ) पर्यंत कोणतीही असू शकेल.

( ४ ) ज्यावेळी उत्पादन परिणाम व्यापार अति-प्रतिकूल ( अप्र ) असतो त्यावेळी संकुलित परिणाम, उपभोग परिणाम अति-अनुकूल ( अअ ) नसेल तर, अति-प्रतिकूल ( अप्र ) असतो. आणि अति-अनुकूल ( अअ ) उत्पादन परिणाम संकुलित परिणाम, अति-प्रतिकूल ( अप्र ) न होऊ देण्यास पुरेसा असतो.

**अभिवृद्धीचा संकुलित परिणाम** ( total effect of growth )


| उत्पादन परिणाम | उपभोग परिणाम | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अविकारी | अ | अअ | प्र | अप्र |
| अविकारी | अविकारी | अ | अ / अअ | प्र / अप्र | अप्र |
| अ | अ | अ | अ / अअ | अअ नाही | अप्र |
| अअ | अ / अअ | अ / अअ | अअ | अप्र नाही | कोठलाही प्रकार शक्य |
| प्र | प्र / अप्र | अअ नाही | अप्र नाही | प्र / अप्र | अप्र |
| अप्र | अप्र | अप्र | कोठलाही प्रकार शक्य | अप्र | अप्र |

अ = व्यापार-अनुकूल अअ = व्यापार अति-अनुकूल

प्र = व्यापार-प्रतिकूल अप्र = व्यापार अति-प्रतिकूल

आकृती ५ मध्ये व्यापारपूर्व समतोलाच्या परिस्थितीत अनुक्रमे प आणि र हे उत्पादन व उपभोग बिंदू आहेत. रप रेषेवरून देशाचे व्यापारमान कळते. र आणि प बिंदू एकच असतील तर तो देश

आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेत नाही असे होते. त्या ठिकाणी वस्तूंचा उपभोग देशांतर्गत उत्पादनाएवढा आहे. ही अवस्था अर्थव्यवस्थेचे संपूर्ण स्वावलंबन (autarky) दर्शवते. अभिवृद्धीनंतर व्यापारमान दाखवणारी रेषा वाढते की कमी होते यावरून अभिवृद्धी व्यापार अनुकूल की व्यापार प्रतिकूल ते ठरते. आकृती ५ मध्ये अभिवृद्धीनंतरचे उत्पादन आणि उपभोग बिंदू $\text{प}^{1}$ आणि $\text{र}^{1}$ ने दर्शवले आहेत. $\text{प}^{1}$ आणि $\text{र}^{1}$ हे बिंदू अप आणि अर रेषेवर (वाढवलेल्या) आहेत यावरून उत्पादन आणि उपभोगातील वाढ अविकारी (neutral) स्वरूपाची आहे हे सहज स्पष्ट होते. या ठिकाणी




(आकृती क्र. ५)

**अभिवृद्धीचे संकुलित परिणाम**

$$\frac{\text{उपभोगातील वाढीचे प्रमाण}}{} = \text{उत्पादनातील वाढीचे प्रमाण} = \text{व्यापारमानातील वाढीचे प्रमाण}$$

$$\frac{\text{रर}^{1}}{\text{अर}} = \frac{\text{पप}^{1}}{\text{अप}} = \frac{\text{प}^{1}\text{र}^{1} - \text{पर}}{\text{पर}}$$

यावरून असे म्हणता येईल की उपभोग आणि उत्पादन बिंदूंना जोडणाऱ्या, व्यापारमान दर्शवणाऱ्या, रेषांच्या तुलनेवरून अभिवृद्धी कोणत्या स्वरूपाची आहे ते ठरवता येते.


**अभिवृद्धी परिणाम**

| अभिवृद्धीपूर्व व्यापारमान दर्शवणारी रेषा | अभिवृद्धीनंतरचे व्यापारमान दर्शवणारी रेषा | अभिवृद्धीचा परिणाम |
|---|---|---|
| रप | $\text{र}^{1}\text{प}^{1}$ | अविकारी |
| रप | $\text{र}^{2}\text{प}^{1}$ | व्यापार-अनुकूल |
| रप | $\text{र}^{2}\text{प}^{1}$ पेक्षा लांब, उदा. $\text{र}^{2}\text{प}^{2}$ | व्यापार अति-अनुकूल |
| रप | $\text{र}^{1}\text{प}^{1}$ पेक्षा कमी | व्यापार-प्रतिकूल |
| रप | रप पेक्षा कमी | व्यापार अति-प्रतिकूल |

**अविकारी (neutral) अभिवृद्धी आणि व्यापार मूल्यतुल्यता दर**

आकृती ६ मध्ये र आणि प हे अभिवृद्धीपूर्व उपभोग आणि उत्पादन बिंदू आहेत. अभिवृद्धी-

नंतरचे उपभोग आणि उत्पादन बिंदू अनुक्रमे $र^1$ आणि $प^1$ आहेत. $र^1$ आणि $प^1$ हे बिंदू अर आणि अप या ( वाढवलेल्या ) रेषांवरील बिंदू आहेत. साहजिकच,




( आकृती क्र. ६ )

**अविकारी अभिवृद्धी**

उत्पादनातील वाढीचे प्रमाण = उपभोगातील वाढीचे प्रमाण

$$\because \frac{रर^1}{अर} = \frac{पप^1}{अप}$$

∴ अभिवृद्धीतील वाढ अविकारी स्वरूपाची आहे.

आता आकृतीवरून हेही स्पष्ट होते की,

Δ आयात वस्तूची मागणी > Δ आयात वस्तूच्या उत्पादनातील वाढ

$र^1न > प^1म$

याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत, आयात वस्तूची ( य ) अतिरिक्त मागणी ( excess demand ) निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे निर्यात वस्तूचा ( क्ष ) अतिरिक्त पुरवठा निर्माण झाला आहे हेही स्पष्ट होते. याचाच अर्थ आयात वस्तूची किंमत वाढेल आणि निर्यात वस्तूची किंमत घसरेल. म्हणून

$$\because \frac{\text{निर्यात वस्तू किंमत, } क_{क्ष}}{\text{आयात वस्तू किंमत, } क_{य}}$$ हे गुणोत्तर कमी होते

∴ व्यापार मूल्यतुल्यता दरात घट होते.

अविकारी ( netural ) अभिवृद्धीच्या परिस्थितीत देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात घट होते.

**घटकवृद्धी आणि आर्थिक अभिवृद्धी**

आतापर्यंतच्या विवेचनात आपण अभिवृद्धीमुळे होणाऱ्या उत्पादन आणि उपभोग परिणामांची चर्चा केली. या ठिकाणी आपणास उत्पादन परिणामांची सविस्तर चर्चा करावयाची आहे.

आर्थिक अभिवृद्धी दोन कारणांमुळे होते. एक म्हणजे उत्पादन घटकांतील (श्रम, भांडवल) वाढ. दुसरे, उत्पादन तंत्रातील प्रगती. उत्पादन घटकांतील वाढीमुळे उत्पादन तंत्र स्थिर असता, होणाऱ्या अभिवृद्धीला घटकवाढीमुळे होणारी अभिवृद्धी असे म्हणू. त्याचप्रमाणे उत्पादन घटकांच्या उपलब्धतेत काहीही बदल न होता केवळ उत्पादन तंत्रातील प्रगतीमुळे होणाऱ्या वाढीला तांत्रिक प्रगतीमुळे होणारी अभिवृद्धी असे म्हणू. तांत्रिक प्रगतीमुळे एकतर तेवढ्याच घटक उपलब्धतेत घटक राशी कमी करून अधिक उत्पादन मिळेल.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले तर अभिवृद्धी वरील दोनही कारणांमुळे झालेली दिसते. अलीकडील काळात मात्र तांत्रिक प्रगतीमुळे झालेली आर्थिक अभिवृद्धी लक्षणीय आहे. औद्योगिक क्रांती म्हणजे तांत्रिक प्रगतीचाच आविष्कार होय.

घटकवाढीमुळे होणाऱ्या आर्थिक अभिवृद्धीचा प्रथम विचार करू. घटकवाढीमुळे होणाऱ्या उत्पादनवाढीसंबंधी टी. एम. रिब्झिन्स्कि[८] यांनी एक प्रमेय मांडले आहे. त्याचा विचार येथे करू.

**रिब्झिन्स्कि यांचे प्रमेय**

"अर्थव्यवस्थेतील वस्तू व उत्पादन घटक यांच्या किमती स्थिर असता जर एकाद्या उत्पादन घटकाच्या उपलब्धतेत वाढ झाली तर तो घटक ज्या वस्तूच्या उत्पादनात तुलनेने अधिक प्रमाणात वापरला जातो त्या वस्तूच्या उत्पादनात केवळ वाढ ( absolute increase ) होते आणि तो घटक ज्या वस्तूच्या उत्पादनात तुलनेने कमी प्रमाणात वापरला जातो त्या वस्तूच्या उत्पादनात केवळ घट ( absolute fall ) होते.

उदाहरणार्थ, $\triangle$ भांडवल = ०, $\triangle$ श्रम $>$ ० आणि क्ष ही श्रम-सघन वस्तू असेल व य ही भांडवल-सघन वस्तू असेल तर रिब्झिन्स्की प्रमेयाप्रमाणे $\triangle$ क्ष $>$ ० आणि $\triangle$ य $<$ ०.

ॲजवर्थ-बाउली पेटिका आकृतीच्या [ आकृती क्र. ७ (ब) ] साहाय्याने रिब्झिन्स्की प्रमेय खालीलप्रमाणे सिद्ध करता येते;

**गृहीते :** (१) हेक्श्वर-ओलिन प्रमेयाची सर्व गृहीते,

(२) वस्तू किमती आणि घटक किमती स्थिर आहेत,

(३) य ही भांडवल-सघन आणि आयात वस्तू तर क्ष ही श्रम-सघन आणि निर्यात वस्तू आहे.


---

८. T. M. Rybczynski, "Factor Endowment and Relative Commodity Prices", *Economica*, November 1955. Reprinted in Readings in International Economics, edited by R. E. Caves and H. G. Johnson, Richard D. Irwyin, Homewood, 1968, pp. 72–77.

**रचना** : असअभ ही पेटिका आकृती आहे. असअभ या बाजू अर्थव्यवस्थेतील अनुक्रमे श्रम आणि भांडवलाची उपलब्धता दर्शवतात. यय आणि क्षक्ष हे अनुक्रमे य आणि क्ष वस्तूंचे सम उत्पादन वक्र ( सउ वक्र ) आहेत.

आ. ७ ( अ )

आ. ७ ( ब )




[ आकृती क्र. ७ ( अ ) आणि ७ ( ब ) ]

**रिबझिन्स्की प्रमेयाची सिद्धता**

**सिद्धता** : दिलेल्या घटक-उपलब्धतेच्या परिस्थितीत इ बिंदूने अर्थव्यवस्थेतील उत्पादन समतोल दर्शवला आहे. ( इ बिंदूपाशी यय आणि क्षक्ष हे सउ वक्र एकमेकांना स्पर्श करतात. ) अइ

आणि अ¹इ या रेषा घटक-घनता $\left(\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}} \text{ गुणोत्तर}\right)$ दर्शवतात. अइ आणि अ¹इ रेषांच्या प्रवणतेवरून क्ष ही श्रम-सघन वस्तू आहे आणि य ही भांडवल-सघन वस्तू आहे हे स्पष्ट होते.

आता असे मानू की अर्थव्यवस्थेतील श्रम या घटकात $\triangle$ स इतकी वाढ झाली ( $\triangle$ स $>$ ० ) आहे आणि भांडवल या घटकात काहीच बदल झालेला नाही ( $\triangle$ क्ष = ० ). ही परिस्थिती अस¹अ²भ या पेटिका आकृतीने दर्शवलेली आहे. आता क्षक्ष सउ वक्रांचा आदिबिंदू अ हा आहे तर यय सउ वक्रांचा अ² हा आहे.

अस¹अ²भ या पेटिका आकृतीत य¹य¹ आणि क्ष¹क्ष¹ हे सउ वक्र एकमेकास इ¹ या बिंदूत स्पर्श करतात. इ¹ बिंदूने अर्थव्यवस्थेतील नवीन उत्पादन समतोल दर्शवलेला आहे.

आपल्या गृहीताप्रमाणे घटक किंमती स्थिर आहेत. म्हणून वस्तूंची घटक-घनता ही स्थिर असणार. घटक किंमत गुणोत्तर आणि वस्तूंचे घटक गुणोत्तर यातील हा संबंध आपणास माहीत आहेच. आता आकृतीवरून हे स्पष्ट होते की,

( १ ) अइ रेषेची प्रवणता = अइ¹ रेषेची प्रवणता

( $\therefore$ इ आणि इ¹ हे दोन्ही बिंदू अइ¹ रेषेवरील आहेत )

( २ ) अ¹इ रेषेची प्रवणता = अ²इ¹ रेषेची प्रवणता

( $\therefore$ अ¹इ $\parallel$ अ²इ¹ )

आपणास हेही माहीत आहे की घटक-घनता रेषांच्या लांबीवरून उत्पादन पातळी मोजता येते.

$\therefore$ अइ¹ $>$ अइ

$$\therefore \left(\begin{matrix}\text{इ¹ बिंदूने दर्शवलेले} \\ \text{क्ष चे उत्पादन}\end{matrix}\right) > \left(\begin{matrix}\text{इ बिंदूने दर्शवलेले} \\ \text{क्ष चे उत्पादन}\end{matrix}\right) \ldots\ldots (१)$$

त्याचप्रमाणे

$\therefore$ अ¹इ $<$ अ²इ¹

$$\therefore \left(\begin{matrix}\text{इ बिंदूने दर्शवलेले} \\ \text{य चे उत्पादन}\end{matrix}\right) > \left(\begin{matrix}\text{इ¹ बिंदूने दर्शवलेले} \\ \text{य चे उत्पादन}\end{matrix}\right) \ldots\ldots (२)$$

वरील ( १ ) व ( २ ) वरून क्ष या श्रम-सघन वस्तूच्या उत्पादनात केवल वाढ ( absolute increase ) झाली आहे आणि य या भांडवल-सघन वस्तूच्या उत्पादनात केवल घट ( absolute fall ) झाली आहे. हीच रिब्झिन्स्की प्रमेयाची सिद्धता. ( त्याचप्रमाणे $\triangle$ भांडवल $>$ ०, $\triangle$ श्रम = ० असता $\triangle$ य $>$ ० आणि $\triangle$ क्ष $<$ ० असे दाखवता येईल )

आकृती क्र. ७ ( अ ) मध्ये तत वक्र हा अभिवृद्धीपूर्व उत्पादन शक्यता वक्र (उश वक्र) आहे. आणि प हा उत्पादन बिंदू आहे. अभिवृद्धीनंतरचा उश वक्र त¹त¹ ने दर्शवलेला आहे. स्थिर व्यापार-मूल्यतुल्यता दराच्या परिस्थितीत उत्पादन बिंदू प¹ आहे. प¹ बिंदूने आयात वस्तूचे ( य ) उत्पादन घटल्याचे आणि निर्यात वस्तूचे ( क्ष ) उत्पादन वाढल्याचे स्पष्ट होते.

अर्थव्यवस्थेतील उत्पादन घटकामधील वाढ एकाच प्रमाणात होईल असे नाही. आपण दोन विशिष्ट प्रकारच्या वाढींचा विचार करू.


( १ ) भांडवल आणि श्रम या घटकांतील वाढ आयात उद्योगात ( य ) उपयोजल्या जाणाऱ्या $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोत्तराइतकी आहे. म्हणजेच $\frac{\triangle \text{भ}}{\triangle \text{स}} = \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{य}}$ आहे असे मानू.

घटकवृद्धीनंतर पेटिका आकृतीतील [ आकृती ८ ( ब ) ] घटक-घनता रेषा $अ^{१}$ इ पेक्षा वाढलेली आहे ( $अ^{२}$ इ > $अ^{१}$ इ ). याचाच अर्थ य चे उत्पादन वाढलेले आहे. ( △ य > ० ) अइ या क्ष वस्तूच्या घटक-घनता रेषेत काहीच फरक पडलेला नाही. याचा अर्थ क्ष च्या उत्पादनात काहीच फरक पडलेला नाही ( △ क्ष = ० ).

आकृती ८ (अ) मध्ये अभिवृद्धीपूर्व उत्पादन समतोल प बिंदूने दर्शवलेला आहे तर अभिवृद्धीनंतरचा समतोल $प^{१}$ बिंदूने दर्शवलेला आहे. अभिवृद्धीमुळे केवळ य च्याच उत्पादनात फरक पडल्याचे स्पष्ट होते.

आ. ८ (अ)

आ. ८ (ब)



[ आकृती क्र. ८ (अ) आणि ८ (ब) ]
**घटकवाढीचा परिणाम**

याचाच अर्थ अर्थव्यवस्थेतील घटकवृद्धीच्या गुणोत्तराएवढे $\left(\frac{\triangle भ}{\triangle स}\right)$ एका उद्योगातील घटक गुणोत्तर $\left(\frac{भ}{स}\right)_{य}$ असेल तर केवळ त्याच उद्योगातील उत्पादन वाढते.

म्हणजेच

$$\frac{\triangle भ}{\triangle स} = \left(\frac{भ}{स}\right)_{य} \text{ असेल तर}$$

△ य > ०, आणि △ क्ष = ० असा परिणाम होतो.


( २ ) आता आपण असे मानू की दोनही घटकांतील वाढीचे गुणोत्तर अर्थव्यवस्थेतील एकूण घटक गुणोत्तराबरोबर आहे. म्हणजेच,

$$\frac{\triangle म}{\triangle स} = \left(\frac{भ}{स}\right)_{एकूण}$$

आकृती ९ (ब) वरून हे स्पष्ट होते की अभिवृद्धीनंतर

आ. ९ (अ)

आ. ९ (ब)



(१) ∵ अ² इ¹ > अ¹ इ

∴ △ य > ०
म्हणजेच य च्या उत्पादनात वाढ झाली आहे.

(२) ∵ अ इ¹ > अइ

∴ △ क्ष > ०
म्हणजेच क्ष च्या उत्पादनात वाढ झाली आहे.

[ आकृती क. ९ (अ) आणि ९ (ब) ]
**घटकवाढीचा परिणाम**

आकृती ९ (अ) वरून हे स्पष्ट होते की य आणि क्ष च्या उत्पादनात सारख्याच प्रमाणात वाढ होते. यावरून असे म्हणता येते की अर्थव्यवस्थेतील भांडवल व श्रम या घटकांतील वाढीचे गुणोत्तर अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवल व श्रमातील गुणोत्तराएवढे असेल तर दोनही वस्तूंच्या उत्पादनातील वाढीचे प्रमाण सारखेच राहते. म्हणजेच,

$$\frac{\triangle भ}{\triangle स} = \left(\frac{भ}{स}\right) \text{ एकूण असेल तर}$$


$$\frac{\triangle य}{य} = \frac{\triangle क्ष}{क्ष} \text{ असा परिणाम सिद्ध होईल.}$$

आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे या वाढीला अविकारी अभिवृद्धी असे म्हणता येईल.

घटकवृद्धीमुळे होणाऱ्या वाढीसंबंधी पुढील तक्त्यात एकत्र माहिती दिली आहे.

**घटक उपलब्धतेतील बदल आणि उत्पादनातील बदल**

| घटक उपलब्धतेतील बदल | उत्पादनातील बदल |
| --- | --- |
| $\frac{\Delta भ}{\Delta स} > \left(\frac{भ}{स}\right)_{य}$ | $\Delta य > ०, \Delta क्ष < ०$ |
| $\frac{\Delta भ}{\Delta स} = \left(\frac{भ}{स}\right)_{य}$ | $\Delta य > ०, \Delta क्ष = ०$ |
| $\frac{\Delta भ}{\Delta स} = \left(\frac{भ}{स}\right)_{एकूण}$ | $\Delta य > ०, \Delta क्ष > ०$ |
| $\frac{\Delta भ}{\Delta स} = \left(\frac{भ}{स}\right)_{क्ष}$ | $\Delta य = ०, \Delta क्ष > ०$ |
| $\frac{\Delta भ}{\Delta स} < \left(\frac{भ}{स}\right)_{क्ष}$ | $\Delta य < ०, \Delta क्ष > ०$ |




( आकृती क्र. १० ) **घटकवृद्धीचे आर्थिक अभिवृद्धीवरील परिणाम**

घटकवृद्धीमुळे आर्थिक अभिवृद्धीवर होणाऱ्या व्यापार-अनुकूल, व्यापार-प्रतिकूल इत्यादी परिणामांची कल्पना आकृती १० वरून येईल. य ही भांडवल-सघन वस्तू आयात वस्तू आहे आणि क्ष ही श्रम-सघन वस्तू निर्यात वस्तू आहे हे आपले गृहीत आहे. भांडवल आणि श्रमातील निरनिराळ्या वाढीच्या दरानुसार क्ष आणि य या वस्तूंच्या उत्पादनात वाढ होते हे आपण पाहिलेच आहे. $\frac{\Delta भ}{\Delta स}$ गुणोत्तर अर्थव्यवस्थेतील एकूण $\frac{भ}{स}$ गुणोत्तराएवढे असेल तर अभिवृद्धी अविकारी प्रकारची असते. श्रमातील वाढीचा दर भांडवलातील वाढीपेक्षा अधिक असेल तर अभिवृद्धी व्यापार-अनुकूल किंवा व्यापार अति-अनुकूल असते. व्यापार-अनुकूल आणि व्यापार अति-अनुकूल प्रकारच्या अभिवृद्धीमध्ये जी सीमारेषा

आहे त्या ठिकाणी $\frac{\triangle भ}{\triangle स} = \left(\frac{भ}{स}\right)_{अ}$ अशी स्थिती आहे. त्याचप्रमाणे व्यापार-प्रतिकूल आणि व्यापार अति-प्रतिकूल अभिवृद्धीमधील सीमा रेषेवर $\frac{\triangle भ}{\triangle स} = \left(\frac{भ}{स}\right)_{य}$ अशी स्थिती आहे.

[ ४ ]

## तांत्रिक प्रगती आणि आर्थिक अभिवृद्धी

येथवर आपण घटक वृद्धीमुळे होणाऱ्या अभिवृद्धीचा विचार केला. परंतु आपण हेही पाहिले आहे की घटक उपलब्धतेत बदल झाला नाही तरी तांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक अभिवृद्धी होते. याचे कारण असे की तांत्रिक प्रगतीमुळे किंवा नवोपक्रमामुळे ( innovation ) उत्पादन घटकांची उत्पादकता वाढते.

## हिक्स[१] यांनी सुचवलेले तांत्रिक प्रगतीचे वर्गीकरण

या लेखांतील विषयाच्या चर्चेसाठी आपण हिक्स यांनी सुचवलेले तांत्रिक प्रगतीचे वर्गीकरण स्वीकारू. या वर्गीकरणात तांत्रिक प्रगतीचा उत्पादन घटकांच्या सीमांत उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामाला महत्त्वाचे स्थान आहे.

( १ ) अविकारी तांत्रिक प्रगती ( neutral technical progress )


ज्या नवोपक्रमामुळे दोनही घटकांच्या सीउ मध्ये होणारा बदल सारखाच असतो त्या प्रकारच्या तांत्रिक प्रगतीला अविकारी तांत्रिक प्रगती असे म्हणतात.

(२) श्रम-न्यूनयक (labour-saving) किंवा भांडवल-प्रयोजी (capital-using) तांत्रिक प्रगती

ज्या नवोपक्रमामुळे भांडवलाची सीउ श्रमाच्या सीउ पेक्षा अधिक वाढते त्या प्रकारच्या तांत्रिक प्रगतीला श्रम-न्यूनयक किंवा भांडवल-प्रयोजी तांत्रिक प्रगती म्हणतात.

( ३ ) श्रम-प्रयोजी ( labour-using ) किंवा भांडवल–न्यूनयक ( capital-saving ) तांत्रिक प्रगती

ज्या नवोपक्रमामुळे श्रमाची सीउ भांडवलाच्या सीउपेक्षा अधिक वाढते त्या तांत्रिक प्रगतीला श्रम-प्रयोजी किंवा भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती असे म्हणतात.




( आकृती क्र. ११ )
**अविकारी तांत्रिक प्रगती**

हिक्सप्रणीत तांत्रिक प्रगतीची व्याख्या वरील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट

१. J. R. Hicks, Theory of Wages, Macmillan, London, 1932.

होईल. आकृती ११ मध्ये क्षक्ष हा क्ष वस्तूचा एकक सउ वक्र ( unit-isoquant ) आहे. कल रेषेने क्ष च्या एका मात्रेचा उत्पादन खर्च दाखवला आहे. तांत्रिक प्रगतीमुळे एका किंवा दोनही उत्पादन घटकांची सीउ वाढते. म्हणून सउ वक्र तांत्रिक प्रगतीमुळे आदिबिंदूकडे सरकेल. आकृतीमध्ये सउ वक्राची नवी स्थिती क्ष$^1$क्ष$^1$ ने दर्शवली आहे. याचाच अर्थ तांत्रिक प्रगतीमुळे भांडवल आणि/अथवा श्रम यांच्या राशी कमी करून क्ष चे पूर्वीइतकेच उत्पादन करता येईल. तांत्रिक प्रगती कोणत्या स्वरूपाची आहे हे पाहण्यासाठी पूर्वीच्या $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)$, गुणोत्तराच्या परिस्थितीत दोनही उत्पादन घटकांच्या सीउमध्ये होणाऱ्या बदलाचा विचार केला पाहिजे. आकृतीमध्ये अर किंवा अर$^1$ रेषांनी भ/स गुणोत्तर दर्शवले आहे. र$^1$ बिंदू अर रेषेवरील आहे. क्ष$^1$क्ष$^1$ या सउ वक्राला र$^1$ बिंदूशी क$^1$ल$^1$ ही स्पर्शिका काढू. क$^1$ल$^1$ ही रेषा जर कल रेषेला समांतर असेल तर तांत्रिक प्रगती हिक्स यांच्या व्याख्येप्रमाणे अविकारी ( neutral ) आहे. येथे

भांडवलाच्या सीउमधील बदल :

$$\frac{\Delta \text{ भांडवलाची सीउ}}{\text{भांडवलाची सीउ}} = \frac{(\text{१/अक}^1) - (\text{१/अक})}{(\text{१/अक})} = \frac{\text{क}^1\text{क}}{\text{अक}^1}$$

त्याचप्रमाणे श्रमाच्या सीउमधील बदल :

$$\frac{\Delta \text{ श्रमाची सीउ}}{\text{श्रमाची सीउ}} = \frac{\text{लल}^1}{\text{अल}^1}$$

अविकारी तांत्रिक प्रगतीसाठी


$$\frac{\Delta \text{ भांडवलाची सीउ}}{\text{भांडवलाची सीउ}} = \frac{\Delta \text{ श्रमाची सीउ}}{\text{श्रमाची सीउ}}$$

$$\therefore \quad \frac{\text{कक}^1}{\text{अक}^1} = \frac{\text{लल}^1}{\text{अल}^1} \text{ असणे जरुरीचे आहे.}$$

याचा अर्थ असा की अविकारी तांत्रिक प्रगतीच्या परिस्थितीत नवे आणि पूर्वीचे $\frac{\text{मजुरी}}{\text{व्याज}}, \left(\frac{\text{म}}{\text{व}}\right)$, गुणोत्तर स्थिर राहते. सारांश असा की क्ष$^1$क्ष$^1$ (नवा सउ वक्र) वक्राला र$^1$ बिंदूपाशी स्पर्शिका असणारी क$^1$ल$^1$ रेषा जर कल रेषेला समांतर असेल तर तांत्रिक प्रगतीमुळे होणाऱ्या दोन्ही उत्पादन घटकांमधील सीमान्त उत्पादकतेच्या बदलाचे प्रमाण सारखेच असेल. अशा तांत्रिक प्रगतीला हिक्सप्रणीत अविकारी तांत्रिक प्रगती म्हणतात.

तांत्रिक प्रगतीमुळे आकृती १२ मध्ये दाखवल्याप्रमाणे पूर्वीच्याच $\frac{\text{भ}}{\text{स}}$ गुणोत्तराच्या परिस्थितीत जर

$$\frac{\Delta \text{ स ची सीउ}}{\text{स ची सीउ}} > \frac{\Delta \text{ भ ची सीउ}}{\text{भ ची सीउ}}$$




(आकृती क्र. १२)

**भांडवल-न्यूनयक किंवा श्रम-प्रयोजी तांत्रिक प्रगती**

म्हणजेच

$$\frac{\text{लल}^1}{\text{अल}^1} > \frac{\text{कक}^1}{\text{अक}^1}$$

असेल तर ती तांत्रिक प्रगती भांडवलाची बचत करणारी (भांडवल-न्यूनयक) किंवा श्रमाचा वापर वाढवणारी (श्रम-प्रयोजी) म्हणता येईल. दुसऱ्या प्रकारे असेही म्हणता येईल की श्रम-प्रयोजी (labour-using) तांत्रिक प्रगतीमध्ये क²ल² (क²ल² ।। कल) रेषेने दर्शवलेले प्रगतीपूर्व $\frac{\text{म}}{\text{व}}$ गुणोत्तराच्या परिस्थितीत $\frac{\text{भ}}{\text{स}}$ **गुणोत्तर घटते.**

नवीन $\frac{\text{भ}}{\text{स}}$ गुणोत्तर अर² रेषेने दर्शवले आहे. म्हणजेच


$$\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}^2} < \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}}$$

आता आकृती १३ मध्ये

$$\because \frac{\text{लल}^1}{\text{अल}^1} < \frac{\text{कक}^1}{\text{अक}^1}$$

$$\therefore \frac{\triangle \text{ सची सीउ}}{\text{सची सीउ}} < \frac{\triangle \text{ भ ची सीउ}}{\text{भ ची सीउ}}$$

म्हणजेच आकृती क्र. १३ ने दाखवलेली तांत्रिक प्रगती तुलनेने भांडवलाचा वापर वाढवणारी (भांडवल-प्रयोजी) किंवा तुलनेने श्रमाची बचत करणारी (श्रम-न्यूनयक) तांत्रिक प्रगती आहे. म्हणजेच येथे




(आकृती क्र. १३)

**भांडवल-प्रयोजी किंवा श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती**

$$\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}^2} > \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}}$$

## तांत्रिक प्रगतीचे वर्गीकरण

| तांत्रिक प्रगतीचा प्रकार | भांडवल व श्रम यांच्या सीमांत उत्पादकतेतील बदलाचे प्रमाण | प्रगतीपूर्व घटक-किंमत, म / व गुणोत्तराच्या परिस्थितीत नवे व पूर्वीचे भ / स गुणोत्तर |
|---|---|---|
| अविकारी तांत्रिक प्रगती | $\frac{\triangle \text{ भ ची सीउ}}{\text{भ ची सीउ}} = \frac{\triangle \text{ स ची सीउ}}{\text{स ची सीउ}}$ | $\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{नवे}} = \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{पूर्वीचे}}$ |
| श्रमाचा तुलनेने वापर वाढवणारी (श्रम-प्रयोजी) किंवा भांडवलाची बचत करणारी ( भांडवल-न्यूनयक ) तांत्रिक प्रगती | $\frac{\triangle \text{ भ ची सीउ}}{\text{भ ची सीउ}} < \frac{\triangle \text{ स ची सीउ}}{\text{स ची सीउ}}$ | $\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{नवे}} < \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{पूर्वीचे}}$ |
| भांडवलाचा तुलनेने वापर वाढवणारी ( भांडवल-प्रयोजी ) किंवा श्रमाची बचत करणारी ( श्रम-न्यूनयक ) तांत्रिक प्रगती | $\frac{\triangle \text{ भ ची सीउ}}{\text{भ ची सीउ}} > \frac{\triangle \text{ स ची सीउ}}{\text{स ची सीउ}}$ | $\left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{नवे}} > \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{पूर्वीचे}}$ |

तांत्रिक प्रगतीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादन सीमा वाढते हे आपण पाहिले आहे. तांत्रिक प्रगतीमधून होणाऱ्या अभिवृद्धीमुळे देशाचे विदेशी व्यापारावरील अवलंबन वाढते की कमी होते हे आपणास पाहावयाचे आहे. प्रथमतः हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्या उद्योगात तांत्रिक प्रगती होते त्या उद्योगातील उत्पादन वाढते आणि उत्पादन खर्च कमी होतो. आपण विवेचनाच्या सोयीसाठी अर्थव्यवस्थेचे दोन विभाग कल्पू. शेती आणि उद्योग. आपण असे मानू की शेती विभाग श्रम-सघन आहे तर उद्योग विभाग भांडवल-सघन आहे. शिवाय असेही मानू की उद्योग विभागातील उत्पादित वस्तू ( य ) आयात वस्तू आहेत. तर शेती विभागातील उत्पादित वस्तू ( क्ष ) निर्यात वस्तू आहेत. तांत्रिक प्रगती कोणत्या विभागात होते, त्यामुळे कोणत्या वस्तूचे उत्पादन वाढते, ती वस्तू आयात वस्तू आहे की निर्यात वस्तू आहे इत्यादींवर तांत्रिक प्रगतीमुळे होणाऱ्या अभिवृद्धीचे देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावर कोणता परिणाम होतो हे अवलंबून असते. या ठिकाणी आपण खालील प्रकारच्या तांत्रिक प्रगतीच्या परिणामांचा विचार करू.


( १ ) भांडवल-सघन उद्योगातील अविकारी तांत्रिक प्रगती
( neutral technical progress in capital-intensive industry )

( २ ) भांडवल-सघन उद्योगात भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती
( capital-saving technical progress in capital-intensive industry )

( ३ ) भांडवल-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती
( labour-saving technical progress in capital-intensive industry )

## भांडवल-सघन उद्योगातील अविकारी तांत्रिक प्रगती

आकृती १४ मध्ये दाखवल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेतील समतोलाच्या परिस्थितीपासून सुरुवात करू. कल ही घटक-किंमत रेषा आहे. यय आणि क्षक्ष हे नवोपक्रमापूर्वीचे अनुक्रमे क्ष आणि य या वस्तूंचे सउ वक्र आहेत. अर आणि अन या य आणि क्ष वस्तूंच्या घटक-घनता रेषा आहेत.




( आकृती क्र. १४ )
**भांडवल-सघन उद्योगातील अविकारी तांत्रिक प्रगती**

आता असे मानू की उद्योग विभागात ( manufacturing sector ) अविकारी नवोपक्रम सुरु झाला आहे. नवोपक्रमाची परिणती म्हणून जे नवे उत्पादन फल सिद्ध होते ते य¹य¹ या सउ वक्राने दर्शवले आहे. आकृतीवरून हे स्पष्ट होते की तांत्रिक प्रगतीपूर्वी आणि नंतर एकाच घटक-किमतीच्या परिस्थितीत ( कल ‖ क¹ल¹ ) उद्योग विभागातील भांडवल/श्रम गुणोत्तर किंवा घटक-घनता सारखीच आहे. म्हणजेच उद्योग विभागातील तांत्रिक प्रगती अविकारी स्वरूपाची आहे.

आता आपण असे मानू की वस्तू-किमती स्थिर आहेत. नवोपक्रमानंतरही वस्तू किमती स्थिर ठेवण्यासाठी घटक-किमती बदलल्या पाहिजेत. हे पाहण्यासाठी आपण य¹य¹ आणि क्षक्ष सउ वक्रांना स्पर्श करणारी एक घटक-किंमत रेषा ( क²ल² ) काढू. नव्या घटक-किंमत रेषेच्या प्रवणतेवरून भांडवलाची सापेक्ष किंमत अविकारी नवोपक्रमामुळे वाढते हे स्पष्ट होते. याचे अर्थशास्त्रीय कारण काय असावे? अविकारी नवोपक्रमामुळे उद्योग विभागात भांडवल आणि श्रम या घटकांची सीमांत उत्पादकता वाढली आहे. यामुळे दोनही घटकांना असलेली मागणी वाढते. परंतु उद्योग विभाग भांडवल-सघन असल्यामुळे तुलनेने भांडवलासाठी असलेली मागणी अधिक असेल. साहजिकच भांडवलाची सापेक्ष किंमत वाढेल. याचा परिणाम म्हणून दोनही विभागातील उद्योजकांची प्रवृत्ती भांडवलाऐवजी श्रमाचा वापर अधिक करण्याकडे होईल. ही स्थिती अर¹ आणि अन¹ या भांडवल/श्रम गुणोत्तर रेषांनी दर्शवलेली आहे. यावरून

$$\because \text{अर}^1 \text{ ची प्रवणता} < \text{अर ची प्रवणता}$$

$$\therefore \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}^1} < \left(\frac{\text{भ}}{\text{स}}\right)_{\text{र}}$$

म्हणजेच अविकारी नवोपक्रमामुळे उद्योग विभागातील उत्पादन तंत्र अधिक श्रम-सघन होते. त्याचप्रमाणे अन¹ आणि अन या रेषांच्या प्रवणतेवरून शेती विभागातील उत्पादन तंत्र ही अधिक श्रम-सघन होते असे दिसून येईल.

## उत्पादनावरील परिणाम

आपणास हे माहीत आहे की अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवल श्रम गुणोत्तर हे दोनही उद्योगातील भांडवल श्रम गुणोत्तराची भारित सरासरी ( weighted average ) असते.

म्हणजेच

$$\frac{भ}{स} = \frac{स_{क्ष}}{स} \times \left(\frac{भ}{स}\right)_{क्ष} + \frac{स_{य}}{स} \times \left(\frac{भ}{स}\right)_{य}$$

याचा अर्थ दोनही विभागातील उत्पादन तंत्र श्रम-सघन होण्यासाठी एक अट पुरी करावी लागेल. ती म्हणजे श्रम या घटकाची दोनही उद्योगातील वाटणी बदलेल. म्हणजे भांडवल-सघन उद्योगात उपयोजले जाणारे एकूण श्रमाचे प्रमाण $\left(\frac{स_{क्ष}}{स}\right)$ वाढेल. त्याचप्रमाणे श्रम-सघन उद्योगात उपयोजले जाणारे एकूण श्रमाचे प्रमाण $\left(\frac{स_{क्ष}}{स}\right)$ कमी होईल. याचाच अर्थ श्रम-सघन उद्योगाचा संकोच होईल. आणि भांडवल-सघन उद्योगाचा विस्तार होईल. म्हणजेच आपल्या प्रतिमानात य या आयात वस्तूचे उत्पादन वाढेल व क्ष या निर्यात वस्तूचे उत्पादन वाढेल. म्हणजेच अविकारी नवोपक्रमामुळे, वस्तू किमती स्थिर असता, उद्योग विभागाच्या उत्पादनात ( य ) केवल वाढ होईल तर शेती विभागाच्या उत्पादनात ( क्ष ) केवल घट होईल. ( या संबंधीच्या चर्चेसाठी पाहा : <u>अर्थसंवाद</u>, जुलै-सप्टेंबर १९८०, पा. ७६-७८ ).

आता आपण हे मानू की सर्व उत्पादित मालाला पर्याप्त मागणी आहे. आपल्या प्रतिमानात अविकारी तांत्रिक प्रगतीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली आहे. याचा अर्थ य आणि क्ष या दोनही वस्तूंची मागणी वाढेल ( दोनही वस्तू निकृष्ट वस्तू नाहीत असे मानले तर ). याचाच अर्थ स्थिर वस्तू किमतींच्या संदर्भात शेती विभागातील मालासाठी अतिरिक्त मागणी ( excess demand ) निर्माण होईल. आणि बाजारातील सर्व मालाचा उठाव होण्यासाठी शेती विभागातील वस्तूंच्या किमती वाढतील आणि उद्योग विभागातील मालाच्या किमती कमी होतील. आपल्या प्रतिमानात उद्योग विभागातील वस्तू ( य ) निर्यात वस्तू आहेत. त्यामुळे अविकारी तांत्रिक प्रगतीमुळे

$$\frac{\text{निर्यात वस्तू किंमत}}{\text{आयात वस्तू किंमत}} \text{ हे गुणोत्तर वाढेल}$$

म्हणजेच देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर ( terms of trade ) सुधारेल.


यावरून <u>आपण असे म्हणू शकतो की अर्थव्यवस्थेतील आयात किंवा आयात-स्पर्धक उद्योगात ( import-competing industry ) अविकारी तांत्रिक प्रगती झाली असता देशाच्या व्यापार अटी सुधारतात, तर निर्यात उद्योगातील तांत्रिक प्रगतीमुळे व्यापार अटी बसरतात.</u>

अविकारी तांत्रिक प्रगतीमुळे देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरामध्ये होणाऱ्या बदलाची दिशा निःसंदिग्ध आहे पण प्रत्यक्षात बदल किती होईल हे आयात वस्तूच्या मागणीची उत्पन्न लवचिकता, अर्थव्यवस्थेची बदल घडवून आणण्याची क्षमता ( adaptability ), इत्यादींवर अवलंबून राहील.

**भांडवल-सघन उद्योगात भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती**

आकृती १५ मध्ये दाखवल्याप्रमाणे यय आणि क्षक्ष हे आरंभीचे सउ वक्र आहेत. कल ही घटक-किंमत रेषा आहे. अर आणि अन या अनुक्रमे य आणि क्ष वस्तूंच्या घटक-घनता दाखवणाऱ्या रेषा आहेत.

उद्योग क्षेत्रात भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती झाली आहे. य$^1$य$^1$ हा नवा सउ वक्र आहे. स्थिर घटक-किमतीच्या संदर्भात नवे उत्पादन तंत्र अधिक श्रम-सघन झाले आहे. (अर$^1$ अर रेषेच्या उजव्या बाजूस आहे) कारण भांडवल-न्यूनयक प्रगतीमुळे श्रमाची सीमांत उत्पादकता वाढली आहे.




(आकृती क. १५)

**भांडवल-सघन उद्योगातील भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती**

वस्तू किंमत स्थिर मानल्या तर नव्या परिस्थितीत घटक-किमती बदलतील. क$^2$ल$^2$ ही घटक-किंमत रेषा क्षक्ष आणि य$^1$य$^1$ या सउ वक्रांना स्पर्श करते. क$^2$ल$^2$ च्या प्रवणतेवरून भांडवलाची किंमत वाढल्याचे स्पष्ट होते. परिणामतः उद्योजक उत्पादन तंत्रात भांडवलाऐवजी श्रमाचा अधिक वापर करतील. म्हणजेच दोनही उद्योगांतील उत्पादन तंत्र अधिक श्रम-सघन होईल. अर$^2$ आणि अन$^1$ या घटक-घनता रेषावरून हे स्पष्ट होते.

दोन्ही उद्योगांतील उत्पादन तंत्र श्रम-सघन होण्यासाठी, आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, दिलेल्या घटक उपलब्धतेच्या संदर्भात, श्रम-सघन उद्योगाचा संकोच होईल तर भांडवल-सघन उद्योगाचा विस्तार होईल. याचा अर्थ आपल्या प्रतिमानात य वस्तूचे उत्पादन वाढेल तर क्ष वस्तूचे कमी होईल.

म्हणजे भांडवल-सघन उद्योगात भांडवल-न्यूनयक नवोपक्रमाचा परिणाम म्हणून उद्योग-विभागातील उत्पादनात (य) केवल वाढ होईल तर शेती विभागातील उत्पादनात (क्ष) केवल घट होईल. अशा परिस्थितीत आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे य वस्तूची किंमत कमी होईल तर क्ष वस्तूची किंमत वाढेल. म्हणजेच

$$\therefore \frac{क_{क्ष}}{क_{य}} \text{ गुणोत्तर वाढते}$$

$$\therefore \frac{\text{निर्यात वस्तू किंमत}}{\text{आयात वस्तू किंमत}} \text{ गुणोत्तर वाढते.}$$

( ∵ क्ष ही निर्यात वस्तू, य ही आयात वस्तू )

म्हणजेच देशाचा मूल्यतुल्यता दर सुधारतो.

यावरून असे म्हणता येईल की भांडवल-सघन आयात-स्पर्धक उद्योगात भांडवल-न्यूनयक प्रगती झाली असता देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर सुधारतो. पण निर्यात विभागातील तांत्रिक प्रगतीमुळे व्यापार मूल्यतुल्यता दर घसरतो.

भांडवल-सघन उद्योगातील भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगतीमुळे देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात कोणता परिणाम होईल हे वरीलप्रमाणे निःसंदिग्धपणे सांगता येते. अर्थात परिणामाची दिशा

सांगता आली तरी प्रत्यक्ष परिणाम किती असेल ते इतर आणि विशेषतः मागणीच्या परिस्थितीवर अवलंबून राहील.


### भांडवल-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक नवोपक्रमाचे परिणाम

आकृती १६ मध्ये यय आणि क्षक्ष हे अनुक्रमे य आणि क्ष या वस्तूंचे तांत्रिक प्रगतीपूर्व सउ वक्र आहेत. कल ही घटक-किंमत रेषा आहे तर अर आणि अन रेषा अनुक्रमे य आणि क्ष उद्योगातील $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोत्तर दर्शवितात. कारखानदारी उद्योगात (य वस्तू) श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती झाली असल्याचे आदिबिंदूकडे सरकलेल्या य$^1$य$^1$ या सउ वक्राने दाखविले आहे. पूर्वीच्याच घटक-किमतींच्या परिस्थितीत कारखानदारी विभागातील नवे $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोत्तर अर$^1$ रेषेने दाखवले आहे. श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगतीमुळे भांडवलाची सीउ श्रमाच्या सीउ पेक्षा अधिक वाढते हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. म्हणून घटक-किमती पूर्वीइतक्याच राहिल्या तर साहजिकच उद्योजकांकडून भांडवलाला अधिक मागणी येईल. म्हणजेच उत्पादन तंत्र अधिक भांडवल-सघन होईल हे खालील गोष्टीवरून स्पष्ट होते.

आकृती क. १६ मध्ये

$$\because \text{अर}^1 \text{ ची प्रवणता} > \text{अर ची प्रवणता}$$

$$\therefore \left(\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}\right)_{\text{र}^1} > \left(\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}\right)_{\text{र}}.$$




(आकृती क. १६)

**भांडवल-सघन उद्योगातील भांडवल प्रयोजी तांत्रिक प्रगती**

आता वस्तू किंमत स्थिर आहेत असे मानून वरील प्रकारच्या नवोपक्रमाचे य आणि क्ष वस्तूंच्या उत्पादनावर काय काय परिणाम होतात ते पाहू. नवीन परिस्थितीत वस्तू किमती स्थिर ठेवण्यासाठी घटक-किमती बदलल्या पाहिजेत, म्हणजेच या ठिकाणी भांडवलाची किंमत वाढली पाहिजे. य$^1$य$^1$ आणि क्षक्ष या सउ वक्रांना स्पर्श करणाऱ्या क$^1$ल$^1$ रेषेवरून हे स्पष्ट होते की भांडवलाची किंमत वाढलेली आहे. (क$^1$ल$^1$ ची प्रवणता > कलची प्रवणता). याचे अर्थशास्त्रीय स्पष्टीकरण असे की उद्योग क्षेत्रात तांत्रिक प्रगती झाल्याने त्या क्षेत्रात उत्पादन खर्च कमी झाला आहे. साहजिकच उद्योजक अधिक नफ्यासाठी अधिक उत्पादन करण्यास प्रवृत्त होतील. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील भांडवल आणि श्रम या घटकांची मागणी वाढेल. कारखानदारी क्षेत्र भांडवल-सघन असल्याने भांडवलाला अधिक मागणी येईल म्हणून भांडवलाची सापेक्ष किंमत वाढेल. दुसरे एक कारण असे की श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगतीमुळे

भांडवलाच्या सीउमधील वाढ श्रमाच्या सीउमधील वाढीपेक्षा अधिक असते. त्यामुळेही भांडवलाची मागणी वाढते. परिणामतः भांडवलाची सापेक्ष किंमत वाढते.

याचा दोनही उद्योगातील $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोत्तरावर काय परिणाम होईल हे आता पाहिले पाहिजे. नवीन घटक-किंमत-रेषा क$^1$ल$^1$ ही य$^1$य$^1$ सउ वक्राला र$^2$ बिंदूपाशी स्पर्श करते तर क्षक्ष सउ वक्राला न$^1$ बिंदूपाशी स्पर्श करते. याचा अर्थ शेती विभागात $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोत्तर कमी होते (अन$^1$ची प्रवणता < अनची प्रवणता ). याचे कारण असे की शेती विभागात एक तर तांत्रिक प्रगती झालेली नाही आणि दुसरे म्हणजे अर्थव्यवस्थेत भांडवलाची किंमत वाढत आहे. साहजिकच उद्योजक अधिक श्रम-सघन उत्पादन तंत्र वापरात आणतील. कारखानदारी विभागात मात्र तांत्रिक प्रगतीमुळे $\frac{\text{भांडवल}}{\text{श्रम}}$ गुणोतर वाढलेले आहे. (अर$^2$ची प्रवणता > अरची प्रवणता ). याचे कारण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. अर्थव्यवस्थेत श्रमाची सापेक्ष किंमत घटली आहे म्हणून उद्योजक अधिक श्रम-सघन तंत्र वापरण्याकडे प्रवृत्त होतील हे खरे. परंतु श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगतीमुळे भांडवलाच्या सीउतील वाढ श्रमाच्या सीउतील वाढीपेक्षा अधिक होते म्हणून उद्योजक भांडवल-सघन उत्पादन तंत्र पसंत करतील. आपल्या उदाहरणात श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती भांडवल-सघन उद्योगात झालेली आहे. साहजिकच तुलनेने भांडवलाची किंमत वाढलेली असली तरी उद्योजक अधिक भांडवल-सघन तंत्रच कारखानदारी उद्योगासाठी पसंत करतील.

वर निर्दिष्ट केलेला परिणाम हा अर्थातच, आवश्यक ( necessary ) परिणाम नाही. जर तांत्रिक प्रगतीमुळे उत्पादन खर्च अधिक कमी होऊन नवा सउ वक्र आरंभबिंदूच्या अधिक जवळ सरकला असता तर वरील पेक्षा निराळाच परिणाम प्रत्ययास आला असता. समजा आकृती १६ मध्ये दाखविल्याप्रमाणे य वस्तूचा नवा सउ वक्र य$^2$य$^2$ आहे. आता य$^2$य$^2$ आणि क्षक्ष या सउ वक्रांना स्पर्श करणारी क$^2$ल$^2$ ही रेषा आहे. भांडवलाची किंमत अधिकच वाढल्याने आणि शेती क्षेत्रात तांत्रिक प्रगती न झाल्याने शेती क्षेत्रातील उत्पादन तंत्र अधिक श्रम-सघन झाले आहे. (अन$^2$ची प्रवणता < अनची प्रवणता ). क$^2$ल$^2$ ही घटक-किंमत रेषा य$^2$य$^2$ या सउ वक्राला र$^3$ बिंदूपाशी स्पर्श करते. त्यावरून उद्योग विभागातील भांडवल / श्रम गुणोत्तर कमी झाल्याचे म्हणजे उत्पादन तंत्र पूर्वीच्या तुलनेने अधिक श्रम-सघन झालेले दिसते. (अर$^3$ची प्रवणता < अरची प्रवणता). याचे अर्थशास्त्रीय कारण असे की श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगतीमुळे जरी भांडवलाची सीउ वाढलेली असली तरी तुलनेने भांडवलाची किंमतही अधिक वाढलेली आहे. त्यामुळे दोनही उद्योगातील उत्पादन तंत्र श्रम-सघन होते.

### उत्पादनावरील परिणाम

प्रथम भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती विशेष प्रभावकारी झाली आहे असे मानू. म्हणजेच य चा सउ वक्र आकृती १६ मध्ये दाखविल्याप्रमाणे आरंभबिंदूचे जास्त जवळ सरकला आहे असे मानू. या ठिकाणी दोन्ही विभागांतील उत्पादन तंत्र श्रम-सघन होण्यासाठी एक अट, आपण पाहिल्याप्रमाणे, पुरी करावी लागते. ती म्हणजे श्रम-सघन उद्योगाचा संकोच व भांडवल-सघन उद्योगाचा विस्तार. याचा अर्थ आपल्या प्रतिमानात आयात वस्तूच्या उत्पादनात वाढ तर निर्यात वस्तूच्या उत्पादनात घट होईल. परिणामी, पूर्वी पाहिलेल्या प्रक्रियेमुळे, क्षची किंमत वाढेल तर य ची घटेल. आता,

$\because$ $\dfrac{\text{निर्यात वस्तूंची किंमत}}{\text{आयात वस्तूंची किंमत}}$ हे गुणोत्तर वाढते

$\therefore$ देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर सुधारतो.

वर निर्देश केलेला परिणाम भांडवल-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती विशेष प्रभावी असेल तरच होईल. पण पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे तांत्रिक प्रगती विशेष प्रभावकारी नसेल म्हणजे नवा सउ वक्र य'य' सारखा असेल तर वस्तूंच्या उत्पादनावरील म्हणून व्यापार मूल्यतुल्यता दरावरील परिणाम अगदी वेगळा होईल.

आपण पाहिल्याप्रमाणे य'य' सउ वक्राच्या परिस्थितीत उद्योग विभागातील भांडवल / श्रम गुणोत्तर वाढते तर ते शेती विभागात कमी होते. आपणास हेही माहीत आहे की भांडवल-सघन उद्योगात श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती झाली तर भांडवलाची किंमत वाढते आणि श्रम-सघन उद्योगातील भांडवल / श्रम गुणोत्तर घटते. तांत्रिक प्रगती जेवढी कमी प्रभावी म्हणजे उत्पादन खर्चातील बचत अल्प प्रमाणात करणारी असते त्याप्रमाणे उद्योग विभागातील भांडवल / श्रम गुणोत्तर अधिक प्रमाणात वाढते आणि शेती विभागातील अल्प प्रमाणात कमी होते. याचाच अर्थ भांडवल-सघन उद्योगातील उत्पादनात घट होईल तर श्रम-सघन विभागातील उत्पादनात वाढ होईल. आपल्या प्रतिमानात याचा अर्थ असा होईल की, सार्वत्रिक समतोलाच्या परिस्थितीत, य ची किंमत वाढेल तर क्ष ची किंमत घसरेल.

म्हणजेच,

$\because$ $\dfrac{\text{निर्यात वस्तू किंमत}}{\text{आयात वस्तू किंमत}}$ हे गुणोत्तर कमी होते

$\therefore$ व्यापार मूल्यतुल्यता दर घसरतो.

वरील चर्चेचा सारांश असा की भांडवल-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगतीच्या प्रभावानुसार वस्तूंच्या सापेक्ष किंमतींवर कोणताही परिणाम होऊ शकेल. त्यामुळे देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावर होणारा परिणाम अनिश्चित ( indeterminate ) असतो.

### तांत्रिक प्रगती आणि व्यापार मूल्यतुल्यता दर : निष्कर्ष

| | |
|---|---|
| ( १ ) अविकारी तांत्रिक प्रगती | ज्या विभागात अविकारी तांत्रिक प्रगती होते त्या विभागातील वस्तूंच्या किंमती कमी होतात. |
| | अशी तांत्रिक प्रगती आयात-पर्यायी उद्योगात झाली तर देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर सुधारतो, आणि निर्यात उद्योगात झाली तर तो घसरतो. |
| ( २ ) भांडवल-सघन उद्योगातील भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती | ज्या विभागात या प्रकारची तांत्रिक प्रगती होते त्या विभागातील वस्तूंच्या किंमती कमी होतात. |
| आणि श्रम-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती | निर्यात वस्तू भांडवल-सघन असतील आणि निर्यात उद्योगात भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती झाली तर देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर घसरतो. |

आयात-पर्यायी उद्योगात उत्पादनतंत्र जर श्रम-सघन असले आणि त्या उद्योगात श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती झाली तर देशाचा व्यापार मूल्यतुल्यता दर सुधारेल.

| | |
|---|---|
| ( ३ ) भांडवल-सघन उद्योगातील श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती आणि श्रम-सघन उद्योगातील भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती | या प्रकारची तांत्रिक प्रगती होत असलेल्या उद्योगातील वस्तूंच्या किंमती वाढतील किंवा कमी होतील. त्यामुळे व्यापार मूल्यतुल्यता दरावरील परिणाम अनिश्चित असतो. |

[ ५ ]

## दारिद्र्यकारी अभिवृद्धी ( Immiserizing Growth )


आर्थिक अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढते. अभिवृद्धीबरोबर ज्याप्रमाणे उत्पादन वाढते त्याचप्रमाणे उत्पन्नही वाढते. अभिवृद्धीमुळे वस्तूंच्या पुरवठ्यात जसा बदल होतो तसा वस्तूंच्या मागणीतही होतो. अभिवृद्धीबरोबर आयात आणि निर्यात वस्तूंच्या मागणीत आणि पुरवठ्यात बदल होतो आणि त्यातूनच देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दर सुधारतो किंवा घसरतो. व्यापार अति-प्रतिकूल अभिवृद्धी वगळता, अभिवृद्धी होत असलेल्या देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरात घसरण होते हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. यावरून असे दिसते की अभिवृद्धीचा अर्थव्यवस्थेच्या कल्याणाशी ( welfare ) घनिष्ठ संबंध आहे. अभिवृद्धीचा फायदा त्या देशाला कितपत मिळतो, दुसऱ्या देशांकडे त्यातील फायदा किती व कसा हस्तांतरित होतो हे पाहणे जरुरीचे आहे.

प्रा. जगदीश भगवती[१०] यांनी आपल्या एका लेखात आर्थिक अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेचा कोणालाही फायदा तर नाहीच पण नुकसान होण्याची परिस्थितीही निर्माण होऊ शकेल असे मत मांडले आहे. अभिवृद्धीच्या या परिणामाला ते 'दारिद्र्यकारी अभिवृद्धी' ( immiserizing growth ) असे नाव देतात. त्यांच्या मते, काही विशिष्ट परिस्थितीत, अभिवृद्धीमुळे होणारी व्यापार मूल्यतुल्यता दरातील घसरण इतकी अधिक असेल की त्यामुळे अभिवृद्धीचे फायदे संपूर्ण नाहीसे होऊन अभिवृद्धीपूर्व स्थिती-पेक्षाही निकृष्ट अवस्था प्राप्त होऊ शकेल. आकृती १७ मध्ये तत हा उत्पादन शक्यता वक्र आहे. कल ही वस्तू किंमत रेषा आहे. प आणि र हे अनुक्रमे समतोल उत्पादन आणि उपभोग बिंदू आहेत. प बिंदूशी वस्तू किंमत रेषा आणि उत्पादन शक्यता वक्र एकमेकांना स्पर्श करतात. तर र बिंदूपाशी र$^{१}$स$^{१}$ हा सामाजिक समवृत्ती वक्र ( social indifference curve ) आणि किंमत रेषा किंवा व्यापार मूल्यतुल्यता दर्शवणारी रेषा एकमेकांस स्पर्श करतात. म्हणून प आणि र हे अनुक्रमे समतोल उत्पादन आणि उपभोग बिंदू आहेत.

आता आपण असे मानू की आर्थिक अभिवृद्धीमुळे उत्पादन शक्यता वक्र उजवीकडे सरकला आहे. त$^{१}$त$^{१}$ हा नवीन उत्पादन शक्यता वक्र आहे. प$^{१}$ हा नवीन उत्पादन समतोल दर्शविणारा बिंदू आहे. स्थिर व्यापार मूल्यतुल्यता दराच्या परिस्थितीत नवीन उपभोग बिंदू र च्या उजवीकडे आणि वर प्रस्थापित झाला असता. परंतु अभिवृद्धीमुळे व्यापार मूल्यतुल्यता दरात इतकी घसरण झाली आहे (क$^{१}$ल$^{१}$ची

१०. Jagdish Bhagwati, "Immiserizing Growth : A Geometrical Analysis", *Review of Economic Studies*, June 1958, pp. 201-205.

प्रवणता (कल ची प्रवणता) की नवीन समतोल उपभोग बिंदू र च्या डावीकडे आहे. र¹ हा नवा समतोल बिंदू क¹ल¹ या नव्या व्यापार मूल्यतुल्यता दर दर्शवणाऱ्या रेषेवर आहे. याचाच अर्थ अर्थव्यवस्था अभिवृद्धीमुळे निकृष्ट अवस्थेला पोचलेली आहे. सस हा समवृत्ती वक्र स¹स¹ या समवृत्ती वक्राच्या डावीकडे आहे यावरून हे स्पष्ट होते.




(आकृती क्र. १७)

**दारिद्र्यकारी अभिवृद्धी**

प्रा. भगवती यांनी सूचित केलेला अभिवृद्धीचा दारिद्र्यकारी परिणाम काही विशिष्ट परिस्थितीतच निष्पन्न होतो. अर्थात ती परिस्थिती असाधारण अशीच आहे. उदा. संपूर्ण विशेषीकरणाच्या परिस्थितीत निर्यात वस्तूला असलेली परदेशातील मागणी आणि अभिवृद्धी होत असलेल्या देशाची आयात वस्तूची मागणी अलवचिक (inelastic) असेल तर दारिद्र्यकारी अभिवृद्धी होऊ शकेल. अपूर्ण विशेषीकरणाच्या परिस्थितीत वाढत्या उत्पादन घटकाचे उपयोजन जर केवळ निर्यात उद्योगातच झाले असेल, निर्यात वस्तुला असलेली परदेशातील मागणी अलवचिक असेल, किंवा आयात वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादनात केवल घट झाली असेल तर दारिद्र्यकारी अभिवृद्धी संभवते.

अर्थात दारिद्र्यकारी अभिवृद्धीची परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी अशा देशांकडून संरक्षक व्यापार नीती ( protective commercial policy ) स्वीकारली जाईल किंवा वस्तू उत्पादनाची संरचना ( production structure ) बदलण्याचे धोरण स्वीकारले जाईल.

[ ६ ]

## विकसनशील देश, आर्थिक अभिवृद्धी आणि व्यापार मूल्यतुल्यता दर

अभिवृद्धीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढते हे आपण पाहिले. अभिवृद्धी दोन कारणांमुळे होते, एक म्हणजे लोकसंख्यावाढीतून आणि भांडवलसंचयातून होणारी अनुक्रमे श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांमधील वाढ, आणि दुसरे म्हणजे तांत्रिक प्रगती. अभिवृद्धीचा परिणाम जसा उत्पादनावर होतो तसा उत्पन्नावर आणि त्यातून वस्तूंच्या मागणीवर होतो. अभिवृद्धीमुळे होणारा सर्वच्या सर्व लाभ त्या देशाला मिळतो की विदेशी व्यापारांमुळे होणाऱ्या व्यापार मूल्यतुल्यता दरातील घसरणीतून त्याचा काही भाग इतर देशांकडे जातो हे पाहणे जरूरीचे ठरते. प्रा. भगवती यांनी सूचित केलेल्या दारिद्र्यकारी अभिवृद्धीचे उदाहरण आपण पाहिलेच आहे. डॉ. प्रेबिश प्रभृती अर्थशास्त्रज्ञांच्या मते विकसनशील देशांचा व्यापार मूल्यतुल्यता दर अपरिहार्यपणे घसरतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जागतिक अर्थव्यवस्थेत जी केंद्र-परीघ ( centre-periphery ) अशी व्यवस्था निर्माण झाली आहे ती विकसनशील देशांना फारसा दिलासा देऊ शकत नाही. कारण विकसनशील देशांतील अभिवृद्धीचे फायदे घसरणाऱ्या व्यापार मूल्यतुल्यता दराच्या द्वारे विकसित राष्ट्रांकडेच जातात. प्रेबिश यांनी मांडलेल्या विचारासंबंधी खूप चर्चा

झाली आहे. त्यांच्या मतांचे खंडन आणि मंडन करणारे संशोधनही प्रसिद्ध झाले आहे आणि अजून होत आहे. याच संदर्भात अभिवृद्धीच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी हिक्स, जॉन्सन, कॉर्डेन प्रभृतींनी सुचवलेल्या पद्धतीचा चांगला उपयोग होऊ शकेल. या लेखात आतापर्यंत आपण ती पद्धती समजून घेण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तुत लेखाच्या या विभागात अभिवृद्धीच्या एकूण प्रक्रियेचा, त्यातून होणाऱ्या परिणामांचा आणि विशेषतः त्या प्रक्रियेचा देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावर होणाऱ्या परिणामाचा येथे सारांश-रूपाने आढावा घ्यावयाचा आहे. अविकारी, व्यापार-अनुकूल (अ), व्यापार-प्रतिकूल (प्र), व्यापार अति-अनुकूल (अअ) आणि व्यापार अति-प्रतिकूल (अप्र) अभिवृद्धी या संकल्पना आपण या लेखांत अभ्यासल्या आहेत. त्यांच्या आधारे आणि अभिवृद्धीच्या संकुलित परिणामातील उत्पादन आणि उपभोग परिणामातील फरक लक्षात घेऊन आपण निरनिराळ्या प्रकारच्या अभिवृद्धीचे विश्लेषण करू. आपल्या प्रतिमानात आपण खालील गोष्ट मानू. अभिवृद्धीचे परिणाम आपण दोन प्रकारच्या अर्थव्यवस्थांच्या संदर्भात अभ्यासत आहोत. एक म्हणजे शेतीप्रधान देशाची, अन्नधान्ये व कच्चा माल निर्माण करून निर्यात करणारी आणि कारखानदारी मालाची आयात करणारी अर्थव्यवस्था. दुसरी म्हणजे कारखानदारी (पक्का) माल निर्माण करून निर्यात करणारी आणि कच्चा माल आयात करणारी विकसित औद्योगिक देशाची अर्थव्यवस्था. आपण असे मानू की दोनही देशांत अपूर्ण विशेषीकरणाची परिस्थिती आहे. म्हणजे प्रत्येक देशात जसे निर्यात वस्तूचे उत्पादन होते त्याप्रमाणे काही प्रमाणात आयात किंवा आयात-स्पर्धक वस्तूंचेही उत्पादन होते. शेतीमाल उत्पादनात श्रम-सघन आणि उपभोगात आवश्यक (necessary) स्वरूपाचा आहे, आणि कारखानदारी माल उत्पादनात भांडवल-सघन आणि उपभोगात चैनीच्या स्वरूपाचा (luxury) आहे असे मानू. असेही मानू की भांडवल हा घटक (भांडवलाचा धारक) श्रम (श्रमिक) या घटकापेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक सुस्थितीत आहे. याचाच अर्थ असा की कारखानदारी मालाच्या उपभोगातील भांडवलाची सीमांत आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती श्रमापेक्षा अधिक आहे. त्याचप्रमाणे श्रम या घटकाची अन्नधान्ये इत्यादी शेतीमालाची सीमांत आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती भांडवलापेक्षा अधिक आहे.

अभिवृद्धी दोन प्रकारांनी घडते. उत्पादनफल बदलून टाकणारी तांत्रिक प्रगती आणि उत्पादन-फलात बदल न होता लोकसंख्या आणि भांडवलसंचय या दोन घटकांमधील वाढीमुळे झालेली अभिवृद्धी.

घटकसंचयाच्या (factor accumulation) उत्पादन परिणामाचा अभ्यास करण्यासाठी रिबझिन्स्की प्रमेय उपयुक्त आहे. त्या प्रमेयानुसार स्थिर व्यापार मूल्यतुल्यता दराच्या स्थितीत एका घटकात वाढ होत असताना तो घटक ज्या वस्तूच्या उत्पादनात सघनपणे उपयोजला जातो त्या वस्तूच्या उत्पादनात केवल वाढ होते आणि ज्या वस्तूंच्या उत्पादनात तो घटक तुलनेने कमी सघनपणे उपयोजला जातो त्या वस्तूच्या उत्पादनात केवल घट होते. अन्नधान्यासारखा शेतीमाल श्रम-सघन आहे आणि कारखानदारी माल भांडवल-सघन आहे असे मानले आहे. स्थिर व्यापार मूल्यतुल्यता दराच्या परिस्थितीत शेतीप्रधान अर्थव्यवस्थेतील भांडवल या घटकांतील वाढीमुळे शेतमालाच्या उत्पादनात केवल घट होईल आणि कारखानदारी मालाच्या उत्पादनात केवल वाढ होईल. म्हणजेच शेतीप्रधान देशावर भांडवल-संचयाचा व्यापार अति-प्रतिकूल परिणाम होईल तर कारखानदारी देशांत व्यापार अति-अनुकूल परिणाम होईल. त्याचप्रमाणे लोकसंख्यावाढीचा औद्योगिक अर्थव्यवस्थेवर व्यापार अति-प्रतिकूल परिणाम होईल तर शेतीप्रधान अर्थव्यवस्थेवर व्यापार अति-अनुकूल परिणाम होईल.

याचाच अर्थ, व्यापार मूल्यतुल्यता दर स्थिर असता, उत्पादनातील सर्व वाढ, वाढ होत असलेल्या घटकाकडे उत्पन्न म्हणून जाईल. घटकांच्या सीमांत आणि सरासरी उपभोग प्रवृत्तीच्या आपल्या गृहीतानुसार भांडवलातील वाढीचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेतील कारखानदारी मालावरील खर्च होणारे उत्पन्नाचे सरासरी प्रमाण वाढेल. त्याचप्रमाणे लोकसंख्यावाढीमुळे शेतमालावरील खर्च होणारे उत्पन्नाचे सरासरी प्रमाण वाढेल. याचाच अर्थ भांडवलसंचयाचा उपभोग परिणाम कारखानदारी देशात व्यापार अति-प्रतिकूल होईल तर शेतीप्रधान देशात व्यापार अति-अनुकूल होईल; लोकसंख्यावाढीचे उपभोग परिणाम दोनही देशांवर वरीलपेक्षा अगदी उलट प्रकारचे होतील. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे व्यापार अति-प्रतिकूल उत्पादन परिणाम उपभोग परिणामापेक्षा प्रभावी ठरतो तर व्यापार अति-अनुकूल उत्पादन परिणाम व्यापार अति-प्रतिकूल संकुलित परिणाम होऊ देणार नाही. यावरून असे म्हणता येते की आपल्या प्रतिमानातील गृहीतानुसार शेतीप्रधान देशात भांडवलसंचय आणि कारखानदारी देशात लोकसंख्यावाढ नेहमीच व्यापार अति-प्रतिकूल ठरतील. त्याचप्रमाणे इतर प्रकारच्या घटक-संचयामुळे ( शेतीप्रधान देशात लोकसंख्या वाढ आणि कारखानदारी देशात भांडवल-संचय ) व्यापार अति-अनुकूलपासून ते व्यापार प्रतिकूल यापैकी कोणताही परिणाम होऊ शकेल, पण व्यापार अति-प्रतिकूल परिणाम मात्र निश्चित असणार नाही.

आता आपण तांत्रिक प्रगतीच्या परिणामांकडे वळू. हिक्स यांनी सुचविल्याप्रमाणे भांडवल / श्रम गुणोत्तरातील बदलानुसार आपण तांत्रिक प्रगती कोठल्या प्रकारची आहे हे ठरवतो. अविकारी तांत्रिक प्रगतीत भ/स गुणोत्तर स्थिर असते. अविकारी तांत्रिक प्रगती ज्या उद्योगात होते त्या उद्योगातील उत्पादन वाढते तर दुसऱ्या उद्योगातील ( दोन वस्तूंच्या उत्पादनाच्या संदर्भात ) कमी होते. याचाच अर्थ अविकारी तांत्रिक प्रगतीचे अति-अभिनत ( ultra-biased ) परिणाम असतात. कारखानदारी विभागातील अविकारी तांत्रिक प्रगतीचा उत्पादन परिणाम कारखानदारी देशात व्यापार अति-अनुकूल असतो तर शेतीप्रधान देशात व्यापार अति-प्रतिकूल असतो. याउलट शेती विभागातील अविकारी तांत्रिक प्रगतीचे परिणाम दोनही देशांत वरीलपेक्षा उलट प्रकारचे होतील.

आता अति-अभिनत तांत्रिक प्रगतीचा विचार करू. हिक्स यांच्या व्याख्येप्रमाणे ज्या उद्योगात अभिनत ( biased ) प्रकारची तांत्रिक प्रगती होते त्या उद्योगातील घटक गुणोत्तर ( भ/स ) बदलते. तांत्रिक प्रगतीमध्ये ज्या घटकाचे दुसऱ्या घटकाशी असलेले पूर्वीचे इष्ट गुणोत्तर बदलते त्या प्रगतीला तो घटक-न्यूनयक ( factor-saving ) तांत्रिक प्रगती असे म्हणतात. उदा. भ/स गुणोत्तर वाढवणाऱ्या तांत्रिक प्रगतीला श्रम-न्यूनयक (श्रमाची बचत करणारी, labour-saving) तांत्रिक प्रगती म्हणतात तर भ/स गुणोत्तर कमी करणाऱ्या तांत्रिक प्रगतीला भांडवल-न्यूनयक ( capital-saving ) तांत्रिक प्रगती म्हणतात. आता आपण कारखानदारी विभागातील अभिनत तांत्रिक प्रगतीचा विचार करू. कारखानदारी वस्तू ( य ) आणि शेतीमाल ( क्ष ) यांच्या मधील किंमत गुणोत्तर स्थिर ठेवण्यासाठी शेती विभागाकडून कारखानदारी विभागाकडे साधनसामग्रीचे उपयोजन वळेल. साहजिकच कारखानदारी विभागात सघनपणे उपयोजल्या जाणाऱ्या घटकाच्या किमतीत वाढ होईल. भांडवलाच्या वाढत्या किमतीमुळे अर्थव्यवस्थेच्या दोन्ही विभागात भांडवलाऐवजी श्रमाचे उपयोजन वाढेल. याचाच अर्थ तांत्रिक प्रगती न झालेल्या, म्हणजेच स्थितिशील ( static ) विभागातील भ/स गुणोत्तर निःसंदिग्धपणे कमी होईल. याचाच अर्थ कारखानदारी विभागातील तांत्रिक प्रगती जर भांडवल-न्यूनयक, अविकारी किंवा अल्पशी श्रम न्यूनयक

असेल तर त्या विभागातही भ/स गुणोत्तर पूर्वीच्या मानाने कमी होईल. याचाच अर्थ दिलेल्या घटक उपलब्धतेच्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेतील उत्पादक साधनसामग्री, पूर्ण रोजगार स्थिती कायम ठेवण्यासाठी, श्रम-सघन विभागाकडून भांडवलसघन विभागाकडे वळेल. म्हणजेच तांत्रिक प्रगती कारखानदारी मालाकडे अति-अभिनत ( ultra-biased ) प्रकारची असेल.

परंतु तांत्रिक प्रगती जर प्रभावीपणे श्रम-न्यूनयक असेल, म्हणजेच भांडवलाऐवजी श्रमाचे उपयोजन वाढवणारी पर्याय-परिणाम-प्रतितुलीत (substitution effect offsetting) करणारी असेल तर कारखानदारी उद्योगातील नवे भ/स गुणोत्तर पूर्वीपेक्षा अधिक असेल. म्हणजे कारखानदारी उद्योगातील वाढलेले भ/स गुणोत्तर आणि शेती विभागातील कमी झालेले भ/स गुणोत्तर अशी परिस्थिती असता अर्थव्यवस्थेतील साधनसामग्री, एकूण घटक गुणोत्तर ( भ/स ) कायम ठेवण्यासाठी दोनही विभागात या किंवा त्या दिशेने वळेल. या परिस्थितीत कारखानदारी विभागातील तांत्रिक प्रगती कारखानदारी मालाकडे अति-अभिनत किंवा शेतमालाकडे अति-अभिनत या दोन टोकांपैकी कोणतीही असू शकेल.

आता तांत्रिक प्रगतीच्या उपभोग परिणामाकडे वळू. पूर्वीचाच उत्पादन खर्च स्थिर ठेवण्यासाठी कमी सघनपणे उपयोजल्या जाणाऱ्या घटकाची किंमत तुलनेने कमी होते तर अधिक सघनपणे उपयोजल्या जाणाऱ्या घटकाची किंमत तुलनेने वाढते. आपण जर उपभोगातील अति-अभिनत परिणाम विचारात घेतला नाही तर कारखानदारी विभागातील तांत्रिक प्रगतीमुळे ( येथे श्रम हा कमी सघनपणे उपयोजला जाणारा घटक आहे ) श्रम या घटकाचे उत्पन्न कमी होते आणि म्हणून शेती मालाला असलेली मागणी कमी होते. याचाच अर्थ कारखानदारी विभागातील तांत्रिक प्रगतीमुळे कारखानदारी देशात व्यापार अति-प्रतिकूल उपभोग परिणाम होईल तर शेतीप्रधान देशात व्यापार अति-अनुकूल उपभोग परिणाम होईल. शेती विभागातील तांत्रिक प्रगतीचे उपभोग परिणाम शेती अर्थव्यवस्थेवर मात्र वरील-पेक्षा उलट प्रकारचे होईल.

अभिवृद्धीच्या उत्पादन आणि उपभोग परिणामाच्या येथवरच्या चर्चेच्या आधारे अभिवृद्धीचा देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावर कोणता परिणाम होईल ते ठरवता येते. उदाहरणार्थ, लोकसंख्या-वाढीच्या शेतीप्रधान देशाच्या व्यापार मूल्यतुल्यता दरावरील परिणाम असा होईल :

रिब्झिन्स्की प्रमेयाप्रमाणे शेतमालाच्या म्हणजे निर्यात मालाच्या उत्पादनात केवल वाढ होईल व कारखानदारी मालाच्या उत्पादनात केवल घट होईल. याचा अर्थ लोकसंख्यावाढीचा व्यापार अति-अनुकूल उत्पादन परिणाम होईल. शिवाय शेती विभाग श्रम-सघन आहे म्हणून कमी सघनपणे वापरल्या जाणाऱ्या भांडवल या घटकाचे उत्पन्न घटेल आणि कारखानदारी मालाला असलेली मागणी कमी होईल. म्हणजेच आयात वस्तूची मागणी कमी होईल. याचाच अर्थ उपभोग परिणाम व्यापार प्रतिकूल स्वरूपाचा असेल. म्हणून वरील प्रकारच्या अभिवृद्धीचा संकुलित परिणाम व्यापार अति-अनुकूल ते व्यापार प्रतिकूल प्रकारचा असेल. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे याचा परिणाम म्हणून $\frac{\text{निर्यात वस्तू किंमत}}{\text{आयात वस्तू किंमत}}$ हे गुणोत्तर कमी होईल. म्हणजेच व्यापार मूल्यतुल्यता दर घसरेल.

वरील प्रकारच्या विश्लेषणातून अभिवृद्धीचा व्यापार मूल्यतुल्यता दरावरील परिणाम अजमावता येईल. खालील तक्त्यात त्यासंबंधी माहिती एकत्र केली आहे.

### आर्थिक अभिवृद्धीचे परिणाम

| अभिवृद्धीचा प्रकार | उद्योगप्रधान देश | | | | शेतीप्रधान देश | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन परिणाम | उपभोग परिणाम | संकुलित परिणाम | व्यापार मूल्य-तुल्यता दरावरील परिणाम | उत्पादन परिणाम | उपभोग परिणाम | संकुलित परिणाम | व्यापार मूल्य-तुल्यता दरावरील परिणाम |
| भांडवलातील वाढ | अअ | प्र | अअ ते प्र | घसरण (–) | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) |
| लोकसंख्या वाढ | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) | अअ | प्र | अअ ते प्र | घसरण (–) |
| अविकारी तांत्रिक प्रगती | | | | | | | | |
| (१) कारखानदारी विभाग | अअ | प्र | अअ ते प्र | घसरण (–) | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) |
| (२) शेती विभाग | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) | अअ | प्र | अप्र ते प्र | घसरण (–) |
| भांडवल-न्यूनयक तांत्रिक प्रगती | | | | | | | | |
| (१) कारखानदारी विभाग | अअ | प्र | अअ ते प्र | घसरण (–) | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) |
| (२) शेती विभाग | अप्र ते अअ | अ | अप्र ते अअ | अनिश्चित | अअ ते अप्र | प्र | अअ ते अप्र | अनिश्चित |
| श्रम-न्यूनयक तांत्रिक प्रगती | | | | | | | | |
| (१) कारखानदारी विभाग | अअ ते अप्र | प्र | अअ ते अप्र | अनिश्चित | अप्र ते अअ | अ | अप्र ते अअ | अनिश्चित |
| (२) शेती विभाग | अप्र | अ | अप्र | सुधारणा (+) | अअ | प्र | अअ ते प्र | घसरण (–) |

अ = व्यापार अनुकूल  प्र = व्यापार प्रतिकूल

अअ = व्यापार अति-अनुकूल  अप्र = व्यापार अतिप्रतिकूल

(–) व्यापार मूल्यतुल्यता दरातील घसरण (+) व्यापार मूल्यतुल्यता दरातील सुधारणा

■ ■

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची करव्यवस्था*

रमेश पानसे

## प्रास्ताविक

महाराष्ट्रातील करव्यवस्थेचा विचार तीन स्तरांवरून करायला हवा. हे तीन स्तर म्हणजे, (१) राज्यपातळीवरील करव्यवस्था (२) ग्रामीण भागासाठी स्वीकारलेल्या पंचायतराज शासन संस्थांची करव्यवस्था आणि (३) राज्यांतर्गत शहरी विभागातील स्वायत्त शासन संस्थांची करव्यवस्था. ही अशी त्रिस्तरीय विभागणी करण्याचे कारण असे की, राज्यांतर्गत शासकीय कार्यांची विभागणी या पद्धतीने केली गेली आहे. उदा. संपूर्ण राज्याची प्रशासकीय व विकासविषयक कार्यांची जबाबदारी मूलतः राज्य सरकारवर असली तरीही, तदंतर्गत वेगवेगळ्या लहान-मोठ्या शहरांसाठी नगरपालिका वा महानगरपालिका या स्वायत्त संस्था म्हणून कार्य करीत आहेत. तसेच ग्रामीण भागाच्या विकासासाठी, जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती अशी पुन्हा त्रिस्तरीय यंत्रणा १ मे १९६१ पासून महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. साहजिकच ज्यांच्यावर काही आर्थिक सामाजिक कार्यांच्या जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत त्यांना उत्पन्नाचे काही मार्गही असणे आवश्यक आहे, आणि अशा तऱ्हेची प्रत्यक्ष व्यवस्थाही कायद्याने अस्तित्वात आणलेली आहे.

या विविध स्तरांवरील शासन संस्थांची कार्यक्षेत्रे आणि त्यांच्या उत्पन्नाचे मार्ग यांचा परस्पर मेळ कशा प्रकारे घातला जातो, प्रत्येक स्तरावरील उत्पन्नाचे महत्त्वाचे मार्ग कोणते, यात उत्पन्नाचे एक साधन म्हणून करांचे नेमके स्थान काय आहे, आणि एकूणच राज्यांतर्गत करव्यवस्था विविध स्तरांवर कशा प्रकारे राबविली जाते, तसेच त्यातून कोणत्या प्रकारचे प्रश्न उद्भवतात यांचा स्थूल विचार महाराष्ट्रातील एकूण करव्यवस्थेत करता येईल. या निबंधाच्या मर्यादित अभ्यासात मुख्यतः ग्रामीण विभागातील पंचायतराज संस्थांची करव्यवस्था, यावरच लक्ष केंद्रित केले आहे. अर्थातच या ठिकाणी महाराष्ट्र सरकारच्या व शहरी विभागातील स्वायत्त शासनसंस्थांच्या करव्यवस्थेचा भाग विचारात घेतलेला नाही. निबंधाच्या शेवटी या अभ्यासाचे काही महत्त्वाचे निष्कर्ष आणि काही उपयुक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

* या शोध निबंधासाठी चर्चा व मदत केल्याबद्दल श्री. कृ. रा. चवाथे, उपसचिव, श्री. चं. ता. रेळे, सहाय्यक सचिव, व श्री. स. आ. कोळी, अधिक्षक, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा मी आभारी आहे.

## कायदेशीर अधिकार

राज्य सरकारची कार्ये आणि त्याचे वित्तविषयक अधिकार हे भारतीय राज्य घटनेने ठरवून दिलेले आहेत. राज्य सरकारची कार्ये कोणती हे भारतीय संविधानाच्या २४६ व्या कलमातील तिसऱ्या उपकलमान्वये ( भाग ११ वा, प्रकरण पहिले ) निर्माण केलेल्या 'राज्यसूची'त ( सातवी अनुसूची-सूची दुसरी ) सविस्तरपणे दिलेले असून, ही कार्ये राबविण्यासाठी केलेली वित्तविषयक तरतूद, भारतीय संविधानातील विभाग १२ मधील २६८ ते २७२ व २९३ या कलमांनुसार केलेली आहे.

पंचायतीराज यंत्रणेमधील, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या कार्यक्षेत्र निश्चिती आणि वित्तविषयक अधिकारांची तरतूद, 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम ( १९६१ )' या महाराष्ट्र राज्य सरकारच्या स्वतंत्र कायद्यान्वये करण्यात आलेली आहे. यापैकी ग्रामपंचायत ही स्वतंत्र शासनसंस्था असून तिचे नियंत्रण 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ( १९५८ )' या स्वतंत्र कायद्याद्वारे करण्यात आलेले आहे. अर्थात तरीही रचनात्मकदृष्ट्या व कार्यदृष्ट्या ती जिल्हा परिषदेशी जोडण्यात आलेली आहे.[१]

नगरपालिकांसारख्या शहरी भागांच्या स्थानिक शासन संस्थांच्या कार्यांचे व वित्तविषयक अधिकारांचे नियम तत्संबंधी स्वतंत्र कायद्याद्वारे करण्यात आलेले आहे. उदा. मुंबई महानगरपालिकेचे वित्तविषयक अधिकार मुंबई महानगरपालिका कायद्यान्वये ठरवून दिलेले आहेत, तर इतर नगरपालिकांचे अधिकार 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ( १९६५ )' या कायद्यान्वये ठरविण्यात आले आहेत.

## महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची करव्यवस्था

महाराष्ट्रात २३९३० ग्रामपंचायती असून त्यांच्या अंमलाखाली ३५७७८ गावे व एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी ९८·८ टक्के लोकसंख्या आलेली आहे. अधिनियमाच्या पहिल्या परिशिष्टात, ग्रामपंचायती कोणत्या प्रकारची कामे करू शकतात हे सांगितलेले असून, कलम १२४ मध्ये त्यांचे करविषयक अधिकार सांगण्यात आलेले आहेत. ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचे प्रमुख मार्ग म्हणजे,

( अ ) स्वतः बसविलेले कर, फी इ.,
(आ) देणग्या, भेटी, दंड व इतर मार्ग,
( इ ) राज्य सरकार, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांकडून मिळणारी अनुदाने.

'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८' च्या कलम १२४ अन्वये, ग्रामपंचायत स्वतः विविध असे १८ प्रकारचे कर नागरिकांवर लादू शकते. अर्थात् त्यातील महत्त्वाचे कर म्हणजे, जमिनी व घरांवरील कर; जकात, बाजार व आठवड्याच्या बाजारांवरील फी; सामान्य व खास स्वच्छता उपकर, आणि सामान्य व खास पाणीपट्टी हे होत.

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्नाचा व करविषयक व्यवस्थेचा विचार या ठिकाणी एकत्रितपणे करण्यात आलेला आहे. तक्ता क्र. १ मध्ये ( सर्व तक्ते अखेरीस दिले आहेत ) महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींचे मिळून एकूण सरासरी व दरडोई उत्पन्न दाखविण्यात आलेले आहे. त्यावरून असे दिसून येईल की, महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्नात सातत्याने लक्षणीय अशी वाढ झालेली

---

१. इनामदार एन. आर., 'महाराष्ट्र' इन 'पॅटर्न्स ऑफ पंचायतीराज इन इंडिया' संपादक, जी. रामरेड्डी, द मॅकमिलन कंपनी ऑफ इंडिया लि., मद्रास.

आहे. १९६०–६१ साली हे उत्पन्न ४९२ लाख रुपये होते, ते १९७०–७१ साली १६२७ लाखांवर व १९७३–७४ साली २९५५ लाखांवर गेले. टक्केवारीने पाहता, १९६०–६१ च्या तुलनेत १९७०–७१ साली ३३० टक्के व १९७३–७४ साली ५९९ टक्के अशी या उत्पन्नात वाढ झाली.

१९६०–६१ ते १९७३–७४ या कालात ग्रामपंचायतींचे दरडोई उत्पन्न १.७९ रुपयांवरून ८.४२ रुपयांपर्यंत सातत्याने वाढत गेलेले आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे हे दरडोई उत्पन्न, त्याच वर्षीच्या इतर सर्व राज्यांतील अशा उत्पन्नापेक्षा जास्त आहे ( तक्ता क्र. ४, शेवटचा स्तंभ ). उपरोक्त कालात, करवसुलीची क्षमता मात्र वाढलेली नाही. ती ५७–५८ टक्क्यांच्या आसपास कायम राहिलेली आहे ( तक्ता क्र. २ ). या दरडोई उत्पन्नवाढीचे एक प्रमुख कारण म्हणजे सरकारी अनुदानांची प्रतिवर्षी वाढणारी रक्कम होय असे म्हणता येईल.

ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचे विविध मार्ग व एकूण उत्पन्नातील त्यांचा वाटा पाहिला असता, ग्रामपंचायतींच्या संदर्भातील करविषयक उत्पन्नाचे तुलनात्मक महत्त्व ठरविता येईल. तक्ता क्र. ३ मध्ये ही माहिती दिलेली आहे.

१९६०–६१ ते १९७३–७४ या कालावधीत, ग्रामपंचायतींना करांच्या मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण सातत्याने कमी होत चालले आहे ही एक विचारात घेण्यासारखी गंभीर बाब आहे. १९६०–६१ ला ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील ४०.९ टक्के रक्कम करांच्या रूपाने येत होती. परंतु १९७३–७४ पर्यंत ही रक्कम १६.७ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. करांचे उत्पन्न प्रमाण नुसतेच कमी झालेले नाही तर ते सातत्याने कमी होत गेलेले आहे ही दिशाही महत्त्वाची आहे. याच कालावधीत ग्रामपंचायतींना, सरकारकडून अनुदानांच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण मात्र ४१.७ टक्क्यांवरून ६१.२ टक्क्यांपर्यंत वाढले असून या वाढीतही सातत्य आहे, ही देखील एक स्वतंत्रपणे विचारात घेण्याची गंभीर बाब आहे.

याच ( क्र. ३ ) तक्त्यावरून आणखीही एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी की, १९६०–६१ ते १९७३–७४ या कालात सर्व ग्रामपंचायतींनी मिळून जमविलेली कर रक्कम २०१.६० लाख रुपयांवरून ४९४.५४ लाख रुपयांवर गेली. म्हणजे ही वाढ २४५ टक्के एवढी होती. याचबरोबर सरकारी अनुदानातून प्राप्त झालेली रक्कम, याच काळात, २०६ लाख रुपयांवरून १८०८ लाख रुपयांवर गेली, म्हणजे ८७६ टक्क्यांनी वाढली. यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, करप्रयत्नांपेक्षा ग्रामपंचायतींचा वाढता भर सरकारी अनुदानांवरच आहे. अर्थातच त्यांचे उत्पन्नाच्याबाबतीत सरकारवरील परावलंबित्व वाढतच चालले आहे. या ठिकाणी याच संदर्भात, महाराष्ट्राची देशातील इतर राज्यांशी केलेली तुलना उपयुक्त ठरू शकेल. तक्ता क्र. ४ वरून हे स्पष्ट होईल की, ओरिसा व राजस्थान ही दोन राज्ये सोडली तर इतर सर्व राज्यांपेक्षा महाराष्ट्रात, ग्रामपंचायतींच्या करउत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण सर्वात कमी आहे.

सरकारकडून किंवा जिल्हापरिषदा, पंचायत समित्या यांच्याकडून अधिक रकमेने अनुदाने मिळाल्याने ग्रामपंचायतींची खर्चाच्या बाबतीतील स्वायत्तताही कमी होत जाते. याचे कारण असे की, ग्रामपंचायतींना मिळणारी बरीचशी अनुदाने ही खास ठरवून दिलेल्या कामासाठीच असतात व ती त्याच कामासाठी खर्चावी लागतात. त्यामुळे असे मिळणारे उत्पन्न, स्थानिक प्राधान्यानुसार बदल करून खर्च करण्याचे स्वातंत्र्य ग्रामपंचायतींना राहत नाही.

या वाढत्या रकमेच्या अनुदानांचा परिणामही विचारात घ्यायला हवा. या वाढत्या अनुदानांमुळे एकीकडे ग्रामपंचायतींची उत्पन्नवाढीसाठी करांच्या मार्गांचा वापर करण्याची प्रवृत्ती कमी होते तर दुसरीकडे या वाढत्या अनुदानांबरोबर अपरिहार्यपणे सरकारचे ग्रामपंचायतींवरील वर्चस्वही वाढत जाते. या वित्तीय व त्यामुळे निर्माण होणाऱ्या शासकीय वर्चस्वामुळे ग्रामपंचायतींची स्वायत्तता कमी होत जाते. कोणत्याही शासनाच्या संदर्भात असा नियम गृहीत धरायला हवा की, ज्या प्रमाणात वरच्या स्तरावरील सरकारांकडून मिळणारे अनुदान वाढत असते तेवढ्या प्रमाणात त्या शासनाची स्वायत्तता घटत जाते आणि अर्थातच स्वायत्तता जेवढी कमी होते, तेवढा विकास प्रयत्नांतील लोकांचा उत्स्फूर्त सहभाग कमी होतो, आणि नोकरशाहीच्या अधिकाऱ्यांचेच प्राबल्य अधिक राहते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या शासनव्यवहारांच्या संदर्भात नेमकी हीच गोष्ट घडलेली आहे. तक्ता क्रमांक ५ मध्ये दाखविल्या-प्रमाणे, महाराष्ट्र सरकार स्वतः आपल्या उत्पन्नापैकी सुमारे २५ टक्के उत्पन्नासाठी केंद्र सरकारच्या अनुदानावर अवलंबून असून, त्याच्या स्वतःच्या उत्पन्नातील करांचा वाटा सुमारे ५३ टक्के आहे. परंतु खालच्या स्तरांवर ही परावलंबित्वाची प्रवृत्ती अधिकच तीव्र झालेली आहे. उदा. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या एकूण उत्पन्नात करांचा वाटा (१९७१–७२ साली) फक्त ५ टक्के असून ८१ टक्के उत्पन्नासाठी जिल्हा परिषदा राज्य सरकारवर अवलंबून होत्या. तसेच (त्या वर्षी), ग्रामपंचायतीचे करांपासूनचे उत्पन्न फक्त २६ टक्के असून सुमारे ५५ टक्के उत्पन्न त्यांना वरच्या स्तरांवरील सरकार-कडून अनुदान रूपाने प्राप्त होत होते. पुढील काळात तर हे परावलंबित्व वाढत गेल्याचे आपण यापूर्वी पाहिलेच आहे (तक्ता क्र. ३).

अशा प्रकारे महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे स्वतःच्या करांच्या मार्गाने मिळविलेल्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे सातत्याने घसरत गेले आहे हे आपण पाहिले. यातही जिल्हावार प्रमाण तपासून पाहिले तर असे दिसून येते की, विविध जिल्ह्यांच्या करप्रयत्नांत फार मोठे फरक आहेत (तक्ता क. ६). जळगाव जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात जास्त, म्हणजे ३८·१० टक्के आहे, तर बीड जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात कमी, म्हणजे फक्त ०·७८ टक्के आहे. तक्ता क्र. ६ वरून ठळकपणे जाणवणारी आणखी एक गोष्ट अशी की, मराठवाड्याच्या पाचही जिल्ह्यांचा या प्रमाणाच्या बाबतीत शेवटचा क्रमांक लागतो.

तक्ता क्रमांक ७ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा दरडोई खर्च आणि त्यांना मिळणाऱ्या सरकारी अनुदानांचे दरडोई प्रमाण दाखविलेले आहे. त्यावरून असे दिसून येईल की, १९६०–६१ साली ग्रामपंचायती आपल्या खर्चातील पन्नास टक्के रक्कम सरकारी अनुदानांतून मिळवीत असत. १९७३–७४ साली ग्रामपंचायतींनी दरडोई ७ रुपये ८० पैसे खर्च केले व त्यातील ५ रुपये १५ पैसे, म्हणजे खर्चाच्या ६६ टक्के रक्कम, त्यांना सरकारकडून मिळाली होती. सर्व पंचायतींनी एकत्रितरित्या मिळविलेल्या करउत्पन्नाचे त्यांच्या खर्चाशी असलेले प्रमाण १९६०–६१ साली ४९ टक्के होते ते १९७३–७४ साली १८ टक्क्यां-पर्यन्त खाली आले आहे (तक्ता क्रमांक ८). थोडक्यात पंचायतींकडून मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात असला तरी त्यासाठी कररूपाने फारच थोडा पैसा गोळा होतो. आणि बहुतेक खर्च सरकारकडूनच भागविला जातो. म्हणजे सरकारने त्यांना पैसा पुरविण्यावरच त्यांचे कार्य अवलंबून असते. गावातील लोकांनी स्वतःच्या साधनांतून स्वतःच्या कल्याणाच्या योजना कार्यान्वित करणे ही त्यांच्या मूलभूत स्वरूपाशी सुसंगत असलेली गोष्ट, घडून येत नाही हे स्पष्ट आहे.

वास्तविक ग्रामपंचायतींना उत्पन्नाचे विविध मार्ग उपलब्ध असूनही त्यांचा वापर करण्यास या

शासनसंस्था उत्सुक नसतात व जे उत्पन्नाचे मार्ग त्या वापरतात त्यातून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळू शकेल अशी तजवीज नसते. तक्ता क्रमांक ९ मध्ये ग्रामपंचायतींना विविध मार्गांनी मिळणारे उत्पन्न दर्शविलेले आहे. त्यांना अधिक उत्पन्न प्राप्त करून देणारा प्रमुख कर म्हणजे जमिनी व घरांवरील कर होय. एकूण उत्पन्नाच्या ३८ टक्के रक्कम या करापासून त्यांना प्राप्त होते. कायद्याने जमीन महसुलावरील उपकर दर रुपयास २० पैसे या किमान मर्यादेपासून दर रुपयास २०० पैशांपर्यन्त वाढविण्याची मुभा जिल्हा परिषदांना असून, या उपकरवाढीची सूचना आपापल्या क्षेत्रापुरती पंचायत समित्या व ग्रामपंचायती करू शकतात. त्यांच्या सूचनेनुसार असे कर सरकार वाढविते व हे सर्व वाढीव उत्पन्न त्या त्या संस्थांना प्राप्त होऊ शकते. परंतु प्रत्यक्षात कोणत्याही पंचायत समित्या किंवा ग्रामपंचायती या सवलतींचा फायदा घेत नाहीत कारण एकूणच करवाढ ही अप्रिय गोष्ट असून या अप्रियतेचे धनी होण्यास कोणत्याही पंचायतींचे शासन तयार नसते.

जमीन महसुलावरील उपकरापासून पंचायतींना चांगले उत्पन्न प्राप्त होऊ शकते हे खरे. आर्थिक दृष्ट्या विकसित प्रदेशांतील पंचायतींना अर्थातच या मार्गाने अधिक उत्पन्न प्राप्त होते. प्रश्न आहे तो मागासलेल्या प्रदेशांतील पंचायतींचा. तेथे मुळातच जमीन महसूल कमी असतो. त्यामुळे उपकराची रक्कमही कमी मिळते. शासनाने यासाठी काही खास समानीकरण अनुदानाची सोय केलेली आहे. जर महसूल दरडोई १ रुपयापेक्षा कमी झाला तर एक रुपयापर्यन्तचा फरक सरकार अनुदानाने भरून काढते. अशा प्रकारच्या अनुदानामुळे वाईट परिस्थितीत काही किमान उत्पन्नाची सोय होत असली तरी एकूणच ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती अत्यंत दुबळी असते. साहजिकच त्यांच्या-कडून सामाजिक कल्याणावर केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण अत्यल्प असल्यास नवल नाही. उदा. १९७३–७४ साली ग्रामपंचायतींचा स्वच्छता व आरोग्य यावरील दरडोई खर्च ८२ पैसे होता (त्यातही जळगाव रु. ९० पैसे व बीड फक्त १४ पैसे), तर शिक्षणावरील दरडोई खर्च फक्त ३० पैसे इतका होता (जळगाव ६१ पैसे व औरंगाबाद फक्त १३ पैसे). याचा सरळ अर्थ असा की, अजूनही ग्राम-पंचायतींच्या स्तरावर आपले शिक्षण व आरोग्यासारख्या मूलभूत मानवी भांडवलाच्या गुंतवणुकीकडे दुर्लक्ष होत आहे.

### काही सर्वसामान्य निष्कर्ष

आपण आपल्या देशात कायद्याने राजकीय व शासकीय व्यवस्थेत विकेंद्रीकरण प्रस्थापित केले. परंतु ज्याच्या पायावर ही विकेंद्रित व्यवस्था चालवायची त्या वित्तीय क्षेत्रात मात्र केंद्रीकरणाचीच स्थिती अस्तित्वात आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषदा व ग्रामपंचायती या चार स्तरांवर कार्यविभागणी करून शासन व्यवस्था निर्माण केलेली असली तरी व्यवहारात ग्रामपंचायती जिल्हा परिषदांवर, जिल्हा परिषदा राज्य सरकारवर आणि राज्य सरकार केंद्र सरकारवर त्यांच्या वित्तीय गरजां-साठी फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत (तक्ता क. ५). यामुळे वित्तीय अधिकारांचे प्रत्येक वरच्या स्तरांवर अधिकाधिक केंद्रीकरण होत गेलेले आहे. त्यातही जिल्हा परिषदा व पंचायतींना फारच अपुरे आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे जसजसे वरच्या स्तरावरून खालच्या स्तराकडे जावे तसतशी स्वायत्तता मर्यादित होत गेलेली आहे. या प्रचलित असलेल्या व्यवस्थेतून तीन प्रकारचे धोके संभवतात.

१. वित्तीय अधिकारांबाबत (उत्पन्न मिळविणे व ते खर्च करणे) : स्वायत्तता जेवढी कमी असेल तेवढे त्या पातळीवरील विकासाचे प्रयत्न अर्थपूर्ण होत नाहीत. उत्पन्नाची पुरेशी आणि स्वतःची साधने

नसतील तर त्यांच्या वापराबाबत परिस्थितीनुसार स्वतंत्र निर्णय घेण्याची फारशी गरज राहत नाही. ही स्वतंत्र निर्णय घेण्याची अनावश्यकता, तळस्तरीय विकास प्रयत्नात, स्थानिक लोकांचा पुरेसा सहभाग प्राप्त करून घेऊ शकत नाही. यामुळे स्थानिक पातळीवरील आर्थिक नियोजन हे व्यवहारात तरी ' लोकांचे ' नियोजन न राहता ते केवळ वरील सरकारने लादलेले ' सरकारी ' ठरते व त्यामुळे ते अपेक्षित परिणामांच्या बाबतीत निष्प्रभ ठरते असा अनुभव आहे.

२. जिल्हा परिषदा व ग्रामपंचायती याला पुरेशी स्वतःची उत्पन्नसाधने नसतील आणि त्यांचा बहुतांशी कारभार वरच्या पातळीवरील सरकारच्या ( किंवा राज्यसरकारच्या ) अनुदानांवर चालणार असेल तर त्यांचे मूळ स्वरूपच ' दुय्यम किंवा तिय्यम दर्जाच्या शासनसंस्था ' अशा प्रकारचे बनते. म्हणजे या शासनसंस्था ' स्वतंत्र कार्य करणाऱ्या संस्था ' न राहता त्या केवळ ' अंमलबजावणी करणाऱ्या संस्था ' बनतात. साहजिकच ज्या प्रदेशासाठी त्यांचे अस्तित्व असते त्या प्रदेशाचे व त्यातील लोकांचे प्रतिनिधित्व त्या करीत नाहील तर वरील सरकारच्या प्रतिनिधी म्हणून त्या लोकांच्यात कार्य करतात. पंचायतीराज संस्थांचे आजचे कार्य तरी निरवालसपणे याच स्वरूपाचे आहे.

३. शासकीय विकेंद्रीकरण आणि वित्तीय केंद्रीकरण या स्वरूपाची शासन व्यवस्था अस्तित्वात असेल तर उच्च स्तरावरील सरकारवर हुकमत असणारे राजकीय नेते आपल्या हाती आर्थिक लगाम ठेवून खालच्या स्तरावरील शासनाचे घोडे आपल्याला हव्या त्या पद्धतीने वळविण्याचे खेळ करू शकतील. स्थानिक प्रदेशांच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीतील हा फार मोठा अडथळा ठरू शकेल.

**सूचना**

वरील धोके विचारात घेऊन या स्थानिक संस्थांना आर्थिक स्वायत्तता प्राप्त करून देण्यासाठी काही सूचना करता येतील. या सूचनांमागे दृष्टिकोन असा आहे की, भारतीय संविधानाच्या चवथ्या प्रकरणात म्हणजे ' राज्याच्या धोरणाच्या निर्देशक तत्त्वांमध्ये असलेल्या चाळिसाव्या कलमात म्हटल्याप्रमाणे, ' राज्य हे ग्रामपंचायतींची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी कार्यप्रवण होईल व त्यांना स्वराज्याचे मूल घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधिकार बहाल करील. ' घटनाकारांनी दिलेल्या सुयोग्य दिशेने ग्रामपंचायतींचे कार्य व्हावे यासाठी पुरेशी स्वायत्तता मिळणे आवश्यक आहे. खालील सूचना या दृष्टिकोनातूनच केलेल्या आहेत :

१. भारतीय संविधानाने ज्याप्रमाणे केंद्र व राज्ये यांमध्ये वित्तविषयक साधनांची वाटणी करण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमण्याची तरतूद केली आहे तशा प्रकारची कायदेशीर तरतूद राज्य सरकार व पंचायतीराज संस्था यांमधील वित्तवाटणीसाठी करावी. सर्व राज्यांना अशी ' राज्य वित्त आयोगाची ' तरतूद आपापल्या कायद्यामधून करायला लावण्यासाठी राज्यघटनेत सुधारणा लागल्यास करावी. यामुळे स्थानिक स्वराज्यसंस्थांची स्वायत्तता टिकविण्यास मदत होईल.

२. पंचायतीराज संस्थांवर राज्य सरकारचे सर्वांगीण वर्चस्व ठेवण्यापेक्षा राज्य सरकारचे त्यांच्या बाबतीतील कार्य सर्वसामान्य प्रशासकीय सल्ला, विविध प्रकल्पांबाबतचा तांत्रिक सल्ला, वार्षिक हिशोब तपासणी, संशोधन आणि सर्वसामान्य धोरणविषयक चौकट पुरविणे एवढ्यापुरते मर्यादित असावे.

३. पंचायतीराज संस्थांना उत्पन्नाची स्वतंत्र साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिली पाहिजेत. त्यासाठी त्यांना काही कर सक्तीने जमा करावयास भाग पाडावे लागेल. तसे पाहिले तर आज जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना राज्य सरकारच्या सूचींतील कोणताही कर बसविता येतो. वास्तविक प्रत्यक्षात त्याचा कधीही वापर होणार नसेल तर इतक्या व्यापक अधिकारांची गरजही नाही. उलट काही मोजके, उत्पादक कर त्यांना मिळणे व त्यांची अंमलबजावणी करणे हे महत्त्वाचे आहे.

४. करवसुलीच्या दृष्टीने काही महत्त्वाची पावले उचलणे आवश्यक आहे. रेशनकार्ड वापरणाऱ्यांसाठी किंवा मताधिकार बजावणाऱ्यांसाठी कर भरणे ही पूर्वअट म्हणून वापरता येईल.

५. करांव्यतिरिक्त अन्य उत्पन्नवाढीसाठी इतर काही राज्यांमधील प्रयोग येथेही करून पाहता येतील. उदा. पंजाबमध्ये प्रत्येक पंचायतीची स्वतःची काही जमीन असते व त्यापासून मोठे उत्पन्न त्या प्राप्त करू शकतात. आंध्र प्रदेश, सिक्कीम वगैरे राज्यांत अशीच पंचायतींच्या मालकीची काही तळी असतात. उत्तर प्रदेश व ओरिसा या राज्यांमधून पंचायतींच्या मालकीचे काही उद्योग असतात. मिश्र अर्थव्यवस्था या स्तरावरही या मार्गाने आपणास राबविता येईल. याशिवाय राज्य सरकारने एखादा कार्यक्रम राबविला तर तो पुढे चालू ठेवण्याची जबाबदारी व त्यापासून मिळणारे उत्पन्न त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सुपूर्द करता येईल.

६. राज्य सरकारकडून पंचायतीराज संस्थांना दिली जाणारी अनुदाने ही काही महत्त्वाच्या राज्यव्यापी योजनांसाठी, किंवा खास अडचणींसाठी किंवा काही विशिष्ट प्रकल्पांसाठी द्यावीत. अनुदाने ही त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नाला केवळ पूरक अशा स्वरूपाची असावीत. अनुदाने हाच त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख मार्ग ठरू नये. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, उत्पन्नातील अनुदानाचा वाटा ३० टक्क्यापर्यंत मर्यादित असावा.

७. पंचायतीराज संस्थांना राज्य सरकारकडून किंवा अन्य वित्त संस्थांकडून कर्ज उभारण्याचे अधिकार असावेत. संथानम् समितीने प्रत्येक राज्यात 'पंचायतीराज वित्त महामंडळ' स्थापण्याची सूचना केलेली आहे. तसेच अशोक मेहता समितीने चालू वित्तसंस्थांचा उपयोग करून घेण्याची सूचना केलेली आहे. काही विशिष्ट प्रकल्पांसाठी लोकांकडून ठेवी स्वीकारण्याची तरतूदही कायद्याने करता येईल.

या ठिकाणी पंचायतीच्या करविषयक अभ्यासातून निर्माण होणारे काही प्रश्न व तत्संबंधी काही स्थूल स्वरूपाच्या सूचना चर्चेसाठी पुढे ठेवल्या आहेत. त्यामधून प्रत्यक्षात आढळून येणाऱ्या राज्य सरकारच्या, पंचायती संस्थांचे अधिकार मर्यादित करणाऱ्या व बोंगीरवार समितीने घेतलेल्या, "कायद्याच्या १५७ व्या कलमात सुधारणा करून करविषयक सर्व अधिकार केवळ राज्य सरकारकडे ठेवावेत," ह्या भूमिकेच्या नेमकी विरोधी भूमिका घेतलेली आढळेल. या स्थानिक शासनांचे कार्य उपयुक्त व विकासाभिमुख ठरण्यासाठी त्यांना स्वायत्त बनविण्याची भूमिका मला अधिक सयुक्तिक वाटते.

**तक्ता क्रमांक १***

**महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे एकूण सरासरी व दरडोई उत्पन्न**

| वर्ष | एकूण उत्पन्न (लाख रु.) | एकूण उत्पन्नाचा निर्देशांक (१९६०–६१=१००) | सरासरी उत्पन्न (रुपये) | सरासरी उत्पन्नाचा निर्देशांक (१९६०–६१=१००) | दरडोई उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १९६०–६१ | ४९३.६ | १००.०० | २७०१ | १००.०० | १.७९ |
| १९७०–७१ | १६२७.३ | ३२९.७ | ३२३३ | ११९.०७ | ५.६८ |
| १९७१–७२ | १७१४.६ | ३४७.४ | ७४७४ | २७६.०७ | ४.९१ |
| १९७२–७३ | १८१३.० | ३६७.३ | ७८७८ | २९१.०७ | ५.१७ |
| १९७३–७४ | २९५५.७ | ५९८.८ | १२७२४ | ४७१.०८ | ८.४२ |

(तक्ता क्रमांक ११, पान १०, तक्ता क्र. १३, पान ११.)

**तक्ता क्रमांक २**

**करवसुलीचे एकूण करनिर्धारण रकमेशी असलेले प्रमाण**

| वर्ष | एकूण करनिर्धारण (लाख रुपये) | करवसुली (लाख रुपये) | ३ चे २ शी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९६०–६१ | ३४९.३ | २०१.८ | ५७ |
| १९७०–७१ | ७२५.८ | ४१३.२ | ५७ |
| १९७१–७२ | ७६०.१ | ४४२.० | ५८ |
| १९७२–७३ | ७९०.४ | ४०६.२ | ५१ |
| १९७३–७४ | ८४७.८ | ४९४.५ | ५८ |

(तक्ता क्र. ४१, पान ३३.)

**तक्ता क्रमांक ३**

**महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचे विविध मार्ग व टक्केवारी**

| वर्ष | एकूण उत्पन्न (लाख रुपये) | सरकारी अनुदान (लाख रुपये) | टक्केवारी | कर रक्कम (लाख रुपये) | टक्केवारी | देणग्या (लाख रुपये) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६०–६१ | ४९३.५९ | २०६.४ | ४१.७ | २०१.६० | ४०.९ | ८५.९५ | १७.४ |
| १९७०–७१ | १६२७.३२ | ९२६.६९ | ५६.९ | ४१३.२१ | २५.४ | २८७.४२ | १७.७ |
| १९७१–७२ | १७१४.५६ | ९५२.११ | ५५.५ | ४४२.२५ | २५.८ | ३१९.९९ | १८.७ |
| १९७२–७३ | १८१३.०५ | १०५३.५७ | ५८/१ | ४०६.१७ | २२.४ | ३५३.३१ | १९.५ |
| १९७३–७४ | २९५५.७४ | १८०८.२४ | ६१.२ | ४९४.५४ | १६.७ | ६५२.९६ | २२.१ |

(तक्ता क्र. १५, पान १३)

* सर्व तक्त्यांच्या खाली दिलेले संदर्भ खालील अहवालातील आहेत :
अन्युअल ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट ऑन द वर्किंग ऑफ व्हिलेज पंचायत फॉर द इयर १९७३–७४ रुरल डेव्हलप-मेंट डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र (१९७८).

तक्ता क्रमांक ४

**विविध राज्यांचे करउत्पन्न व त्यांचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण व दरडोई उत्पन्न***

(१९७३–७४)

| क्रमांक | राज्य | एकूण उत्पन्न (लाख रुपये) | एकूण करउत्पन्न (लाख रुपये) | करउत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | दरडोई उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | हरियाणा | ६९·२० | ६७·०० | ९७·०० | ०·८४ |
| २. | तामीळनाडू | १२१२·२३ | ९१८·५९ | ७५·७८ | ३·७८ |
| ३. | हिमाचल प्रदेश | ३५·२० | २४·२५ | ६९·६६ | १·०९ |
| ४. | उत्तर प्रदेश | ४६३·०० | २९७·०० | ६४·३६ | ०·६१ |
| ५. | जम्मू व काश्मीर | ६·४० | ४·०५ | ६३·२८ | ०·१७ |
| ६. | कर्नाटक | ४२१·३३ | २८५·३३ | ६१·७५ | १·८७ |
| ७. | त्रिपुरा | १·०० | ०·५० | ५०·०० | ०·०७ |
| ८. | केरळ | १०६१·०० | ४५५·०० | ४२·८८ | ५·६१ |
| ९. | आसाम | ६०·३० | २३·२५ | ३८·५६ | ०·४७ |
| १०. | पश्चिम बंगाल | २४१·७३ | ८८·३० | ३६·५३ | ०·७४ |
| ११. | आंध्र प्रदेश | १६८८·६१ | ५७३·६९ | ३३·९७ | ४·५९ |
| १२. | मध्यप्रदेश | ३८२·२२ | १२४·८६ | ३२·६७ | १·१५ |
| १३. | गुजराथ | १४८४·३२ | ४६९·०४ | ३१·६० | ७·६० |
| १४. | महाराष्ट्र | २९५५·७४ | ४९४·५४ | १६·७४ | ८·४१ |
| १५. | ओरिसा | १४३·३९ | १४·७० | १०·२५ | ०·७१ |
| १६. | राजस्थान | ४४१.९६ | २४·०० | ५·४३ | २·०८ |

*बिहार, मणिपूर, मेघालय, नागालँड, पंजाब, सिक्कीम या राज्यांनी या संदर्भातील आकडेवारी उपलब्ध झाली नाही.

तक्ता क्रमांक ५

**विविध स्तरांवरील सरकारांच्या उत्पन्नाचे मार्ग व त्यांचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण (१९७१–७२)**

(लाख रुपये)

| क्रमांक | सरकार | एकूण उत्पन्न | स्वतःचे करउत्पन्न | इतर उत्पन्न | अनुदाने |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य | ५२१००·०० | २७४००·०० | ११९००·०० | १२८००·०० |
| | | (१००·००) | (५२·५९) | (२२·८४) | (२४·५७) |
| २. | जिल्हा परिषदा | ११०३९·६७ | ५९६·०५ | १४८८·५२ | ८९५५·१० |
| | | (१००·००) | (५·४०) | (१३·४८) | (८१·१२) |
| ३. | ग्रामपंचायती | १७१४·५६ | ४४२·४५ | ३१९·९९ | ८९५२·११ |
| | | (१००.००) | (२५·८) | (१८·७) | (५५·५) |

विशेष सूचना (१) कंसातील आकडे एकूण उत्पन्नाशी प्रमाण दर्शवितात. (२) नेमक्या रकमा उपलब्ध नसल्याने, उपलब्ध आकडेवारीच्या आधारे अंदाजे रकमा काढल्या आहेत. तुलनेसाठी सर्व सरकारांची ज्या वर्षाची नेमकी माहिती उपलब्ध आहे ते १९७१–७२ हे वर्ष येथे विचारार्थ घेतले आहे. यात राज्य सरकारने स्वतःचे कार्यक्रम राबविण्यासाठी दिलेल्या रकमा समाविष्ट आहेत.

तक्ता क्रमांक ६

**महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या स्वतः उभारलेल्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण**

जिल्हावार आकडेवारी ( १९७३–७४ )

| क्रमांक | जिल्हा | प्रमाण | क्रमांक | जिल्हा | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | जळगाव | ३८·१० | १४. | वर्धा | १५·३९ |
| २. | ठाणे | ३०·३४ | १५. | नागपूर | १३·१६ |
| ३. | कुलाबा | २८·८८ | १६. | अहमदनगर | १२·८२ |
| ४. | सांगली | २८·८५ | १७. | पुणे | १२·५९ |
| ५. | चंद्रपूर | २७·२० | १८. | बुलढाणा | १२·४५ |
| ६. | अमरावती | २७·१८ | १९. | रत्नागिरी | ११·७८ |
| ७. | सोलापूर | २६·८३ | २०. | अकोला | १०·२३ |
| ८. | कोल्हापूर | २६·२९ | २१. | औरंगाबाद | ९·३१ |
| ९. | नाशिक | २४·२२ | २२. | परभणी | ६·३६ |
| १०. | धुळे | २२·५५ | २३. | नांदेड | ६·३२ |
| ११. | यवतमाळ | १९·८४ | २४. | उस्मानाबाद | ६·१२ |
| १२. | भंडारा | १८·१० | २५. | बीड | ०·७८ |
| १३. | सातारा | १७·२४ | | | |

( तक्ता क. २०, पान–१६ )

तक्ता क्रमांक ७

**ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या दरडोई अनुदानांचे दरडोई खर्चाशी प्रमाण**

| वर्ष | दरडोई खर्च ( रुपये ) | दरडोई अनुदान ( रुपये ) | ३ चे २ शी प्रमाण |
|---|---|---|---|
| ( १ ) | ( २ ) | ( ३ ) | ( ४ ) |
| १९६०–६१ | १·५ | ०·०५ | ५०·०० |
| १९७०–७१ | ५·७ | ३·२३ | ५६·६६ |
| १९७१–७२ | ५·४ | २·८९ | ५३·५२ |
| १९७२–७३ | ४·९ | ३·०० | ६१·२२ |
| १९७३–७४ | ७·८ | ५·१४ | ६६·०० |

( तक्ता क्रमांक १८, पान १५; तक्ता क. २७, पान २२ )

तक्ता क्रमांक ८

**ग्रामपंचायतींनी स्वतः मिळविलेल्या उत्पन्नाचे एकूण खर्चाशी प्रमाण**

| वर्ष | टक्केवारी |
|---|---|
| १९६०–६१ | ४९·०५ |
| १९७०–७१ | २५·२७ |
| १९७१–७२ | २४·८९ |
| १९७२–७३ | २३·८७ |
| १९७३–७४ | १८·०७ |

( तक्ता क. २६, पान २९ ).

**तक्ता क्रमांक ९**

### महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे स्वतःच्या उत्पन्नाचे विविध मार्ग

( लाख रुपयांत )

| क्रमांक | उत्पन्नाचे मार्ग | १९६०–६१ | १९७०–७१ | १९७१–७२ | १९७२–७३ | १९७३–७४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जमिनी व घरांवरील कर | ५६·९ (२८·२२) | १५२·४ (३६·८८) | १७२·२ (३८·९२) | १३९·८ (३४·४३) | १८७·२ (३७·८८) |
| २. | जकात | ७·२ (३·५७) | १९·२ (४·६५) | २४·० (५·४२) | १८·६ (४·५८) | २१·१ (४·२७) |
| ३. | बाजार व आठवड्यांच्या बाजारावरील फी | १२·३ (६·१०) | २३·६ (५·७१) | २२·६ (५·११) | २२·७ (५·५९) | २४·७ (४·९९) |
| ४. | सामान्य व खास स्वच्छता उपकर | ९·५ (४·७१) | १९·७ (४·७७) | २३·२ (५·२४) | १४·७ (३·६२) | २७·० (५·४६) |
| ५. | सामान्य व खास पाणीपट्टी | २·७ (१·२४) | १५·० (३·६३) | १७·६ (३·९८) | २१·४ (५·२७) | २८·५ (५·७६) |
| ६. | इतर कर | ११३·० (५६·०६) | १८३·३ (४४·३६) | १८२·८ (४१·३२) | १८८·९ (४६·५१) | २०६·० (४१·६६) |
| ७. | एकूण | २०१·६ (१००·००) | ४१३·२ (१००·००) | ४४२·४ (१००·००) | ४०६·१ (१००·००) | ४९४·५ (१००·००) |

( तक्ता क्र. २४, पान २० ).

( कंसातील आकडे टक्केवारीचे ).

संदर्भ :—


१. ॲन्युअल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिपोर्ट ऑन द वर्किंग ऑफ व्हिलेज पंचायत्स फॉर द इयर १९७३–७४, ग्रामीण विकास खाते, महाराष्ट्र शासन ( १९७८ )

२. रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑन पंचायतीराज इन्स्टिट्यूशन्स (अध्यक्ष, अशोक मेहता), मिनिस्ट्री ऑफ ॲग्री-कल्चर ॲण्ड इरिगेशन, ग्रामीण विकास खाते, भारत सरकार (१९७२)

३. रिपोर्ट ऑफ द स्टडी टीम ऑन पंचायतीराज फिनान्सेस (अध्यक्ष, संथानम्), भाग १ व २, ग्रामीण विकास खाते, भारत सरकार (१९६३)

४. पॅटर्न्स ऑफ पंचायतीराज इन इंडिया, संपादक, जी. रामरेड्डी, द मॅकमिलन कंपनी ऑफ इंडिया लि., मद्रास (१९७७)

५. पंचायतराज मूल्यमापन समितीचा अहवाल (अध्यक्ष, आर्. एम्. बोंगीरवार), ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (१९७४)


■ ■

# अर्थ शब्दाची वाट पाहे
## परिभाषा चर्चा

### अर्थशास्त्र परिभाषा कोश*

कुठल्याही विषयाचा अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने त्या विषयाच्या पारिभाषिक शब्दकोशाची आवश्यकता वादातीत आहे. आज महाविद्यालयातून व विद्यापीठांतून ज्या अर्थशास्त्राचा अभ्यास केला जातो ते अर्थशास्त्र पश्चिमात्य राष्ट्रांत जन्माला येऊन तेथेच वाढलेले शास्त्र आहे. आपल्याकडेही या विषयाचा अभ्यास पूर्वी इंग्रजी भाषेद्वाराच होत असे. मराठीभाषेच्या माध्यमातून या विषयाचा अभ्यास सुरू झाल्यास जवळजवळ दोन तपे होत आली. परंतु मराठीत अर्थशास्त्राचा एकही परिभाषा कोश उपलब्ध नव्हता. अशा कोशाची बरेच दिवस उणीव जाणवत होतीच. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना प्रस्तुत परिभाषा कोश उपलब्ध करून देऊन महाराष्ट्र शासनाच्या भाषासंचालनालयाने एक मोठीच उणीव भरून काढलेली आहे.

पश्चिमात्य देशांत बहुतेक भाषांतून अशा तऱ्हेचे अनेक पारिभाषिक कोश उपलब्ध आहेत. हिंदी भाषेतही काही पारिभाषिक कोश उपलब्ध आहेत. मराठी भाषेतील अर्थशास्त्राच्या परिभाषेलाही तसा जवळजवळ १२५ वर्षांचा इतिहास, परंपरा आहे. कै. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मिल यांच्या ग्रंथाच्या आधारे तयार करून १८५५ साली प्रसिद्ध केलेला 'अर्थशास्त्र परिभाषा–प्रकरण पहिले' हा ग्रंथ हा अशा तऱ्हेचा पहिला ज्ञात प्रयत्न म्हणता येईल. बडोदा संस्थानने १९३१ प्रसिद्ध केलेला 'श्री सयाजीशासन शब्दकल्पतरू' हा ग्रंथही या दृष्टीने महत्त्वाचा आहे. परंतु हे सर्व ग्रंथ आजच्या विस्तार पावलेल्या अर्थशास्त्राच्या संदर्भात फारच अपुरे पडतात. सद्यःकालीन अर्थशास्त्राच्या अभ्यासास उपयुक्त होईल असा अद्ययावत कोश उपलब्ध करावा या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचा हा प्रयत्न स्तुत्य आणि अभिनंदनीय असला तरी "परिभाषा कोश" या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथात बऱ्याच उणिवा राहून गेलेल्या दिसतात; आणि म्हणूनच त्याच्या उपयुक्ततेवर तितक्याच मर्यादा पडतात. यातील प्रकर्षाने जाणवणाऱ्या काही मर्यादांचा, उणिवांचा आपल्याला येथे विचार करायचा आहे.

सर्वसाधारण शब्दकोश आणि पारिभाषिक शब्दकोश यांत मूलतःच काही फरक असतो. सर्वसाधारण शब्दकोशांत शब्दांच्या अर्थाबरोबरच तदनुषंगाने काही पर्यायी शब्द व जोडशब्द दिलेले

* प्रा. रवींद्र सबनीस यांनी "अर्थशास्त्र परिभाषा कोश" या ग्रंथाची प्रत उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे.

असतात; आणि क्वचित् गौणरूपाने व्युत्पत्ती, आगम व इतर व्याकरणविषयक माहिती दिलेली असते. सर्वसाधारण शब्दकोशांबाबत कोश वापरणाऱ्यांकडून एवढ्याच अपेक्षा असतात. पारिभाषिक शब्दकोश मात्र एखाद्या विशिष्ट विषयांपुरते मर्यादित असल्याने व त्यांचा वाचकवर्ग हा विशिष्ट दर्जाचा असल्याने या कोशांकडून काही वेगळ्या अपेक्षा असतात. पारिभाषिक शब्दकोशांचा उपयोग केवळ एखाद्या शब्दाचा अर्थ वा त्यास प्रतिशब्द पाहणे यापेक्षा अधिक महत्त्वाचा म्हणजे चटकन पाहण्यासाठी संदर्भग्रंथ म्हणून, संकल्पनांचे यथातथ्य स्वरूप व व्याप्ती स्पष्ट व्हावी म्हणून, विषयाची झटकन उजळणी करण्याचे साधन म्हणून, अशा विविध उद्देशांनी केला जातो. पारिभाषिक शब्द नेहमीच्या भाषेतील उपयोगापेक्षा काही विशिष्ट अर्थानेच–पुष्कळ वेळा सामान्य भाषेतील विशिष्ट छटेने, मर्यादित अर्थाने, अथवा अधिक व्यापक अर्थाने–वापरले जातात. पुष्कळशा पारिभाषिक शब्दांमागे काही काही संकल्पना अध्याहृत असतात. पारिभाषिक शब्दांचा प्रयोग शास्त्रीय स्वरूपाच्या वाङ्मयात केला जात असल्याने, अर्थाच्या मर्यादा व व्याप्ती स्पष्ट होण्यासाठी कोशात अशा पारिभाषिक शब्दांविषयी केवळ एका भाषेतील शब्दाबद्दल दुसऱ्या भाषेतील प्रतिशब्द–इंग्रजी भाषेतील शब्दाऐवजी मराठी भाषेतील केवळ शब्द– देऊन काम भागण्यासारखे नसते. अर्थाची व्याप्ती आणि मर्यादा स्पष्ट होण्यासाठी अशा शब्दामागील संकल्पनांचे थोडक्यात विवरण, व्याख्या देणे आवश्यक असते. उदा. ablity-to pay theory, accelerated depreciation, accommodation bill, acid-test ratio, administered prices, AGMARK, Arrow's impossibility theorem, at station rate, वगैरे. इंग्रजी भाषेमध्ये अर्थशास्त्राचे जे पारिभाषिक कोश उपलब्ध आहेत त्या बहुतेक कोशांमधून असे थोडक्यात विवेचन दिलेले असते.[1]

मराठी कोशातही असे विवरण देता येणे सहज शक्य आहे, नव्हे तसे ते आवश्यकच आहे. उदाहरण म्हणून एक दोन नोंदी लिहिण्याचा आपण प्रयत्न करू.

**acid-test ratio**, तीक्ष्ण निकष गुणोत्तर अथवा शलाका परीक्षा गुणोत्तर. यालाच द्रुत गुणोत्तर ( quick ratio ) असेही म्हणतात. हे प्रवाही मत्तेचे चालू दायित्वाशी असलेले गुणोत्तर होय. प्रवाही मत्तेत रोकड स्वरूपातील व चटकन रोकडीत रूपांतरित होऊ शकणाऱ्या मत्तेचा अंतर्भाव होतो. उदा. रोख व अधिकोषस्थ रोकड, रोख्यांची बाजारभावाने होणारी किंमत व प्राप्यलेखाशेष. संस्थेचे तात्कालिक दायित्व भागविता येण्याचे सामर्थ्य या गुणोत्तरावरून समजून येते. ( acid-test ratio बद्दल मराठीत सुचविलेला 'निकषित गुणोत्तर' हा–कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित वापरून तयार केलेला–पर्याय साफच चुकीचा आहे. )

**AGMARK**, अॅगमार्क, भारतातील विक्रेय कृषिउत्पादनाची प्रतवारी दाखविणारे प्रमाणचिन्ह. १९३७ च्या Agricultural Produce ( Grading and Marketing ) Act प्रमाणे निर्यात होणाऱ्या कृषि-उत्पादनाबाबत असे प्रतवारीनिदर्शक प्रमाणन सक्तीचे आहे. अंतर्गत व्यापारांतील कृषिउत्पादनासंबंधात

---

१. उदाहरणार्थ पहा : *A Dictionary of Economics and Commerce* by J. L. Hanson, Macdonald and Evans Ltd. London, 4th Edn. 1974; *Dictionary of Economics*, by Harold S. Sloan and Arnold J. Zurcher, Barnes & Noble Books, Harpes & Row Publisher, New York, 5th Edn. 1970; *The McGraw-Hill Dictionary of Modern Economics : A Handbook of Terms and Organizations*, McGraw-Hill, New York, 1965.

असे प्रमाणन ऐच्छिक असते. कृषिउत्पादनाव्यतिरिक्त इतर उत्पादनाबाबत असे प्रमाणन ISI मार्फत केले जाते.

काही अपवादात्मक शब्दांच्या बाबतीत प्रस्तुत परिभाषा कोशांतही थोडक्यात विवेचन काही ठिकाणी दिलेले आहे. उदा. accounting price, banking doctrine, basic commodity, bulklining principle, cost of capital, convenanted subscription, crawling peg, degressive इत्यादि. एक तर असे आवश्यक ते विवरण फारच थोड्या शब्दांबाबतीत दिलेले आहे. शिवाय ज्या काही अपवादात्मक शब्दांबाबतीत असे विवरण दिलेले आहे ते इंग्रजीमध्ये दिलेले आहे. प्रस्तुत परिभाषा कोश हा मराठी माध्यमातून अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी असल्याने असे विवेचन हे इंग्रजीऐवजी मराठीत असणे आवश्यक आणि अधिक सयुक्तिक आहे.

अनेक शब्द इंग्रजी भाषेतून मराठी भाषेत आले आहेत. अगदी केवळ अशिक्षित लोकही त्या शब्दांचा सर्रास वापर करीत असतात. उदा. एकर, फूट, इंच, अपील वगैरे. परंतु पारिभाषिक कोशात अशा शब्दांचा अर्थ देताना केवळ लिप्यंतर करून; म्हणजे रोमन लिपीऐवजी हे शब्द देवनागरीत देऊन काम भागेल ? शिवाय एकर, फूट आणि इंच असे शब्द स्वतंत्ररीत्या सर्वांना माहीत असले तरी acre foot, acre inch या शब्दांचे नेमके अर्थ जाणत्यांनाही सांगता येणे कठीण आहे. तेव्हा acre foot, एकरफूट; acre inch, एकरइंच; carat, कॅरट, अशा स्वरूपाच्या नोंदी कितपत योग्य आहेत ? याच स्वरूपाची आणखी एक नोंद पहा. ayacut, आयाकट. काय अर्थबोध झाला ?

उलट यातील काही नोंदी पुढीलप्रमाणे केल्या तर त्या अधिक उपयुक्त ठरतील.

acre foot, एकरफूट, एक एकर जमिनीस एक फूट खोलीपर्यंत पुरेल इतक्या परिमाणाचे. (उदा. जलसिंचन).

carat, कॅरट (१) मौल्यवान रत्नांचे वजन करण्यासाठी वापरले जाणारे परिमाण.
१ कॅरट = २०० मिलिग्रॅम्स.
(२) सोन्याची शुद्धता सांगण्याचे परिमाण.

शब्दांच्या शुद्धतेबद्दल आणि अर्थाबद्दल शब्दकोश हे नेहमीच प्रमाणग्रंथ मानले जातात. स्वाभाविकच इंग्रजी शब्दांच्या शुद्धलेखनाच्या चुका शब्दकोशात असून चालणार नाही. या दृष्टीने पुढील नोंदी पहा : acquision (acquisition?); champarty (champerty ?)

वर उल्लेखिलेल्या तत्त्वाप्रमाणेच इंग्रजी शब्दांचे अर्थ म्हणून मराठी अथवा संस्कृत भाषेतील जे शब्द दिलेले आहेत त्या शब्दांचीही शुद्धी राखणे आवश्यक आहे. या दृष्टीने पुढील नोंदींचा विचार करावा.

age distribution, वय वर्गीकरण
age specific, वय विशिष्ट
age structure, वय संरचना
apprenticeship, शिक्षुता
assessor, निर्धाकर

इत्यादी.

मराठीमध्ये 'वयोरचना', 'वयोमर्यादा' असे शब्द रूढ आहेत व तेच शुद्ध मानले जातात. प्रस्तुत कोशातही age composition ला वयोरचना असा पर्याय दिला आहे. तेव्हा 'वयोवर्गीकरण', 'वयोविशिष्ट', 'वय संरचना' असे शब्द यायला काहीच हरकत नाही. चिकित्सा, जिज्ञासा, विजिगीषा, तितीर्षा इ. जे इच्छार्थक शब्द धातूपासून बनतात ते शब्द बनताना धातूतील पहिल्या अक्षराचे द्वित्व होत असते. त्याला अनुसरून शिशिक्षुता अशा तऱ्हेचा शब्द होईल. शिक्षुता हे रूप शुद्ध वाटत नाही. assessor या शब्दाचा 'निर्धाकर' असा अर्थ दिला आहे. मराठीत 'निर्धारक' असा शब्द वापरला जातो व तोच शुद्ध आहे.

शब्दांचे इंग्रजी लेखन शुद्ध असले पाहिजे या तत्त्वाच्या अनुषंगानेच एखाद्या शब्दाचे कोशामधील स्थान, म्हणजेच अनुपूर्वी वा आकारविल्हे क्रम हाही काही निकष ठरवून योग्य तो असला पाहिजे हे ओघानेच आले. या कोषांत arithmetical progression व arithmetical series या नोंदीनंतर arithmetic mean व arithmetic progression हे शब्द दिले आहेत. वस्तुतः arithmetic हा मूळ शब्द. व त्यावरून arithmetical हे विशेषण झाले. प्रथम मूळशब्द, नंतर मूळशब्दावरून बनलेले सामासिक शब्द, त्यानंतर मूळशब्दावरून बनलेले तद्धित शब्द व तदनंतर तद्धितांचे सामासिक शब्द, असा क्रम अधिक योग्य वाटतो. याचदृष्टीने age आणि economic इ. शब्दांवरून बनलेल्या सामासिक शब्दांच्या अनुपूर्वीचाही विचार व्हावा.

मराठी वा संस्कृत पर्यायांचे शुद्ध स्वरूप यावत्शक्य राखावे या विचारास अनुसरून आणखी एक जाणवणारी गोष्ट म्हणजे काही पारिभाषिक शब्दांना पर्याय सुचविताना पर्यायाचा काही भाग संस्कृत व राहिलेला भाग मराठी वा अन्यभाषीय असा प्रकार अनेक ठिकाणी झालेला दिसतो. असा धेडगुजरी प्रकार शक्यतो टाळावा. उदा. active cirualation of notes, **नोटांचे** क्रियाशील परिचलन; adequate personal security, **पुरेशी** व्यक्तिगत प्रतिभूती; amalgamated banking company, समामेलित अधिकोषण **कंपनी**; application money, आवेदन **रकम**, इत्यादी पर्यायांतील अधोरेखित शब्द. त्याऐवजी पुढील पर्याय अधिक स्वीकारार्ह ठरावेत : पत्रचलनांचे क्रियाशील परिचलन, पर्याप्त व्यक्तिगत प्रतिभूती, समामेलित अधिकोषण मंडळी (अथवा संस्था), आवेदन द्रव्य वा आवेदन धन.

अनेक पारिभाषिक शब्दांना या कोशात दिलेले मराठी प्रतिशब्द हे मूळ इंग्रजी पारिभाषिक शब्दांनी अभिप्रेत असलेल्या अर्थापेक्षा अगदीच वेगळा अर्थ व्यक्त करणारे आहेत.

उदा : analytical method of economics, अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धती;
anti-trust, न्यासविरोधी;
aptitude test, अभियोग्यता चाचणी;
assessment of damages, नुकसान भरपाईचे निर्धारण, इत्यादी.

वरीलपैकी पहिल्या शब्दांत analytical हे method चे विशेषण आहे, economics चे नव्हे. म्हणून 'विश्लेषणात्मक अर्थशास्त्रीय पद्धती' असा पर्याय अधिक योग्य वाटतो. 'अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धती' हे economic method of analysis (as against political or social method) असा काहीतरी अनपेक्षित अर्थ सूचित करते. न्यास याचा अर्थ ठेव असा आहे. न्यास हा शब्द Trust या अर्थी वापरला जातो. anti-

trust या शब्दांत केवळ trust हा शब्द आहे या कारणाने त्याचे 'न्यासविरोधी' असे भाषांतर करणे योग्य होणार नाही. कारण anti-trust ने नेहमी against monopoly or concentration असा अर्थ घेतला जातो. म्हणून anti-trust ला 'मक्तेदारी विरोधी' असा पर्याय अधिक योग्य होईल. Aptitude म्हणजे पात्रता, योग्यता अथवा स्वाभाविक आवड किंवा प्रवृत्ती, कल होय. मराठीत 'अभियोग' हा शब्द वापरला जातो तो खटला, फिर्याद, prosecution, suit या अर्थाने, स्वाभाविकच 'अभियोग्यता' या शब्दाने sueability किंवा possibility of prosecution असा अर्थ चटकन् घेतला जाण्याची शक्यता आहे. तेव्हा 'पात्रता परीक्षा', 'योग्यता परीक्षा', 'क्षमता परीक्षा' अथवा 'प्रवृत्ती परीक्षा' असे पर्याय अधिक बरे वाटतात. Damages म्हणजे नुकसानी. Assessment of damages मध्ये प्रथम नुकसान किती झाले आहे हेच निश्चित करणे अपेक्षित आहे. तेव्हा नुकसानभरपाई अनुस्यूत असली तरी 'नुकसान भरपाईचे निर्धारण' या पर्यायाऐवजी 'हानिनिर्धारण' हाच पर्याय अधिक युक्तियुक्त वाटतो.

प्रस्तुत कोशात काही पारिभाषिक शब्दांना सुचविलेले मराठी पर्याय वाचकांच्या मनात संदेह निर्माण करणारे आहेत. अर्थ निःसंदिग्ध व एकसारख्या वाटणाऱ्या अनेक शब्दांमधील नेमका फरक स्पष्ट करणारे असावेत. उदा. arrear due आणि arrear payable या दोन्ही परिभाषांना 'देय थकबाकी' असा पर्याय सुचविलेला आहे. arrear due म्हणजे due from others आणि arrear payable म्हणजे payable to others असा भेद अभिप्रेत असेल तर दोन्हींसाठी 'देय थकबाकी' अशा स्वरूपाच्या परिभाषेने तो स्पष्ट होत नाही. arrear due ग्राह्य शेष, आदेय शेष व arrear payable, प्रदेय शेष, अशा तऱ्हेने भेद दाखविणे आवश्यक आहे. तसेच salary या शब्दास 'वेतन' (पृ. ३८०) आणि wage याही शब्दास 'वेतन' (पृ. ४८०) असाच पर्याय सुचविला आहे. वस्तुतः wage आणि salary यामध्ये शारीरिक श्रमास दिला जाणारा मोबदला व इतर स्वरूपाच्या कार्यास दिला जाणारा मोबदला, ही जी अर्थाची छटा आहे ती अशा तऱ्हेने स्पष्ट होत नाही. तेव्हा salary वेतन व wage मजुरी, अशा निःसंदिग्ध स्वरूपात ही अर्थाची छटा स्पष्ट होणे आवश्यक वाटते. del credere agent आणि underwriter या दोन पारिभाषिक शब्दांमधील नेमका भेदही अधिक विवरणाअभावी असाच संदिग्ध राहिला आहे. पृष्ठ २९ वर average या शब्दाचे दोन अर्थ दिलेले आहेत : (१) सरासरी (२) हानिसरासरी. यातील दुसरा अर्थ हा शेअरबाजाराच्या संदर्भात आहे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. ('हानिसरासरी' या शब्दाऐवजी 'हानिन्यूनीकरण' असा पर्याय अधिक योग्य होईल). त्याचप्रमाणे average या शब्दाचा सागरीविम्याच्या संदर्भात हानी, नुकसान असा अर्थ होतो हे येथे सांगणे आवश्यक वाटते.

प्रस्तुत कोश हा अर्थशास्त्र परिभाषा कोश आहे. त्यामध्ये केवळ अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्दांच्याच नोंदी असाव्यात. सर्वसाधारण भाषेत वापरल्या जाणाऱ्या, सहजगम्य शब्दांच्या नोंदी, ते शब्द पारिभाषिक स्वरूपाचे नसल्यास, या कोशात असण्याचे कारण नाही. सदरहू कोशात ability-to-work, artist, assumed name अशा तऱ्हेच्या नोंदी आल्या आहेत. हे शब्द कुणालाही सहज समजण्यासारखे असल्याने, वा पारिभाषिक स्वरूपाचे नसल्याने त्यांचा समावेश या कोशात करण्याची आवश्यकता वाटत नाही.

याच्या उलट काही आवश्यक अशा महत्त्वाच्या शब्दांचा अपेक्षित असूनही या कोशात समावेश झालेला दिसत नाही. यच्चयावत् पारिभाषिक शब्दांचा समावेश असलेला कोश तयार करणे कठीण आहे हे खरे असले तरी काही पारंपरिक संज्ञा या कुठल्याही पारिभाषिक कोशात असायला हव्यात,

अशी अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही. सर्वसाधारणपणे एम. ए. परीक्षेपर्यंतच्या पाठ्यपुस्तकांतून आढळ-णाऱ्या शब्दांचा समावेश या कोशात असावा अशी अपेक्षा धरली तर त्यात काहीच चूक नाही, या दृष्टीने पुढील शब्दांसारख्या पारिभाषिक संज्ञांच्या नोंदी अपरिहार्य आहेत असे सुचवावेसे वाटते. उदा. Austrian school, Bullion standard, Classical school, Marshall plan, Zollvrein, इत्यादी. तसेच ton आणि tonne असे शब्द त्यांतील अर्थांचा फरक स्पष्ट होईल अशा तऱ्हेने, billion सारखे शब्द, अमेरिकन संख्यापद्धती व ब्रिटिश संख्यापद्धतीप्रमाणे असलेला अर्थबदल स्पष्ट होईल अशा स्वरूपाने या कोशात समाविष्ट होणे आवश्यक आहे असे वाटते.

येथपर्यंत स्थूलमानाने विवेचन झाले. आता काही विशिष्ट शब्दांच्या नोंदी थोडक्यात तपासून बघू. Absolute necessaries, नितांत आवश्यकता. Necessaries हे मूळात विशेषण आहे. त्याला पर्याय सुचविताना भाववाचक नामाने पर्याय देणे योग्य वाटत नाही. Annuity formula, वार्षिक विवरण सूत्र. Annuity म्हणजे वार्षिकी, वर्षासन. तेव्हा annuity formula याचा ' वार्षिक विवरण सूत्र ' असा अर्थ देणे निखालस चुकीचे आहे. ' वार्षिकी विवरण सूत्र ' अशी शब्दयोजना हवी. Anomalous mortgage, अनामी गहाण. येथे अनामी या शब्दाने ' नाव न देता, ' नामोल्लेखाशिवाय असा अर्थबोध होतो anomalous या शब्दाचा स्पष्ट अर्थ ' असंगत ' ' नियमबाह्य ' असा आहे. तेव्हा ' अनामी गहाण ' पेक्षा ' नियमबाह्य गहाण ' असाच पर्याय देणे इष्ट होय.

अर्थशास्त्रज्ञांना लोकसंख्येचा प्रश्न हा नेहमीच चिंताविषय असतो. भारतीय अर्थशास्त्रज्ञांना तर लोकसंख्येचा प्रश्न फारच भेडसावणारा झालेला आहे. पण म्हणून अर्थशास्त्रज्ञांनी ' विवाह म्हणजे साक्षात मृत्यूच ' असे काहीसे सुचविणे कितपत योग्य होईल ? तशी अगदी चक्रावून सोडणारी पृष्ठ ८६ वरील पुढील नोंद पहा. crude death rate = crude marriage rate, मृत्युदर.

' Chain stores 'लाच mutiple shops असे म्हणतात. या संज्ञांना ' बहुशाखी दुकान ' हा पर्याय निश्चित केलेला आहे. " परिभाषानिर्मितीची प्रक्रिया " या आपल्या लेखात प्रा. रमेश पानसे यांनी या शब्दावर सविस्तर चर्चा केलेली आहे[२]. तरीही असे म्हणावेसे वाटते की अशा तऱ्हेच्या परिभाषांच्या संदर्भात, इंग्रजी परिभाषेत ज्या क्रमाने शब्द आले आहेत त्याच क्रमाने ते मराठी पर्यायातही आले पाहिजेत असा काहीसा अव्यक्त आग्रह समितीने मनाशी बाळगलेला असावा. असा आग्रह असण्याचे कारण नाही. तसेच, प्रा. पानसे म्हणतात त्याचप्रमाणे ' भांडार ' हा शब्द संस्कृतमधून मुद्दाम आणण्यासारखे होत नाही. ' दुकान ' या शब्दाइतकाच जवळजवळ मराठीत सर्वत्र तो रूढ आहे. अगदी खेडोपाडी देखील, तेव्हा Chain stores ला ' बहुशाखी दुकान ' असा पर्याय शोधण्यापेक्षा ' भांडारमाल ' ' भांडारमालिका ' अथवा ' भांडारशृंखला ' असे शब्द वापरण्यास काय हरकत असावी ?

एवंच या शब्दकोशास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी त्याच्यावर वरील विवेचनाप्रमाणे सर्वंकष संस्करण आवश्यक आहे.

सुरेश्वर गोस्वामी

---

२. रमेश पानसे, परिभाषा निर्मितीची प्रक्रिया, अर्थसंवाद, एप्रिल-जून, १९७९, खंड २, अंक १, पृ. ३१.

■ ■

# अर्थशास्त्राची मूलतत्त्वे

[ विविध ज्ञान विस्तार, पुस्तक २४, मे १८९२ च्या अंकात – अंक ५ – हे ग्रंथपरीक्षण प्रसिद्ध करण्यात आले. मिसेस फासेट यांच्या इंग्रजी ग्रंथाच्या आधाराने रा. रा. गणेश जनार्दन आगाशे, बी. ए. हेडमास्तर, ठाणे हायस्कूल, यांनी लिहिलेल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथाचे हे परीक्षण आहे. परीक्षणकर्त्यांचे नाव मात्र संबंधित अंकात दिलेले नाही. डेक्कन कॉलेजच्या १८९२ च्या वार्षिक संमेलनप्रसंगी ३० जुलै १८९२ रोजी रावबहादुर म. गो. रानडे–न्यायमूर्ती रानडे–यांनी ग्रंथालयाच्या सभागृहात 'Some Aspects of the Indian Political Economy' या विषयावर निबंध वाचला (Deccan College Quarterly, Vol. 1, No. 2, October, 1892). सदरहू निबंधात, इतर देशांच्या दृष्टीने प्रस्तुत ठरणारे अर्थशास्त्रीय नियम हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत त्यास लागू का करता येत नाहीत याचे विवेचन रानड्यांनी केले होते. या ग्रंथपरीक्षणात देखील हाच विचारविस्ताराने मांडला आहे. परंतु हे परीक्षण न्या. मू. रानडे यांच्यासारख्या मान्यवर विचारवंताच्या निबंधाच्या साधारणतः दोन महिने आधी प्रसिद्ध झाले होते ही उल्लेखनीय गोष्ट आहे. या ग्रंथपरीक्षणाचे आम्ही येथे पुनर्मुद्रण करीत आहोत.

संपादक ]

हा ग्रंथ आमचे अभिप्रायाकरिता ग्रंथकाराने पाठवून आज सुमारे सत्रावर्ष झाले. इतका काल अभिप्राय देण्याकरिता घेतला याबद्दल आम्ही ग्रंथकाराची व वाचकांचीही क्षमा मागतो. एकतर प्रकृत टीका करणाराला दुसरे पुष्कळ व्यासंग असल्याकारणाने हा ग्रंथ वाचून त्यावर टीका करण्याला वेळ फावेना. दुसरे कारण असे की, असल्या ग्रंथावर टीका उडत उडत करावी असे त्याचे मन घेईना. अर्थशास्त्राच्या विषयावरील नवीन ग्रंथ वाचून मग या ग्रंथावर टीका करावी, असा मनाचा निश्चय करून ते ग्रंथ हाती घेतले. वाटले होते दोन तीन महिन्यात वाचन होईल. पण ग्रंथांची संख्या अजमासाबाहेर गेली, व कामही शक्तीबाहेर वाढू लागले. अजूनही जितके ग्रंथ वाचण्याची इच्छा धरिली होती तितके वाचून झाले नाहीत, व ज्या कसोशीने त्यांचे अध्ययन व्हावयाला पाहिजे होते तसेही झाले नाही. तर मग टीका करण्याचे धाडस काय म्हणून केले ? यावर उत्तर हेच की, या मासिकपुस्तकाच्या प्रकाशकांस वेळोवेळी वचने देत गेलो, ती पुरी होत नाहीत अशी त्यांची तर खातरी झाली असावीच, परंतु खरा देणेकरी सर्व कर्ज नाहीतर नसो पण थोडे तरी देऊन आपल्या मनाची समाधानी करून घेतो, त्याप्रमाणे हा प्रयोग आहे. या टीकेतील न्यूने व दोष प्रकृत लेखक जाणून आहे. पण ते काढून टाकण्याला त्याला फुरसत नाही.

हा ग्रंथ मिसेस फासेटच्या ग्रंथाचे आधाराने लिहिला आहे. केवळ भाषांतर नव्हे. मूळातील काही भाग प्रतिकृतीत वगळले आहेत, व काही नवीन भाग विशेषेकरून हिंदुस्थानास लागू असे घातले आहेत. उ० जमीनधाऱ्याचे प्रकार ( पृष्ठे १७९–१८६ ); सर जेम्स फर्ग्यूसन यांनी दक्षिण महाराष्ट्रातील आगगाडी

सुरू करण्याचे समारंभी केलेल्या भाषणाचे सार ( पृ. २७१–२७४ ); हिंदुस्थानच्या आयात व निर्यात माल यांचे आकडे ( पृ. २९८ ); हुंड्या ( पृ. ३१२ ); कागदी चलन अथवा नोटा याविषयी माहिती ( पृ. ३१६–३१८ ). या नवीन भागात "प्रेसिडेन्सी बँकांची" माहिती दिली असती तर बरे होते. मूळांतील काही भाग गाळले आहेत असे दिसते, परंतु खात्रीपूर्वक आमच्याने लिहवत नाही. कारण ज्या आवृत्तीवरून रा. रा. आगाशे यांनी आपला ग्रंथ लिहिला, ती आवृत्ती चौथीच्या पुढची असावी असे वाटते. आमच्याजवळ जी आवृत्ती आहे ती चौथी असून सन १८७६ साली काढलेली आहे. त्या आवृत्तीशी हा ग्रंथ आम्ही ताडून पाहिला आहे.

जेथे मूळाचे भाषांतर केले आहे तेथे एकंदरीत चांगले साधले आहे. भाषा सरळ व सोपी आहे. नवीन शब्दांची योजना केली आहे, ती एकंदरीत आम्हास बरी वाटली. संप व कट या शब्दांच्या अर्थात फरक करून पाहिला. कामदारांच्या [ कामकऱ्यांच्या ( workmen, working classes ) असा शब्द योजिला असता बरे झाले असते ] जुटीस ( strike ) व दुसरा योजकांच्या ( Employers ) जुटीस ( Lock-out ) योजिला हे बरे झाले. भांडवलवाला किंवा धनिक ( Capitalists ) व कारखान्याचे मालक किंवा धंदेवाले ( Employers ) यांच्याकरिता निराळे शब्द घातले असते तर बरे होते. आम्ही Employer : entrepreneur ( हा फ्रेंच शब्द आहे. याबद्दल मि. मिल यांनी "undertaker" हा शब्द घातला आहे, पण त्याचा व्यवहारात भलताच अर्थ होतो म्हणून त्यांनी दिलगिरी दाखविली आहे. ) या शब्दाबद्दल "योजक" हा शब्द योजू. कारण धनिक अक्षयी योजक नसतात, व सर्व योजक धनिक नसतात. Fixed आणि Circulating capital याबद्दल "अविनाशी" आणि "विनाशी भांडवल" असे शब्द रा. रा. आगाशे यांनी घातले आहेत; आमच्या मते "स्थिर" व "फिरते" असे पूर्वीच्या ग्रंथातून शब्द आढळतात तेच बरे होते. Rent बद्दल "धारा" व Land-tax बद्दल "सारा" असे शब्द योजावयाचे होते.

क्वचित भाषांतर दुर्लक्षाने चुकले आहे; त्यातील काही स्थळे शेवटी पुरवणीत दिली आहेत. त्यांचा विचार ग्रंथकाराने वचन दिल्याप्रमाणे (पृ. २) द्वितीयावृत्तीत होईलच.

येथपर्यंत ग्रंथाच्या भाषेच्या संबंधाने विचार आला. आता विषयाच्या संबंधाने लिहावयाचे.

या ग्रंथाला आधार मिसेस फासेट यांच्या ग्रंथाचा आहे. मिसेस फासेट या बाई उत्तमलोकवासी मि. फासेट यांच्या पत्नी. मि. फासेट यांचा अर्थशास्त्रावरील ग्रंथ युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत नेमिला आहे. मि. फासेट व मिसेस फासेट यांचे विचार बहुतेक एकच. उभयतां मि. मिल्ल यांचे शिष्य होत. तेव्हा दोन्ही ग्रंथात मि. मिल्लच्या मतांचे सार आहे. मिल्लचा ग्रंथ सन १८४८ त प्रसिद्ध झाला, त्याची दुसरी आवृत्ती १८४९ त निघाली व तिसरी सन १८५२ त निघाली. प्रथमपासूनच हा ग्रंथ सर्वमान्य झाला. हा ग्रंथ केवळ औपपत्तिक ( Abstract Science ) नसून प्रयोगात्मकही आहे. अर्थशास्त्र मिल्लच्या मते स्वतंत्र शास्त्र नसून सामाजिक शास्त्राचा एक भाग आहे. तेव्हा अर्थशास्त्रातील सिद्धांत स्वतंत्रपणे व्यवहारात लागू करणे बरोबर नाही. त्यांचा सामाजिक शास्त्राचे इतर सिद्धांतांशी मेळ घालून त्यात कमीजास्त फरक केला पाहिजे. नुसत्या अर्थशास्त्राचे जोरावर कोणतीही गोष्ट अमलात आणता कामा नये. ( Mill's Autobiography, P. 236 ). मि. मिल्ल यांनी या ग्रंथात पूर्वीचे अर्थशास्त्रावरील सर्व ग्रंथकारांच्या मतांचे संकलन करून आपले मतही दिले आहे. याच्या पूर्वीचा या विषयावर सर्वमान्य ग्रंथ म्हणजे अॅडम स्मिथचा. तो १७७६ त प्रसिद्ध झाला. परंतु त्यातील काही मते कालांतराने चुकीची

ठरली. नवीन शोध झाले : ते सर्व मि. मिल्ल यांनी आपल्या ग्रंथात गोविले. मि. मिल्ल हे तर्कशास्त्राच्या नियमांस यथातथ्य अनुसरून सिद्धांत ठरविणारे; त्यांचे वाचनही दांडगे; मन प्रांजळ–उभय पक्षाचे विचार संथपणे ऐकून घेऊन तत्त्व शोधणारे, प्रत्येकाचा पक्ष यथास्वरूप दाखविण्यात त्यांचा हातखंडा, भाषा सरळ व सोपी, तेव्हा ग्रंथ सर्वमान्य झाला यात नवल नाही. या ग्रंथात संपत्तीच्या उत्पत्तीचे नियम हे नैसर्गिक नियमास अनुसरून आहेत, म्हणून ते अविकारी अपरिहार्य आहेत (Real of Laws Nature), व संपत्तीच्या वाटणीचे नियम काही अंशी मनुष्याच्या इच्छेवर आहेत, असा दोहोंत भेद दाखविला. एवढ्यावरून हल्लीचे धनिक आणि मजूर, जमीनदार आणि शेतकरी यातील परस्परसंबंध जरूर वाटल्यास मनुष्याच्या अगर सरकारच्या इच्छेने फिरवता येतील, परंतु संपत्तीच्या उत्पत्तीचे नियम फिरविता येणार नाहीत, असे सिद्ध झाले. मि. मिल्लच्या ग्रंथात सामान्यजनसमूहासंबंधाने ठायी ठायी कळकळीचे उद्गार आहेत. मिल्ल हा तत्त्वशोधक असल्याकारणाने त्याचा संपत्तीवर फारसा लोभ नसे, प्रसंगी तिला तो तृणवतही मानी. शिवाय व्यापाराची अथवा उद्योगधंद्यांची त्यास स्वानुभवावरून माहिती नसल्याकारणाने व्यापारातील क्लिष्ट उलाढालींच्या खोल पाण्यात तो फारसा शिरला नाही असा त्यावर आक्षेप आहे. ( Bagehot's Postulates of English Political Economy, pp. 30 ). तरी त्याचा ग्रंथ सुमारे सन १८७० पर्यन्त अगदी प्रमाणभूत होता. त्यावेळी सर्वांचे असे मत झाले की "अर्थशास्त्राची मुख्य तत्त्वे आता ठरली. पाया भक्कम आणि मजबूत घातला आहे; आता राहिले आहे ते इतकेच की त्यावर इमारत उठवायची." मि. मिल्ल यांचाहि समज असाच झाला होता. पण सन १८६९ त मि. थार्नटन यांच्या "श्रम किंवा मजुरी" या ग्रंथावर मि. मिल्ल यांनी "फोर्टनाइटली रिव्हयू" या मासिक पुस्तकात टीका केली, तीत वेतनांशासंबंधाने ( wages fund ) जे त्यांचे ठाम मत कैक वर्षे झाले होते, ते प्रांजलपणे चुकीचे आहे असे त्यांनी कबूल केले. [हे वेतनांशासंबंधाने मत जसेच्या तसेच मि. फासेट व मिसेस फासेट यांच्या ग्रंथांत आहे, व तेच रा. रा. आगाशे यांनी टीकाविषयक ग्रंथात दाखल केले आहे.] गुरुजींनी चुकी पदरात घेतली म्हणून मिल्लच्या पट्ट शिष्यांस वाईट वाटले. त्यांचा असा समज झाला होता की, आमचे गुरु स्खलितातीत आहेत. पुढे मि. जेवन्स यांनी नवीन ग्रंथ सन १८७१ त प्रसिद्ध केला व सन १८७४ साली मि. केर्न्स यांचा अर्थशास्त्रावरील ग्रंथ निघाला. या दोहोंतही मि. मिल्लच्या कित्येक मतांवर जबरदस्त आक्षेप घेतले आहेत. केर्न्स हा मिल्लचा शिष्य, त्याची गुरुभक्ती फार; तरी वादात गुरूला गुरू न म्हणणारा व आपणास चुकीच्या वाटलेल्या मतांच्या चिंधड्या चिंधड्या उडवून देणारा. तेव्हा याच्या ग्रंथाने मिल्लचे सर्वमान्यत्व डळमळू लागले. इकडे व्यवहारात भांडवलवाले आणि मजूर यांचे तंटे विकोपाला येऊ लागले. अर्थशास्त्राच्या मुख्य सिद्धांतापैकी जो एक आद्य सिद्धांत की "प्रत्येक मनुष्य स्वहित पाहतो" त्यावरच कुऱ्हाड कितीएक घालू लागले. एकाने शस्त्र उचलण्याची वाट, तो दुसरेही वीर शस्त्रे घेऊन आले, व कोणी एकावर कोणी दुसऱ्यावर, अशा तऱ्हेने मिल्लच्या बऱ्याच मतांवर आक्षेप टाकले. जो तो अर्थात् अहंमन्यतेने आपआपल्या कृतीची तारीफ करू लागला. परंतु या सर्व आक्षेपांचा विचार करून मि. मिल्लच्या ग्रंथाचे परिशोधन मि. सिजविक यांनी केले. मिल्लचे सर्व मुख्य सिद्धांत त्यांस खोटे वाटले नाहीत, तर इतकेच की त्यांचे पुनः चालू करणे भाग पडले. कोठे पुस्ती द्यावी लागली. कोठे शोध घालावे लागले, व थोड्या ठिकाणी हरताळही लावावी लागली. मिल्लने जसे पूर्वीच्या अर्थशास्त्रकारांचे मतांचे संकलन सन १८४८ त केले, तसे मि. सिजविक यांनी पुढच्या २५ वर्षांच्या टीकाकारांचे मतांचे संकलन करून आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. नुकता मि. मार्शल साहेबांनीही १८९१ त त्याच धर्तीवर आपला ग्रंथ लिहिला आहे. मि. सिजविक यांचा ग्रंथ बारकाईने लिहिला आहे. कोणताही सिद्धांत अगदी ठाम सर्वव्यापी असा सांगितला नाही. त्याचे अपवाद, प्रत्ययवाद, कोणत्या प्रसंगी लागू, कोणत्या प्रसंगी लागू नाहीत, अशा-

बहुल फोक, यांनी तो भरला आहे. यामुळे ग्रंथ वाचावयास जड जातो खरा, पण ज्याला तत्त्व शोधून काढण्याची आवड आहे त्यांनी हा ग्रंथ अवश्य वाचावा, अशी आमची शिफारस आहे.

वर जो अर्थशास्त्राच्या सुधारणेचा संकलित इतिहास दिला तेवढ्यावरून मिसेस फासेट यांचा ग्रंथ (व त्यांच्या आधारे रचलेला रा. रा. आगाशे यांचा ग्रंथ) याचा संबंध मागील व पुढील अर्थशास्त्र-कारांच्या ग्रंथांशी कसा आहे हे उघड होईल. रा. रा. आगाशे यांनी मि. जेवन्स यांच्या लहान ग्रंथाचे भाषांतर केले होते, व ते त्यांनी तपासूनही ठेविले होते. परंतु दक्षिणा प्राईझ कमिटीच्या जाहिरातीला वश होऊन त्यांनी ते गुंडाळून ठेवून मिसेस फासेट यांच्या ग्रंथाचेच भाषांतर तयार केले, व ते पसंत होऊन मे. डायरेक्टर साहेबांच्या उत्तेजनाने छापून काढले. मिसेस फासेट यांचा ग्रंथ बालबोधार्थ चांगला आहे हे सांगणे नको व आमच्या देशांत बरेच शिकलेलेही लोक अर्थशास्त्राध्ययनाच्या संबंधाने बालच आहेत. समग्र अर्थशास्त्रावर मराठी भाषेत रा. रा. आगाशे यांचा पहिलाच ग्रंथ. कैलासवासी चिपळूणकर यांचा ग्रंथ संपत्तीच्या उत्पत्तीवरच आहे. हा मि. मिल्ल यांच्या आधारे लिहिलेला. आमच्या मासिक पुस्तकात प्रथमारंभी मि. मिल्लच्याच आधारे काही निबंध आले आहेत व वऱ्हाडातील "ज्ञानसंग्रहात" अर्थ-शास्त्रावर आलेले निबंध मि. सीनियरच्या आधारे लिहिले आहेत. ते समग्र छापण्याचे अभिवचन झाले आहे. या शिवाय क्रमिक पुस्तकांतून अर्थशास्त्रावरील धडे आहेत. ते आर्चबिशप व्हेटली यांच्या (Lessons on Money Matters) यांच्या आधारे लिहिले आहेत. अर्थशास्त्रावरचा मराठीतला आद्य ग्रंथ रावसाहेब बापटकृत "लक्ष्मीशास्त्र" आमचे पाहण्यात आला नाही. वर जे अर्थशास्त्र सांगितले ते इंग्रजी अर्थशास्त्र आहे असे म्हटले पाहिजे. त्याची उत्पत्ती इंग्लंडात झाली व त्याची वाढही तेथेच झाली. मोठे यश त्याला मिळाले ते तेथेच. हे इंग्लंडात जन्मलेले अर्थशास्त्र युरोपखंडातील इतर देशांस फारसे प्रिय नाही. ते पाहून फ्रान्स कपाळाला आठ्या घालते, जर्मनी नाक मुरडतो व रशिया मानेला झटका देतो. खुद्द इंग्लंडचे बालक स्वतंत्र संस्थाने स्थापून कर्तेसवरते झाले, ते इंग्लंडच्या अर्थशास्त्राला पुसत नाहीत. आस्ट्रेलियात इंग्लंडातील लोक वसाहत करून राहिले त्यांच्या कानी कपाळी इंग्लंडचे अर्थशास्त्रकार आपली मते ओरडून सांगतात, पण त्यांनी जे कानात कापसाचे बोळे घातले आहेत ते काही काढीत नाहीत. पण जे हे इंग्रजी अर्थशास्त्र सर्वांनी धुतकारून दिले ते हिंदुस्थानात ब्रिटिश सरकारच्या सत्तेने प्रचलित झाले आहे.

या इंग्रजी अर्थशास्त्राचा पाया कोणता आहे तो पाहू. या पायावर सर्व इमारत रचली आहे; तेव्हा पायात काय काय घातले आहे याचे अवलोकन करू.

अर्थशास्त्राची उत्पत्ती इंग्लंडमध्ये झाली म्हणून वर म्हटले ती इंग्लंडातच का? याचे कारण हे की इंग्लंडात व्यापार धनंतरे प्रथम झाला. उद्योगधंदे तेथे वृद्धीस पावले. मोठमोठ्या पेढ्या तेथे स्थापन झाल्या. 'बिल्स ऑफ एक्सचेंज' (Bills of Exchange यास रा. रा. आगाशे यांनी हुंड्या असे नाव दिले आहे; परंतु आमच्या मते हुंड्यात आणि यात फरक आहे.) प्रॉमिसरी नोटा, खानगी पेढ्यांच्या नोटा, संभूयसमुत्थानाने उभारलेल्या मंडळ्या (Joint Stock Companies), बटाऊ व बिनबटाऊ चलनी कागद (Convertible and inconvertible paper currency), चेक (cheque), हुंडीवाल्यांचा अड्डा (Clearing House) यांचा उदय इंग्लंडात प्रथम झाला. मुंबईस किंवा पुण्यास जो गृहस्थ कधी गेला नाही, त्याला हे शब्द रा. रा. आगाशे यांचे ग्रंथात पाहून कसेचसे वाटेल. त्याला या ग्रंथातील जग अश्रुतपूर्व व अदृश्यपूर्व वाटल्यावाचून राहणार नाही. पण या सर्व गोष्टी इंग्लंडातील लोकांस रोजच्या

पाहण्यातल्या, रोजच्या अनुभवाच्या. त्या पाहून त्यांची संगतवार जुळणी करून त्यातील सामान्य नियम बांधणे इंग्लिश अर्थशास्त्रकारांस सोपे झाले. पण हे सारे सामान्य नियम इंग्लंडातील धनत्तर व्यापाराच्या पायावर रचले. ज्या देशांत असला व्यापार सुरू झाला नाही तेथे या सामान्य नियमांची व्यापकता होणार नाही. या धनत्तर व्यापाराची सर्वमान्य प्रमाणीभूत तत्त्वे आहेत; त्यांपैकी मुख्य देतो.

प्रत्येक मनुष्य स्वहितबद्ध आहे, तो परहित म्हणून पहात नाही. ही गोष्ट व्यवहाराला अथवा व्यापाराला लागू आहे व व्यवहाराचे शास्त्र या पायावर रचायला हरकत नाही. पण मनुष्य केवळ स्वहितबद्ध नाही हे आपण जाणून आहो. तो परोपकाररतही आहे. प्रथम अर्थशास्त्रकारांनी परहितबुद्धीचा त्याग करून स्वहितपर अर्थशास्त्रीय मनुष्याची कल्पना केली (Economical Man) त्याची खरोखर प्रतिकृती व्यवहारात नव्हती. पण अर्थशास्त्राची गती चांगली व्हावी म्हणून अशी कल्पना करणे सोईचे वाटले. अर्थशास्त्राचा आदि ग्रंथकार ॲडॅम स्मिथ याने मनुष्याच्या दोन बाजू—स्वहितपर आणि परहितपर—निरनिराळ्या ठेवून प्रत्येकीचे विवेचन निरनिराळ्या ग्रंथांत केले. पहिलीचे विवेचन "राष्ट्रांची संपत्ती" (Wealth of Nations) यात आहे. दुसरीचे विवेचन "नैतिकभावनांची उपपत्ती" (Theory of Moral Sentiments) या ग्रंथात आहे. एकच ग्रंथ वाचला व त्याप्रमाणे वागले तर मनुष्य अपूर्ण राहील. दोन्ही ग्रंथांतील सिद्धांतांचे संमेलन केल्याने पूर्णता येईल. अर्थशास्त्राच्या सोयीकरिता जो काल्पनिक मनुष्य बनविला त्याचे चित्र येणेप्रमाणे.

१. असा मनुष्य जो पदार्थ आपण उत्पन्न करितो त्याबद्दल अगर श्रमाबद्दल जितकी अधिक संपत्ती मिळेल तितकी मिळवू पाहतो.

२. अशा मनुष्यामनुष्यांमध्ये पूर्ण चढाओढ असते. त्यामुळे एका बाजारात पदार्थांची एकच किंमत असते.

३. प्रत्येक मनुष्याला आपले हित कशात आहे हे चांगले समजते, म्हणून (अ) तो कसर करू शकतो, (ब) मजुरी जेथे जास्त मिळेल तेथे जातो, (क) ज्या धंद्यात अथवा उद्योगात जास्त नफा मिळेल त्या धंद्यात भांडवल घालतो, व तो धंदाही पत्करितो.

या सर्व गृहीत गोष्टी आहेत. या इंग्लंडातही सर्वांशी खऱ्या नाहीत, व मागासलेल्या देशांत तर या लागू करण्यात फार चुका होतील. आपल्या देशासंबंधी थोडक्यात या गोष्टींचा विचार करू या.

१. जरी असे कबूल केले की कोणीही वेदान्ती नाही, तरी आपल्या श्रमाबद्दल अथवा पदार्थाबद्दल जितके धन मिळेल तितके मिळविण्याची सर्वजण इच्छा अक्षरशः करीत नाहीत. मैत्री, आप्तसंबंध, परोपकार या भावना थोड्या बहुत प्रत्येक मनुष्याच्या मनात वागतात, व त्या त्या मानाने या सिद्धांताची व्यापकता कमी जास्त होते.

२. आपल्या देशात चढाओढीचे प्राबल्य फारच कमी आहे. तिच्याबद्दल "वहिवाट" (Custom) हा शब्द घातला पाहिजे. वहिवाटीचा लोप युरोपातही झाला नाही, पण तिचा अंमल तिकडे फार कमी आहे. आमच्या देशात वहिवाटीचे बहुतेक ठिकाणी आतापर्यन्त साम्राज्यच होते. अलीकडे मोठमोठ्या शहरातून व गावातून तिचे प्रस्थ कमी होत चालले आहे. पण खेड्यापाड्यातून व लहानसान धंद्यांतून तिचे वर्चस्व सर्वसंमत आहे. सालदाराची मजुरी ठरलेली, न्हाव्याची मजुरी ठरलेली, शेतात निंदण-खुरपण करणाऱ्या, कापूस वेचणाऱ्या बायांची मजुरी ठरलेली, खेड्यातील जिनसांची किंमत

बहुतेक ठरलेली, धारा ठरलेला. एका बाजारात दुकानी दुकानी किंमती वेगळ्या. हा प्रकार मुंबईसारख्या ठिकाणीही नजरेस येतो. राधाबाई आत्माराम सगूण यांच्या दुकानी पुस्तके स्वस्त, तीच थाकर आणि कंपनीच्या दुकानी महाग का ? लोक आळशी, जेथे वहिवाट पडली तेथे जाणारे, पूसतपास करितो कोण !

३. हा सिद्धांत आपल्या देशात प्राय: फार कष्टाने लागू करिता येणार. आपल्या लोकांचा अडाणीपणा व स्वहितासंबंधी अज्ञान ही लोकविश्रुत आहेत. सरकारही ती जाणून आहे. म्हणून तर "दक्षिणेतील शेतकऱ्यांच्या सोडवणुकीकरिता कायदा" ( Deccan Agriculturists' Relief Act ), बंगालच्या जमिनदारांच्या कुळांचा कायदा ( Bengal Tenancy Act ), आसाम प्रांतातील मजुरांचा कायदा ( Assam Coolies' Act ) वगैरे कायदे झाले.

( अ ) करार अडाणी शेतकऱ्याला करता येत नाहीत, कारण त्यांना आपले हित समजत नाही, म्हणून सावकाराचे मागील हिशेबही पाहण्याचा जज्जास अधिकार दिला आहे. शेतकऱ्यांची स्थिती तीच कमी जास्त इतरांची.

( ब ) शहरातून मजुरी चांगली मिळाली तरी लोक फारसे शहरात येत नाहीत, त्यांना घरदार सोडवत नाही. सोडवते तर अयोध्या प्रांत, व वायव्येकडील प्रांत, यात इतकी दाटी का असते ? व नागपूर प्रांतात जमीन मुबलक व पाऊस चांगला असून इतकी पातळ वस्ती का असते ? ब्रह्मदेशात जाण्याला लोक का मागे पाय घेतात ?

( क ) आमच्या देशात जाती अनेक, बऱ्याच जाती धंद्यांच्या बनलेल्या. सुतार लोहाराचे काम करणार नाही, शिंपी घिसाड्याचे काम करणार नाही, चांभाराचा व खाटिकाचा कोठेही दुसरीकडे शिरकाव व्हावयाचा नाही, ब्राह्मण लेखणी घेऊन बसणार. अशा स्थितीत पाहिजे तो धंदा लोक पत्करतील अशी गृहीत गोष्ट घेणे चुकीचे होईल. पण अशी गृहीत गोष्ट घेऊन "मजुरी", "नफा", "पदार्थांच्या किंमती" यांचे नियम बांधले आहेत. ते सर्वांशी आपल्या इकडे कसे लागू पडणार ?

मनुष्याच्या संबंधाने अशा या गृहीत गोष्टी घेतल्या तशाच ( ४ ) जमिनीच्या संबंधाने ( ५ ) लोकसंख्येच्या वृद्धीच्या संबंधाने ( ६ ) धान्याच्या संबंधाने व ( ७ ) उद्योगधंद्याच्या विशेष सोयीच्या संबंधाने चार गृहीत गोष्टी घेतल्या आहेत त्यांचा यथानुक्रम विचार करू.

४. शेती जसजशी वाढवावी तसतसे तिचे उत्पन्न तीवर लावलेले श्रम व भांडवल यांच्या कमी होत जाते.

ही गृहीत गोष्ट राष्ट्राच्या काही स्थितींत खरी नसते व काही स्थितींत जरी काही अंशाने खरी असते, तरी तिला बाधक अशा दुसऱ्याही काही गोष्टी असतात. जेथे वस्ती फार पातळ आहे—उदाहरणार्थ मध्यप्रांत, ब्रह्मदेश इ.—तेथे जमीन इतकी सुपीक असते की जितके श्रम व जितके भांडवल तीवर लावावे तितके, किंवा त्याहूनही अधिक मानाने, उत्पन्न निघते. जेथे वस्ती पुष्कळ झाली आहे, तेथे कमी उत्पन्नाचा नियम साधारणत: लागू पडतो. परंतु त्याला प्रतिरोधक गोष्टी आहेत–शेतीचे ज्ञान वाढले, नवीन खते मसाले तयार झाले, यांत्रिक शक्तीचा शेतीत जास्त उपयोग झाला, तर त्या नियमाचा प्रतिरोध होतो. तेव्हा नियम कोठे लागतो, कोठे लागत नाही, हे पाहणे अवश्य आहे.

५. शेती जास्त वाढविण्याची आवश्यकता प्रत्येक देशात येते, याचे कारण मनुष्यवस्ती दिवसानुदिवस भूमितिश्रेढीने वाढत जाते, हे अर्थशास्त्राचे पाचवे प्रत्यक्ष प्रमाण आहे. या गृहीत गोष्टीवर

फारसा आक्षेप घेता येणार नाही. तरी मनुष्याच्या वस्तीची वाढ कमी करणारी दोन प्रकारची कारणे—एक नैसर्गिक ( Positive ) व दुसरी कृत्रिम ( Prudential ) म्हणून सांगितली आहेत, त्यांपैकी पहिल्या प्रकारच्या कारणांचा अंमल आमच्या देशांत जोराने चालू आहे. साथींनी लक्षावधी लोक मरत आहेत; दुष्काळ नियमाने बळी घेतच आहे; उपासमार शेकडा चाळीस लोकांच्या पाठीमागे लागला आहे, असे सरकारचेच कामगार कबूल करतात; अशा ठिकाणी कृत्रिम कारणांचे म्हणजे इंद्रियदमनाचे किंवा विवाहनिषेधाचे नाव कशाला घ्यावे ? जेथे कोणतीही स्त्री जन्मास आली व ती नऊ-दहा वर्षानंतर वाचली तर अविवाहीत सापडावयाची नाही, जेथे पुत्रप्राप्तिवाचून उत्तम गती मिळावयाची नाही असा समज असल्याकारणाने बहुतेकांचे विवाह होत आहेत, तेथे विवाहनिषेधाची वार्ता कशाला पाहिजे ?

६. चौथी व पाचवी प्रमाणभूत गृहीत गोष्ट धरून इंग्लिश अर्थशास्त्रकारांनी धाऱ्याचा नियम बसविला आहे, ते सहावे प्रत्यक्षप्रमाण. ते असे. देशात जी अतिनिकृष्ट जमीन असेल तिचे उत्पन्न ( किंवा कोणत्याही जमिनीवरचे महत्तम उत्पादनाचे खर्चाने काढलेले उत्पन्न हा दुसरा पक्ष रा. रा. आगाशे यांनी दिला नाही ). कोणत्याही दुसऱ्या जमिनीचे उत्पन्नातून वजा दिले असता बाकी जे उत्पन्न राहते तो धारा. यात अशी एक गृहीत गोष्ट घेतली आहे की, जो कोणी शेती करतो तो नफा मिळविण्याकरिता करतो, पोट भरण्याकरिता करीत नाही. इंग्रजी अर्थशास्त्रकार असे समजतात की, ज्या जमिनीचे उत्पन्नातून श्रमाची मजुरी सुटत नाही, भांडवलाचे मामुली व्याज सुटत नाही, व देखरेख व साहस याबद्दल मामुली नफा सुटत नाही, ती जमीन कोणीही वाहायला घेणार नाही. ही गोष्ट इंग्लंडात खरी आहे. तेथे शेती करणारे भांडवलवाले आहेत ( Capitalist farmers ) ते मजूर लावतात, त्यांना मजुरी दर आठवड्यास चुकवून देतात. जमिनी कौलाने घेऊन त्यांची सुधारणा करितात, व वर्षाचे अखेरीस जमीन-दारांना धारा देतात. हा सर्व खर्च वजा जाता त्यांना भांडवलावर मामुली व्याज व आपल्या देखरेखीबद्दल नफा सुटला नाही तर ते शेती सोडून देतात, व दुसरा धंदा पत्करितात. तिकडे धंदे पुष्कळ आहेत. तसा प्रकार हिंदुस्थानात कोठे आहे ? इकडे लोक शेती करितात ती नफ्याकरिता करीत नाहीत, पोटाकरिता करितात. नफा सुटो न सुटो, व्याज मिळो न मिळो, त्यांची जन्माची शेती कधी सुटायची नाही. अशा ठिकाणी इंग्रजी अर्थशास्त्राचा धारा कसा लागू पडणार ?

७. इंग्रजी अर्थशास्त्रकार आणखी एक सातवी गृहीत गोष्ट घेतात ती ही प्रत्येक देशातली जमीन, तेथील हवा, पाणी वगैरे सृष्टपदार्थसंपत्तीच्या योगाने काही विशेष धंद्यास किंवा उद्योगास ( Industry ) अनुकूल असते. ही गोष्ट कबूल आहे. या गृहीतावर ते अशी इमारत रचतात की, हल्ली ज्या ज्या देशात जे जे विशेष धंदे व उद्योग स्थापन झाले आहेत ते ते त्या देशाच्या स्थितीस अनुसरून आहेत ( हे अनुमान खोटे आहे ). म्हणून भलताच धंदा नवीन काढायचा असेल, तर त्याला लोकांनी अगर सरकारने उत्तेजन कोणत्याही प्रकारे देऊ नये. या मताचे नाव अप्रतिबंध व्यापारमत ( free trade policy ). हे मत इंग्लंडातही प्रथम संमत नव्हते. म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीच्या लढाया संपल्यावर परदेशाचे धान्य आपल्या देशात येऊ देऊ नये म्हणून पार्लमेंटाने धान्याचा कायदा ( corn laws ) पास केला. त्यावरून परदेशाच्या धान्यावर जबरदस्त कर घेत. पुढे तीस वर्षांत यांत्रिक कारखान्यांची इंग्लंडात फार भरभराट झाली, व यांत्रिक मजुरांना मजुरी मिळू लागली तिचा बराच अंश धान्यात खर्च होऊ लागला. तेव्हा रोटीची किंमत कमी व्हावी, व मजुरांची स्थिती सुधारावी म्हणून धान्याचे कायदे रद्द करून घेण्याच्या उद्देशाने एक मंडळी ( Anti-corn Law League ) स्थापन झाली. तिचे अध्वर्यु कॉब्डन व ब्राईट यांनी अविश्रांत श्रम करून ठिकठिकाणी व्याख्याने देऊन लोकमत आपल्याप्रमाणे करून घेतले. हे लोकमत

पार्लमेंटास कबूल होऊन धान्याचे कायदे रद्द झाले (इ. सन १८४६). त्यानंतर वीस वर्षांपर्यंत कारखान्यांची भरभराट होत गेली व अर्थशास्त्रावर लोकांचा विश्वास जास्त जास्त बसत चालला. तेव्हा ज्या अर्थशास्त्राने ही मोठी लढाई मारली त्याचे अभिनंदन त्याचा गौरव इंग्लिश लोक करतील यात नवल नाही. पण ही एक बाजू झाली. दुसरी बाजू पाहणे आपणाला अवश्य आहे. ती आम्ही आपल्या शब्दांनी दिली तर कदाचित वाचकांची खातरी होणार नाही. म्हणून एका प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकर्त्याच्या शब्दांनी देतो. यांचे नाव साम्यएल लेंग, हे हिंदुस्थानात फिनान्स मिनिस्टर होते व यांनीच हिंदुस्थानात सरकारी नोटा सुरू केल्या.

"जेव्हा ४० वर्षांपूर्वी सर राबर्ट पील यांनी रिचर्ड कॉबडेन याचे साधे वक्तृत्व ऐकून आपले मत फिरवून अप्रतिबंध व्यापार सुरू करविला, व त्याची उत्तम फळे सर्वांस दिसून आली, तेव्हा प्रत्येकास वाटले की सुधारलेली जगातील इतर राष्ट्रे लवकरच अप्रतिबंध व्यापारमत स्वीकारतील. चाळीस वर्षांनी अप्रतिबंध व्यापारास अनुकूल काय ते एकटे इंग्लंड राहील, व त्याच्या उलट जे संगोपन मत ते फ्रान्स व जर्मनी यातच दृढ होणार नाही, तर स्वतंत्र संस्थाने, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यातील इंग्लिश भाषा बोलणारे लोकही कबूल करतील, व या मतवाद्यांची संख्या वाढतच जाईल असे विधान करण्याची चाळीस वर्षांपूर्वी कोणाचीही छाती झाली नसती. पण आजला अशी स्थिती आहे. कॉब्डेन क्लबचे लेख व सामान्य इंग्लिश गृहस्थांस जी प्रमाणे निर्बाध वाटतात, ते लेख व ती प्रमाणे एकीकडे झुगारून देऊन अप्रतिबंध व्यापारमताच्या उच्छेद करून संगोपनमतवाद्यांचा पक्ष या वर्षात एक एक देश, एक एक वसाहत अधिकाधिक वृद्ध मताने काबीज करीत चालला आहे; व त्याच मानाने अप्रतिबंधव्यापारमत ऱ्हास पावत चालले आहे.

"अशी सवत्र प्रवृत्ती होण्याला काही कारणे असली पाहिजेत. फ्रान्स व रशिया यांचे संबंधाने आपण कदाचित् असे म्हणू की येथील लोकास अर्थशास्त्राचे ज्ञान नाही; तेथील कारखानदार आपल्या स्वहिताकडेच नजर देऊन सर्व राष्ट्राला बुडवितात; पण जर्मनीतले लोक आणि विशेषतः स्वतंत्र संस्थाने, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांतील लोक तर आपणासारखेच शहाणे आहेतना ? त्यांना आपणासारखेच आपले खरे हित समजतेना ? ते पुरातन ग्रहांनी बद्ध नाहीत; त्यांच्या राजकीय प्रवृत्ती स्वातंत्र्याच्या दिशेने चालू आहेत; धनिककारखानदारांचे प्रबळ मंडळ स्थापावे अशी त्यांची इच्छा नाही तरी कैक वर्षांच्या वादाने त्यांचे संगोपनास अनुकूल असे मत होऊन ते दृढच होत चालले आहे. यावरून काय सिद्ध होते ? की याही प्रश्नास दोन बाजू आहेत. आमचे संकुचित इंग्लिश मत म्हणते की एकच बाजू आहे ती चूक आहे.

"ज्या इंग्लंडास तीन कोटींची वस्ती आहे, ज्यातील जमिनीचे उत्पन्न दीड कोटींनाही पुरेसे नाही म्हणून बाकीच्याकरिता परदेशातून धान्य आणावे लागते, त्या देशाला अप्रतिबंधव्यापार चांगला नव्हे त्यावाचून गती नाही हे उघड आहे. ज्या देशाला आपल्या खनिज संपत्तीमुळे, पाहिजे त्या देशात जलमार्गाने माल नेण्याच्या सोयीमुळे, व आपल्या लोकांच्या शारीर व नैतिक अनुवांशिक गुणांमुळे, स्वस्त माल तयार करण्याची अप्रतिम साधने आहेत त्याला असाच अप्रतिबंध व्यापार उत्तम, व अशा व्यापाराने इंग्लंडचे बरे झाले आहे हे तटस्थ प्रेक्षकासही कबूल करावे लागेल. या व्यापाराने अघटित चमत्कार केले नाहीत, या भूतलाचे औद्योगिक कल्याणधाम बनविले नाही, गरीब अजून आहेतच, व व्यापारांच्या व उद्योगांच्या मंदीतून ( commercial depression ) आपण निभावलो असेही नाही. पण एकंदरीत राष्ट्राची संपत्ती वाढली आहे, व याहूनही विशेष लाभ हा की, समाजाची स्थिती चाळीस वर्षांच्या पूर्वीपेक्षा बरी झाली आहे, कामकऱ्यांना मजुरी जास्त मिळू लागली आहे. काम थोडे, खाणे बरे, अंगभर वस्त्र व शिक्षण अधिक, हे काय थोडे झाले ?

" ही एक बाजू झाली व ती खरीखुरीची चांगली आहे. पण दुसरी बाजू पाहू या. असा एक देश घेऊ की जेथे याच्या उलट स्थिती आहे. वस्ती दाट नाही, जमीन मुबलक, भांडवल थोडे, मजूर कमी, व मजुरी भारी—ज्याला परदेशांत माल पाठविता येत नाही इतकेच नाही तर देशातल्या देशातही ज्याला इंग्लंडसारखा भराभर स्वस्त माल बाजारात आणू लागला तर त्यापुढे टिकाव धरता येत नाही अशा देशात नवे उद्योगधंदे घालण्याकरिता व वाढविण्याकरिता संगोपन बरे नाही असे कसे म्हणवेल ?

" ऑस्ट्रेलियातील एका वसाहतीत परदेशाच्या बुटांवर कर बसविल्याचे सोपे उदाहरण घेऊ. आता हे कबूल करावे लागते की हा कर जो कोणी पायात बूट घालतो व आपणच तयार करीत नाही त्यावर म्हणजे बहुतेकांवर आहे. पण या कराने काय होईल बरे ? एकतर युरोपातील मोची ऑस्ट्रेलियात येऊन राहतील, व दुसरे ऑस्ट्रेलियातील मोठ्या कुटुंबांतील एखाद्या मुलाला नवीन धंदा मिळेल. केवळ अर्थशास्त्रदृष्टीनेही म्हणजे संपत्तीच्या महत्तम उत्पादनाच्या दृष्टीनेही पाहता कोणता मार्ग अधिक चांगला आहे ? संपत्तीचे उत्पादन श्रमावर अवलंबून असते व उत्पादक श्रम करण्याला मजुराला श्रम करण्याचे साधन म्हणजे धंदा पाहिजे. ज्या मजुराला आपले पोट भरण्यापुरतीही मजुरी मिळविता येत नाही, त्याची किंमत शून्याहून कमी. संपत्तीच्या संग्रहाचे दृष्टीने पाहता त्याची किंमत धन नाही ऋण आहे. उलटपक्षी ज्याला म्हणून काम मिळवता येते मग ते काम कसेही ओबडधोबड असो तो कामकरी संपत्ती संग्रह करणारा झाला. तो जी काही रक्कम स्वतःकरिता खर्च करितो तिच्या योगाने दुसऱ्यांना काम मिळते, व तो काहींना काही तरी बचत ठेवील, नाहीतर मग ते काम कसले ? ही थोडी बचत राष्ट्रीय संपत्ती संग्रहात सामील होते, व अशा रीतीने वस्ती व भांडवल ही दोन्ही भूमितिश्रेढीने वाढत जातात. तेव्हा नवीन अथवा मागासलेल्या देशात पहिला प्रश्न हा की, प्रत्येक मनुष्याला रोजचे काम मिळून रोजची भाकरी कशी मिळेल. त्या कामाचे उत्पादन महत्तम होणे हा प्रश्न नंतरचा. पहिला प्रश्न सुटला म्हणजे नंतरचा पाठीमागून आपोआपच व्यवहारात सुटतो. तो उपपत्तीने सुटत नाही.

" पण इतके स्पष्ट आहे की पुष्कळांना धंदा मिळण्याकरिता नाना तऱ्हेचे धंदे असले पाहिजेत. सर्वजण शेतीच्या कामाला लायक नसतात, व असले तरी सर्वांस पुरे इतके शेतीचे काम नसते. कारण जेथे हवा, पाणी यांच्या मानाने मोठी शेती ( large estates ) अगर मोठी गुरे चारण्याची राने ( cattle run ) करण्याची सोय आहे आणि जेथे पुष्कळ भांडवल आहे तेथे शेत करण्याचे काम थोड्या मजुरांनी भागते. अर्थशास्त्राची दृष्टी एकीकडे ठेवून सामाजिक आणि नैतिक हिताच्या दृष्टीने पाहिले असता असे दिसून येईल की, काही थोडे लक्षाधीश जमीनदार व बाकीचे सारे गरीब शेतकरी अगर गुराखी या शेती स्थितितल्यापेक्षा मोठी शहरे, मोठे कारखाने, नाना तऱ्हेचे धंदे—अशा औद्योगिक स्थितील लोक जास्त सुधारलेले व जास्त शहाणे असतात व त्यांची राहणीही (standard of comfort) बरी असते. असले पूर्णतर जीवित मिळविण्याला किंमत दिली पाहिजे—ती किंमत संगोपन होय—व ती देणे वाईट असे कसे म्हणवेल ? बरे अप्रतिबंध व्यापाराने सुधारणा होते तशी संगोपनाने होत नाही असेही नाही. दोघांच्याही पाठीमागे सुधारणेचे अनिष्ट परिणाम व व्यापाराच्या मंदी-बढती लागल्या आहेत त्या आहेतच."
(S. Laing's " A Modern Zoroastrian ", P. 242-46).

मिल्स वगैरे अर्थशास्त्रकारांचे असे म्हणणे पडते की, जरी एखाद्या देशाच्या विशेष स्थितीस आमचे अर्थशास्त्राचे सिद्धांत आज पूर्णपणे अबाधित लावता येत नाहीत, तरी त्या देशाची स्थिती जेव्हा इंग्लंडसारखी होईल—जेव्हा चढाओढ जारीने चालू राहील—जेव्हा धनाची तृष्णा अधिक वाढेल, ज्ञान वाढेल व लोकांना आपले खरे हित कळेल, तेव्हा हे सिद्धांत पूर्णपणे लावता येतील.

पण याबद्दल आता शंका वाटू लागली आहे. सर्व इंग्रजी अर्थशास्त्राचा पाया जमीनदार, भांडवलवाले व मजूर या त्रयींवर. बहुतेक जुन्या अर्थशास्त्राचे सिद्धांत जमीनदार व भांडवलवाले यांस अनुकूल. तेव्हा मजूर या अर्थशास्त्राला झुगारून देतील यांत नवल नाही.

अलीकडे इंग्लंडात, जर्मनीत, फ्रान्स देशात, रशियांत बहुजन समाजाचे लक्ष आपली स्थिती सुधारण्याकडे लागले आहे. त्यांना जमीनदार आणि भांडवलवाले हे शत्रुवत भासतात. जमीन देवाची– सर्व श्रमाचे आद्य साधन. तीवर स्वामित्व ठेवण्याचा कोणालाही अधिकार नाही. ती राष्ट्रीय ( Nationalisation of Land ) झाली पाहिजे; संपत्ती ज्या मनुष्याने उत्पन्न केली, त्याने ती यावज्जीव उपभोगावी, मरणोत्तर तिचा नियमित अंश पुत्रादी जवळच्या आप्तांस मिळावा, पण सर्व संपत्तीवर त्यांचा व निदान लांबच्या आप्तांचा काही हक्क नाही, ती राष्ट्रीय खजिन्यांत जावी, योग्य तास काम करून योग्य मजुरी मागण्याचा मजुरास हक्क आहे, असे विचार यांचे मनात येऊ लागले आहेत. या विचाराची छाया मि. मिलसच्या मनावर पडली होती, पण या वेळी हे विचार फार थोड्या लोकांचे होते, अलीकडे हे विचार पुष्कळांचे होत चालले आहेत व याची पडछाया इंग्लंडातील पार्लमेंट सभेत व लंडन कॉर्पोरेशनमध्ये पडत चालली आहे. कारखान्यांतील मजुरांचे जीवितास धोका लागू नये म्हणून केलेले कायदे ( Factory Legislation ), मजुरांच्या घरासंबंधी कायदे ( Working Men's Dwellings Act ), आरोग्यसंरक्षक कायदे, शिक्षण कायदे, इत्यादी कायद्यांचा रोख याच दिशेकडे आहे. लंडन कॉर्पोरेशनने ( अर्थात इकडच्या भाषेने म्हटले तर म्युनिसिपालिटीने ) ट्रामवे आपल्या ताब्यात घेण्याचा इरादा केला आहे. इतर पुष्कळ शहरात ग्यासचे दिवे लावण्याचे काम, पाणी पुरविण्याचे काम कधीच कॉर्पोरेशननी घेतले आहे. ऑस्ट्रेलियांत रेल्वे सरकारच्या आहेत. विलायतेत नाहीत. आपल्या हिंदुस्थानात काही आहेत काही नाहीत. सरकाराने किंवा म्युनिसिपालिटीने ही कामे आपल्या अंगावर घ्यावी असे ज्यांचे मत आहे, त्यांची संख्या दिवसानुदिवस वाढत चालली आहे. परवा पार्लमेंट सभेची निवड झाली तीत मजुरांचे पक्षाचे म्हणून काही सभासद निवडले गेले. त्यांचे असे एक मागणे आहे की "आठ तासावर काम करू नये" असा सरकारी प्रतिबंध ( Eighet Hours' Bill ) असावा. हे मागणे प्रथमतः मि. ग्लाडस्टन यांनी अगदी उडवून दिले. परंतु त्या पक्षाचा जोर पाहून याचा मी विचार करीन असे संदिग्ध उत्तर देणे त्यास भाग पडले. तेव्हा हा प्रश्न विद्याभ्यासाच्या खोलीतून निघून दरबारात शिरला आहे. अलीकडे मजुरांचे संप ( Strikes ) वरचेवर होऊ लागले आहेत. त्यांची जूट होणार नाही अशी भाकिते पूर्व अर्थशास्त्रकारांनी केली होती ती खोटी होत आहेत. एकाच धंद्याचे किंवा इंग्लंडचेच मजूर एक होतात असे नाही तर नाना धंद्यांचे व नाना देशांचे मजूर एक होऊन ठरलेल्या दिवशी काम सोडून बसत आहेत व हट्टाने आपल्या अटी कबूल करवून घेत आहेत.

दुसरे काही लोक ( Communists ) व्यक्तिस्वामित्वावर हल्ला करीत आहेत. त्यांचे मत असे आहे की, ही सर्व पृथ्वी एक–सर्व मानव भाईबंद–तेव्हा सर्व संपत्ती सामायिक असावी.

तिसऱ्या प्रकारचे काही लोक ( Anarchists ) आहेत, ते सरकारच नको म्हणतात. त्यांचे असे मत आहे की, प्रत्येक मनुष्याने नीतीने वागावे म्हणजे सरकारची जरूरीच नाही.

शेवटले दोन पक्ष अजून लहान आहेत. या तिघांचेही एक मत असे आहे की, हल्लीची समाजाची औद्योगिक घटना पसंत नाही; तेव्हा ती कायमची आहे असे समजून जे अर्थशास्त्र या पायावर रचिले ते पुढे सध्याच्या स्थिती बदलल्यावर लागू पडेल की नाही याचा संशय आहे.

खरे पाहिले असता अर्थशास्त्र समाजशास्त्राचा एक भाग आहे. समाज बदलेल– व तो एकसारखा केव्हाही रहात नाही– तसे समाजशास्त्र बदलले पाहिजे. समाजशास्त्र बदलले म्हणजे अर्थात तदन्तर्गत अर्थशास्त्रही बदललेच पाहिजे. तरी विद्यमान स्थितीस जे ज्ञान आपणास मिळाले आहे किंवा मिळू शकते त्यावरच निर्वाह केला पाहिजे. सध्याचे अर्थशास्त्राचे सिद्धांत लावताना ज्या गोष्टींचा विचार करावा म्हणून सांगितले आहे त्यांचा विचार केला पाहिजे. तसेच त्याहून अधिक महत्त्वाचे जे सामाजिकशास्त्र त्याच्या आज्ञा अर्थशास्त्राच्या आज्ञाहून बलवत्तर समजल्या पाहिजेत. इतक्या गोष्टी लक्षात ठेवून या इंग्रजी अर्थशास्त्राचे अध्ययन करावे.

## पुरवणी

पृष्ठ ५३ पंक्ती १५–१६. "मजुरीऐवजी खर्च होणारे सर्व भांडवल उत्पादकश्रम करणाऱ्यांतच वाटले जाते असे नाही." येथे "भांडवल" हा शब्द चुकून पडला. याबद्दल "संपत्ती" हा शब्द पाहिजे. बऱ्याच संपत्तीचा भाग मजुरीत खर्च होत असून ते भांडवल असत नाही. भांडवल अक्षयी उत्पादकच असते.

पृष्ठ ५८ पंक्ती ९. यात "भांडवल" या शब्दाबद्दल "पैसा" असा चुकून शब्द पडला आहे. शास्त्रीय ग्रंथात शब्दांच्या यथास्थित योजनेबद्दल फार खबरदारी घेणे अवश्य आहे.

पृष्ठ ७५. समाजनिष्ठ स्वामित्वाचे व्यवस्थेतील दोष–यातील वचने मूळातल्यापेक्षा फार जोराने लिहिली आहेत. "समाजनिष्ठ स्वामित्व" ग्रंथकर्तीस इतके नापसंत नाही; व समाजनिष्ठ स्वामित्व कधीकाली होणार नाही, असेही नाही. प्रकृत देशकाल वर्तमान स्थितीस योग्य नाही, इतके म्हणण्याचा आशय आहे.

पृष्ठ १०७ पंक्ती २२. "फेरफार झाल्यामुळे पडते" या वाक्याचे शेवटी, "असे धेऊन चाललो आहो, असे समजावे." असे शब्द घालायला पाहिजेत. ही गृहीत गोष्ट आहे, खरी नाही.

पृष्ठ १२९. "भांडवलवाल्याला श्रमाबद्दल म्हणून जो खर्च करावा लागतो, त्याचे आणि मजुरीचे काही प्रमाण नसते"–"श्रमाबद्दल म्हणून जो खर्च करावा लागतो" (Cost of labour to the Capitalists) याबद्दल "श्रमाबद्दल जो खर्च पडतो" असे शब्द घातले तर बरे. नियमित अथवा एकच वेतन देऊन काम कमी जास्त, वाईट बरे झाल्याने त्याच वेतनाची रक्कम अधिक उणी वाटते हे सिद्ध करावयाचे आहे. तेव्हा अर्थाचा अनर्थ होऊ नये असे शब्द घातले पाहिजेत. त्याचप्रमाणे "नाजूक श्रमालाच खर्च कमी लागतो" असे पुढे वाक्य आहे, तेही सकृतदर्शनी खोटे भासते.

पृष्ठ १३४ पंक्ती ३. "परंतु उत्पादनाचा खर्च जेवढाचा तेवढाच राहिला" याबद्दल "आणि उत्पादनाचा खर्च तर कमी झाला" असे पाहिजे.

पृष्ठ १३५ पंक्ती २४. "नफ्याचे रोकड दरात जरी चढ झाला नाही, आणि त्या कारखान्यात इ. यातील "आणि" बद्दल "तरी" असा शब्द पाहिजे.

पृष्ठ १४७. यात हिंदुस्थानातील सोन्याच्या आयातीचा आकडा पौंड २५०००० पडला आहे, तो २५०००००० पाहिजे. याच पृष्ठांत पुढे "७० कोटी पौंडांची दहा वर्षांत आपल्या एकंदर चलनात वाढ झाली" असे म्हटले आहे, त्याला आधार काय? सोने, रुपे आले ते सर्व "चलनात" दाखल होत नाही. सोन्याचे दागिने होतात, रुप्याचे दागिने व भांडी होतात, बाकी भाग मात्र चलनात जातो. तो किती याचा अजमास कसा केला?

पृष्ठ १९७, पंक्ती १. "बुद्धिपुरस्सर विवाहाचा निषेध केला व त्यामुळे प्रजावृद्धि जर मर्यादेत राहिली" याबद्दल "इंद्रियदमनावरून प्रजावृद्धि मर्यादेत ठेविली" असे पाहिजे. विवाहाच्या निषेधावर जोर नाही, इंद्रियदमनावर आहे ( Prudential restraint ). फ्रान्स देशात विवाह होत असून इंद्रियदमनाने प्रजावृद्धी होत नाही. युरोपातील इतर काही भागात विवाह होत नसून इंद्रियदमनाभावी प्रजावृद्धी पूर्ववत् कायम आहे.

पृष्ठ २०५ पंक्ती ४. यातील "२" म्हणून दिलेले उदाहरण मागचेच आहे. ह्या पृष्ठातली शेवटची दोन वाक्ये "ह्या उदाहरणावरून – कोणास वाटेल" याबद्दल असे वाक्य पाहिजे :—

किमतीत चढ झाला असता रोजमुऱ्यावर काय परिणाम घडतो हे स्पष्ट दाखविण्याकरिता हे उदाहरण आम्ही अगदी शिकस्तीचे घेतले आहे; सामान्यतः व्यवहारात इतका अनर्थ होत नाही.

पृष्ठ २४२ पंक्ती ३. "मालक रोजमुऱ्याचे दर कमी करू लागले असता तसे त्यांना करू दिले नाही." – तसे त्यास करू दिले नाही, याबद्दल "तितके दरावर काम करण्याचे नाकारले" असे घातले म्हणजे अर्थ स्पष्ट होईल.

पृष्ठ २८१ पंक्ती ६ व पुढे – "ज्या दोन पदार्थांचा मोबदला व्हावयाचा ते दोन्ही पदार्थ एका देशां( तल्या ? ) पेक्षा दुसऱ्या देशात स्वस्त असण्याचा संभव आहे. आणि तसा जर प्रकार असला तर मग त्यांचा मोबदला होणारच नाही हे उघड आहे." हे विधान चुकले. दोन्ही पदार्थ एका देशातल्यापेक्षा दुसऱ्या देशात स्वस्त असूनही, त्यांच्या परस्पर मोलात ( Relative cost ) जर फरक असेल तर मोबदला होऊ शकतो. उदाहरण-इंग्लंडात चार हातमोज्यांची किंमत १ रुपया, व एका दारूच्या बाटलीची किंमत १ रुपया आहे अशी कल्पना करू. फ्रान्स देशात चार हातमोज्यांची किंमत आठ आणे आहे, व दारूच्या बाटलीची किंमत १२ आणे आहे अशी कल्पना करू. अशा प्रसंगी फ्रान्स देशात दोन्ही पदार्थ स्वस्त आहेत तरी या दोन्ही पदार्थांचा इंग्लंड व फ्रान्स यात व्यापार होईल. कारण फ्रान्समध्ये एका दारूच्या बाटलीला ६ मोजे द्यावे लागतात, इंग्लंडात चारच द्यावे लागतात, तेव्हा फ्रान्स इंग्लंडात मोजे पाठवून तिकडून दारूच्या बाटल्या आणवील. प्रकृत उदाहरणात "वाटखर्च व नफा" ही सौकर्यार्थ वगळली आहेत.

पृष्ठ २८७ पंक्ती ६–७. "परंतु ते तसेच कायम राहिले, तर मागणी वाढल्यामुळे निकृष्ट प्रतीच्या खाणीतून कोळसा काढावा लागेल." या वाक्यातील काळ चुकल्यामुळे कार्यकारणांचा विपर्यास झाला आहे. "राहिले" याबद्दल "राहिले असेल"; "लागेल" याबद्दल "लागली असेल असे सिद्ध होते ( अथवा होईल )" असे पाहिजे.

पृष्ठ २९८ पंक्ती १४ व पुढे–यांतील "आयात" आणि "निर्यात" यांचा घोटाळा झाला आहे. आंकड्यावरून "आयाता"ची रक्कम जास्त दिसते; व तसे विधान पुढे केले आहे. परंतु याचा मागील विधानाशी विरोध आहे. वस्तुतः हिंदुस्थानातील "निर्याती"ची रक्कम जास्त आहे. सर रिचर्ड टेंपलचा ग्रंथ आम्हापाशी नाही; परंतु दुसऱ्या एका सरकारी पुस्तकावरून असे दिसते की निर्यातीच्या रकमेतून आयातीची रक्कम वजा केली असता बाकी सरासरी दोन कोट पौंड म्हणजे पूर्वीच्या प्रमाणाने २० कोट रुपये राहते. इतक्या रकमेचा माल विलायतेत जास्त का पाठवावा लागतो म्हणून जी कारणे दिली आहेत त्यांत "इकडील युरोपियन सरकारी कामगार व व्यापारी यांची बचत, रजेतला पगार वगैरे" याही कारणांचा समावेश केला पाहिजे.

वरील बहुतेक दोष "प्रूफ शिटे" तपासण्यात "थोडी हयगय झाली" म्हणून ग्रंथकाराने म्हटले आहे; त्या हयगयीची फळे होत.

■ ■

# अर्थशास्त्रीय अधिवेशने १९८० *

आनंद नाडकर्णी

अर्थशास्त्रीय अध्यापन आणि संशोधन या क्षेत्रात पुण्यातील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था ही भारतात मान्यता पावलेली संस्था आहे. संस्थेचे पहिले संचालक प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ आणि त्यांच्या निवृत्तीनंतर संचालक झालेले प्राध्यापक वि. म. दांडेकर यांची गणना देशाच्या नामवंत अर्थशास्त्रज्ञात केली जाते. नुकतेच प्रा. दांडेकर निवृत्त झाले आहेत आणि त्यांच्या जागी प्राध्यापक नीळकंठ रथ यांची नेमणूक झाली आहे. गोखले संस्थेच्या संशोधनात्मक आणि इतर शैक्षणिक कार्याशी प्रा. रथ हे गेली कित्येक वर्षे लक्षणीय रितीने निगडित आहेत.

गेल्या वर्षी--१९८० मध्ये--गोखले संस्थेस ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने पुणे विद्यापीठ आणि गोखले संस्था यांनी संयुक्तपणे चार अखिल भारतीय अर्थशास्त्रीय संघटनांना त्यांची वार्षिक अधिवेशने संस्थेमध्ये भरविण्यासाठी पाचारण केले. त्यानुसार २६ डिसेंबर १९८० ते १ जानेवारी १९८१ या कालावधीत ही चार अधिवेशने येथे झाली. 'इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन' या संस्थेचे त्रेसष्ठावे अधिवेशन २६, २७ व २८ डिसेंबर या दिवशी भरविण्यात आले. त्यानंतर ३०, ३१ डिसेंबर व १ जानेवारी या दिवशी दोन वार्षिक अधिवेशने झाली, तसेच एक चर्चासत्र घेण्यात आले. 'इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स' या संस्थेचे चाळिसावे अधिवेशन आणि 'इंडियन इकॉनॉमेट्रिक सोसायटी'चे एकोणिसावे अधिवेशन, ही दोन अधिवेशने, आणि 'इंडियन असोसिशन फॉर रिसर्च इन नॅशनल इन्कम ॲण्ड वेल्थ' या संस्थेचे द्वैवार्षिक चर्चासत्र, असा या पुढल्या तीन दिवसांचा कार्यक्रम होता.

'इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन'च्या अधिवेशनाचे अध्यक्ष जबलपूर विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या पदव्युत्तर व संशोधनात्मक अभ्यास विभागाचे प्रमुख प्राध्यापक पी. डी. हाजेला हे होते. कृषिअर्थतज्ज्ञांच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान, नवी दिल्ली येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च स्टॅटिस्टिक्स'चे संचालक डॉ. दरोगा सिंग यांनी भूषविले. तिसरे अधिवेशन 'इंडियन इकॉनॉमेट्रिक सोसायटी'चे. त्याच्या अध्यक्षस्थानी 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'चे प्राध्यापक ए. एल. नागर होते.

कोणत्याही संस्थेच्या वार्षिक अधिवेशनाची सुरुवात अध्यक्षीय भाषणाने करण्याची प्रथा आहे. अर्थमितिज्ञ प्रा. नागर यांचे अभिभाषण साहजिकच अधिक तांत्रिक स्वरूपाचे होते. 'इंडियन इकॉनॉमिक

* आकाशवाणी, पुणे यांच्या सौजन्याने.

असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. हाजेला यांनी त्यांच्या अभिभाषणात भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेसंबंधीचे आपले विचार मांडले. देशाच्या आर्थिक जीवनात शासनाने फारसा हस्तक्षेप करू नये असे मत बऱ्याच काळपर्यंत पाश्चिमात्य जगतात मांडले जात असे. ही निर्हस्तक्षेपनीची भूमिका म्हणून ओळखली जाते. जॉन मेनार्ड केन्स यांनी यावर टीका केली. १९३० मध्ये महामंदीचा तडाखा बसल्यावर जे अर्थशास्त्रीय विचारमंथन सुरू झाले त्यात केन्स यांनी मोलाची भर टाकली आहे. त्यांनी नव्या स्वरूपाचे सैद्धांतिक विश्लेषण केले आणि त्याच्या साहाय्याने, भांडवलशाही देशात पूर्ण रोजगारी निर्माण करण्यासाठी विशिष्ट स्वरूपाचे शासकीय उपाय अटळ असतात असे दाखवून दिले. हा मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार होता. खाजगी क्षेत्राप्रमाणे शासकीय क्षेत्रासही आर्थिक जीवनात कार्य करण्यास वाव आहे ही भूमिका केन्स आणि त्यांच्या अनुयायांनी आग्रहाने मांडली.

प्रा. हाजेला यांच्या मते भारतासारख्या देशातील मिश्र अर्थव्यवस्थेचे स्वरूप मूलत: केन्स-प्रणीत मिश्र अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळे आहे. केन्स यांनी विकसित पाश्चिमात्य देशांच्या संदर्भात आपला नवा विचार मांडला. अशा देशात आर्थिक विकासाचा प्रश्न तुलनेने गौण असतो. संपत्तीसाधने मुबलक असूनदेखील तेथे अनेक वेळा बेरोजगारी संभवते. कारण पुरेशा मागणीच्या अभावी बाजारात मालाचा उठाव होत नाही. अशा परिस्थितीत उपभोग, गुंतवणूक याबरील लोकांचे खर्च वाढून मागणीची वृद्धी व्हावी यासाठी योग्य ते उपाय शासनाने योजले पाहिजेत. भारतातील परिस्थिती भिन्न आहे. येथे आर्थिक विकासास चालना देणे हे शासकीय धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असावयास हवे. हा विकास घडून येत असताना किमती भरमसाट वाढू न देणे महत्त्वाचे असते. विशिष्ट दराने विकास होण्यासाठी नियोजित पद्धतीने गुंतवणूक होईल हे पाहण्याची जबाबदारी शासनावर असते. परंतु गुंतवणुकीचा खर्च होत असताना किमतींची भरमसाट वाढ टाळायची असेल तर गुंतवणुकीचा खर्च अंतर्गत बचतीतून भागविला पाहिजे आणि योग्य त्या प्रमाणात बचत वाढावी म्हणून शासनाने उपभोगाच्या खर्चावर नियंत्रण ठेवावयास हवे. म्हणजे विकसित देशांच्या केन्सप्रणीत मिश्र अर्थव्यवस्थेत बेरोजगारी हटविण्यासाठी उपभोगाचा खर्च वाढविण्यावर भर देणे क्रमप्राप्त ठरते, तर आपल्यासारख्या देशात उपभोग खर्च नियंत्रित ठेवणे आवश्यक असते. याचा अर्थ असा की पाश्चिमात्य देशातील उपभोगवाद (consumerism) आपणास परवडण्यासारखा नाही. उपभोग नियंत्रणासाठी सुचविण्यात येणाऱ्या विविध उपायांचा टीकात्मक आढावा घेऊन प्रा. हाजेला यांनी आपली याबाबतची भूमिका विशद केली.

डॉ. दरोगा सिंग यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात देशाच्या शेती विकासातील असमतोलावर लक्ष केंद्रित केले. कृषिउत्पादनाच्या वाढीचा दर गेल्या काही वर्षांत लोकसंख्या वृद्धी दरापेक्षा काहीसा अधिक आहे हे खरे आहे. परंतु वेगवेगळया पिकांचा अलगपणे विचार केल्यास काही महत्त्वाच्या पिकां-बाबत परिस्थिती नेमकी उलट असल्याचे आढळून येते. उदाहरणादाखल कडधान्ये आणि तेलबिया यांचा उल्लेख करता येईल. यांच्याबाबतीत उत्पादनवाढीचा दर लोकसंख्या वृद्धी दरापेक्षा कमी असल्याने संबंधित वस्तूंची टंचाई वाढत जाऊन त्या अधिकाधिक महाग होत गेल्याचे दिसते. दुसरे असे की देशाच्या वेगवेगळया भागात वेगवेगळया पिकांवर भर दिला जातो. तेव्हा पिकांच्या उत्पादनवाढीतील विषमता प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यास कारणीभूत ठरते.

कृषिउत्पादनातील प्रादेशिक असमतोलाचा खोलात जाऊन विचार केल्यास कृषिक्षेत्रातील दरडोई गुंतवणुकीतील प्रदेशवार विषमतेमुळे मुख्यत्वेकरून हे घडते असल्याचे दिसून येईल असे डॉ. दरोगा सिंग यांचे म्हणणे आहे. ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी कृषिविकासात आघाडीवर असलेले पंजाब राज्य

आणि बरेच मागासलेले असे ओरिसा राज्य या दोहोंची तुलना अनेक प्रकारची आकडेवारी देऊन उद्बोधकपणे केली आहे.

डॉ. दरोगा सिंग यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यांच्या मते सर्व राज्यांत प्रत्यक्ष शेती उत्पादन संभाव्य उत्पादनाच्या तुलनेने बरेच कमी आहे. उदाहरणार्थ तांदळाच्या बाबतीत पंजाबचे प्रत्यक्ष उत्पादन संभाव्य उत्पादनाच्या ५६ टक्के आहे तर ओरिसात हेच प्रमाण त्याहून बरेच कमी म्हणजे २७ टक्के आहे. एकंदरीत कृषिउत्पादनाच्या वाढीस देशात अद्यापही बराच वाव आहे असे म्हणता येईल.

अध्यक्षीय भाषणाव्यतिरिक्त प्रत्येक अधिवेशनात आधी निवडलेल्या विषयांवर गटवार चर्चा झाल्या. अर्थमितिज्ञांचे अधिवेशन आणि राष्ट्रीय उत्पन्नावरील चर्चासत्र यांतील चर्चा या बऱ्याच अधिक प्रमाणात तांत्रिक स्वरुपाच्या होत्या. तेव्हा त्यांचा येथे विचार केलेला नाही. 'इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन'च्या अधिवेशनातील 'समतोलाचे अर्थशास्त्र व न्यून विकसितता' या विषयावरील सैद्धांतिक चर्चादेखील याच सदरात मोडेल. केवळ एका गोष्टीचा उल्लेख करतो. पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञात मान्यता पावलेली समतोलाची संकल्पना भारतासारख्या विकसनशील देशांच्या प्रश्नांची मीमांसा करताना कुचकामी ठरते असे मत अनेकांनी व्यक्त केले. मात्र याबाबतीत नाणावलेले सैद्धांतिक अर्थशास्त्रज्ञ प्रा. गौतम माथूर यांनी अधिवेशनासाठी तयार केलेल्या आपल्या निबंधात वेगळा सूर काढला. त्याच्या अनुषंगाने बरीच उद्बोधक चर्चा झाली.

पहिल्या अधिवेशनात 'भारतातील पतनियोजन' हा चर्चेचा आणखी एक विषय होता. या विषयावरील निबंध लेखकांनी 'पतनियोजन' या संज्ञेचे वेगवेगळे अर्थ लावले. देशाच्या आर्थिक योजनेमध्ये विविध क्षेत्रासाठी गुंतवणूक आणि उत्पादन यांची लक्ष्ये ठरविली जातात. ही गाठणे शक्य व्हावे यासाठी केलेले पतपुरवठ्याचे नियोजित वाटप म्हणजे पतनियोजन असा एक अर्थ लावण्यात आला. त्याशिवाय पतपुरवठ्याचे नियोजित वाटप करण्याच्या दृष्टीने अनेक पर्यायी उद्दिष्टे सांगता येतील. उदा. प्रादेशिक समतोल साधणे, शहरी आणि ग्रामीण विभाग यातील विषमता कमी करणे, उत्पादनाच्या निवडक क्षेत्रांना अग्रक्रम देणे, दुर्बल घटकांना साहाय्य करणे, इत्यादी. यापैकी प्रत्येक उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून पतपुरवठ्याचे वाटप केल्यास उद्दिष्टागणिक एकएक व्याख्या तयार होते.

अनेकदा एखादा प्रदेश वा विभाग यावर पतपुरवठ्याच्या बाबतीत अन्याय होत आहे अशी तक्रार केली जाते. तसे करताना संबंधित प्रदेशास वा विभागास होणारा पतपुरवठा आणि तेथून गोळा केल्या जाणाऱ्या ठेवी यातील प्रमाण निकष म्हणून वापरण्याची प्रथा आहे. पतपुरवठा : ठेवी हे प्रमाण त्या प्रदेश वा विभागाबाबत एकाहून कमी असले की तेथून गोळा केलेल्या ठेवींच्या प्रमाणात पतपुरवठा होत नाही आणि हे अन्यायकारक आहे असे म्हटले जाते. याउलट काही प्रतिनिधींनी दरडोई पतपुरवठा हा निकष या संदर्भात अधिक अर्थपूर्ण असतो असे मत व्यक्त केले. पतपुरवठा : ठेवी हे प्रमाण तुलनेने कमी असलेल्या एखाद्या राज्यात दरडोई पुरवठा मात्र तुलनेने अधिक असण्याची शक्यता आहे. या राज्यास पतपुरवठा कमी होतो असे निखालसपणे म्हणता येणार नाही, असे काहींचे प्रतिपादन होते.

कृषिअर्थशास्त्रज्ञांच्या अधिवेशनात 'समाजातील दुर्बल घटकांसाठी असलेल्या खास कार्यक्रमांचा अभ्यास' असा एक चर्चेचा विषय होता. 'दुर्बल घटक' या संज्ञेच्या व्याख्येबाबतच बरेच मतभेद व्यक्त करण्यात आले. दुर्बल घटक निश्चित करण्यासाठी भिन्नभिन्न पर्यायी निकष सुचविण्यात आले. ते

म्हणजे आर्थिक वर्ग, दरडोई उत्पन्न, दरडोई संपत्तीचे मूल्य, दरडोई उपभोग इ. तसेच भारतातल्या वेगवेगळया प्रदेशांची आर्थिक स्थिती भिन्न असल्याकारणाने 'दुर्बल घटक' या संज्ञेची सर्वंध देशासाठी एकमेव व्याख्या न करता वेगवेगळया प्रदेशविशिष्ट व्याख्या करावयास हव्यात असे मत काही-जणांनी मांडले.

दुर्बल घटकांसाठी खास कार्यक्रम ठरविताना ते केवळ साहाय्याच्या स्वरूपाचे न करता विकासास पूरक करावेत असा सर्वसाधारण सूर होता. या संदर्भात रोजगार हमी योजनेच्या बाजूने अनेकांनी कौल दिला. मात्र रोजगार हमी योजनेतून निर्माण होत असलेली संपत्तीसाधने ही दुर्बल घटकांपेक्षा सधन वर्गासच अधिक लाभदायक ठरतात असा आक्षेप घेण्यात आला. परंतु अनेकांना हा आक्षेप अप्रस्तुत वाटला, कारण हा लाभ केवळ दुर्बल घटकांसच मिळेल याची हमी देणारी यंत्रणा कल्पिणेदेखील अवास्तव आहे असे त्यांचे मत पडले.

कोणत्याही विषयाच्या अभ्यासकांचे वार्षिक अधिवेशन हा एक मेळावा असतो; अपरिहार्यपणे काही प्रमाणात त्याला सोहळ्याचे स्वरूप येते. तीन-चारशे प्रतिनिधी एकत्र आलेले असतात. सर्वच विषयांवर त्यांच्यामध्ये टोकदार चर्चा होऊन एकूण समाजाला तत्परतेने मार्गदर्शक ठरणारे निष्कर्ष निघतील अशी अपेक्षा करणेदेखील योग्य होणार नाही. परंतु गटवार चर्चा, विचारांची अनौपचारिक देवाणघेवाण यांमधून अनेक मुद्दे स्पष्ट होतात, पूर्वी ध्यानात न आलेले प्रश्न सुचू लागतात आणि परिणामी कित्येक अभ्यासकांचे प्रबोधनही होत असते. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत अनेक विद्यार्थी शिकत आहेत. एम्. ए. चे, एम्. फिल. चे आणि गेल्या जूनपासून बी. ए. चा वर्ग देखील सुरू करण्यात आला आहे. त्याशिवाय पीएच्. डी. चा अभ्यास करणारे अधिछात्र (Fellows) आहेत. संस्थेच्या सेवकांबरोबर या विद्यार्थ्यांनी अधिवेशनासाठी खूप मेहनत घेतली. त्यांच्या साहाय्यशील, शिस्तशीर वर्तनाची अनेक प्रतिनिधींनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. अलीकडे विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीबद्दल बरेच बोलले जाते, लिहिले जाते. या पार्श्वभूमीवर गोखले संस्थेच्या विद्यार्थ्यांचे हे वर्तन पाहून कित्येक निरीक्षकांचे प्रबोधन घडले असावे.

■ ■

---

## लेखक-परिचय


**भ. ग. बापट** : प्रपाठक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे.

**रमेश पानसे** : प्रपाठक, एस्. एन्. डी. टी. वुइमेन्स युनिव्हर्सिटी, मुंबई. सहसंपादक, अर्थसंवाद.

**सुरेश्वर गोस्वामी** : संशोधन सहाध्यायी, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

**आनंद नाडकर्णी** : प्राध्यापक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे. प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

**शिवकुमार खोबरे** : अधिव्याख्याता, महाविद्यालय, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर.


---

## अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख

लेखक : प्रा. ज. फा. पाटील, प्रा. के. जी. पठाण व प्रा. पी. जे. ताम्हणकर
प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयनगर, पुणे. प्रथमावृत्ती १९७९
पाने ३४८ + १२, किंमत २० रु.

डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. के. जी. पठाण व प्रा. पी. जे. ताम्हणकर यांनी उपरोक्त ग्रंथ शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग ३, सेमिस्टर ३ व ४ साठी क्रमिक पुस्तक म्हणून लिहिला आहे. शिवाजी विद्यापीठाने हा नवीन पेपर अभ्यासक्रमात समाविष्ट करून चांगला पायंडा पाडला आहे. तथापी या नवीन विषयावर मराठी माध्यमातून संदर्भग्रंथ वा क्रमिक पुस्तके उपलब्ध नाहीत. ही त्रुटी उपरोक्त लेखकांनी भरून काढली आहे. लेखकांनी क्रमिक पुस्तक या दृष्टिकोनातून जरी लेखन केले असले तरी त्याचे स्वरूप क्रमिक पुस्तक न राहता, तो एक संदर्भग्रंथच झाला आहे. त्यामुळे अन्य क्रमिक पुस्तके अभ्यासकांना खुरटी वाटत असतील तर त्यात नवल नाही.

" अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख " हा संशोधन शास्त्रावरील मराठी माध्यमातील पहिलाच ग्रंथ होय. लेखकांनी या ग्रंथात १४ प्रकरणे समाविष्ट केलेली आहेत. प्रकरणांची क्रमवारी वैशिष्ट्यपूर्ण आहे. पहिल्या प्रकरणात, शास्त्र म्हणजे काय ? शास्त्राचे कार्य व वर्गीकरण हे सांगून संशोधनाच्या अर्थ, प्रकार व उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली आहेत. तसेच पहिल्या प्रकरणाच्या शेवटी आदर्श संशोधकाची लक्षणे दिली आहेत. कोणत्याही संशोधकाने संशोधन कार्य हाती घेण्यापूर्वी ही लक्षणे अभ्यासावीत.

तिसऱ्या प्रकरणात ' संशोधनविषयक प्राथमिक तत्त्वे ' स्पष्ट केलेली आहेत. या प्रकरणात गृहीतकाची ( Hypothesis ) व्याख्या, अर्थ, तिचे प्रकार, उगमस्थाने, लक्षणे, उपयोग सखोल चर्चिले आहेत. तसेच संकल्पना, तिची व्याख्या, वर्गीकरण महत्त्व व कार्य स्पष्ट केले आहेत. तथापी पान ७४ वर देण्यात आलेले संकल्पनांचे महत्त्व व कार्य अतिशय त्रोटक प्रमाणात दिलेले आहे.

प्रकरण ४ मध्ये संशोधनाचे टप्पे व रचना स्पष्ट केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनाच्या विषयाची निवड कशी करावी, संशोधनाचा आराखडा कसा तयार करावा, संशोधनाचे प्रकार, इ. गोष्टी तपशीलवार चर्चिल्या आहेत. तथापी या प्रकरणात देण्यात आलेला " गृहीतक व संकल्पना " हा मुद्दा निरर्थक वाटतो. कारण ८–९ ओळींच्या स्पष्टीकरणात लेखकांनी निश्चित स्वरूपाचे काहीच सांगितलेले नाही.

अकराव्या प्रकरणात सामाजिक सर्वेक्षणांचे प्रकार स्पष्ट केलेले आहेत. तथापी प्रकरणाच्या सुरुवातीला ई. डब्ल्यू बर्जेस, मोझर व काल्टन आणि मार्क अब्राम इ. नी केलेली सामाजिक सर्वेक्षणाची व्याख्या देऊन विवेचन केले असते तर ते अधिक प्रभावी झाले असते. तसेच पान २४६ वर " लोकमत सर्वेक्षणाचे " उदाहरण दिले आहे. प्रस्तुत उदाहरण राजकीय स्वरूपाचे आहे. ग्रंथकर्त्यांनी ग्रंथ लिहिला त्यावेळची राजकीय परिस्थिती ( राजकीय पक्ष ) आज नसल्याने उदाहरण विसंगत झाले काहे. शाश्वत स्वरूपाची उदाहरणे लेखकांना देता आली असती, तर प्रकरण अधिक प्रभावी झाले असते.

तेराव्या प्रकरणात " तथ्यांचे प्रक्रियन आणि पृथक्करण " यावर चर्चा केलेली आहे. वर्गीकरणाचे आधार स्पष्ट करीत असताना भौगोलिक वर्गीकरणाचा उल्लेख केलेला नाही. शिवाय गुणात्मक आधार, संख्यात्मक आधार व कालिक आधार स्पष्ट करीत असताना सोदाहरण कल्पना मांडणे आवश्यक

होते. प्रस्तुत प्रकरणात पान ३०४ वर सारणीकरण कल्पना विशद केली आहे. सारणी तयार करीत असताना कोणत्या गोष्टी ध्यानात ठेवणे आवश्यक असते हे स्पष्ट करीत असताना पान ३०६ वर चौथा मुद्दा पुढीलप्रमाणे दिला आहे: ( ४ ) " सामान्यपणे सर्वांनी स्वीकारलेल्या ( abbreviation ) चा वापर करून कोष्टकातील जागेची बचत करावी. " या वाक्यात कंसातील इंग्रजी शब्दा पूर्वी " संज्ञा " हा शब्द लिहिणे अगत्याचे होते. तद्वतच सारणीचे प्रकार, उद्दिष्टे व तत्त्वे स्पष्ट करणे अगत्याचे होते.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर अर्थशास्त्रज्ञ व विचारवंत डॉ. वि. म. दांडेकर यांची प्रस्तावना प्रस्तुत ग्रंथास लाभली आहे. तसेच " हा ग्रंथ सर्वार्थाने परिपूर्ण आहे असा आमचा दावा नाही " अशी कबुली लेखकांनी मनोगतात दिली आहे. लेखकांनी या ग्रंथात गणित व संख्याशास्त्र या विषयातील काही संकल्पना व तंत्रे यांचे अधिक सविस्तर व सोदाहरण विवेचन केले असते तर ते अधिक उपयुक्त झाले असते. याची खंत अर्थातच लेखकांना आहे ( पाहा, पान सात ). ही त्रुटी लेखकांनी पुढील आवृत्तीत भरून काढावी. अंकगणित पद्धती, गुणोत्तर ( ratio ), शेकडेवारी, साधारणमाने, गणितमध्य, मध्यमा, बहुलक, दशमके, शतमके इ. संकल्पनांचा ग्रंथात समावेश व त्याबरोबर सखोल चर्चा होणे औचित्यपूर्ण ठरले असते. तसेच आलेखांचे प्रकार स्पष्ट करीत असताना साधी दंडाकृती ग्रंथात दिली आहे. पण विभाजित दंडाकृती उदाहरणासह दिलेली नाही. आलेखांचे प्रकार पान ३१५ वर स्पष्ट केले आहेत. परंतु कालिक श्रेणीचे आलेख, दोन चलांचे आलेख, वारंवारिता वितरणाचे आलेख, वारंवारिता बहुभुज, वारंवारिता वक्र, वारंवारिता वक्रांचे प्रकार व संचित वारंवारिता वक्र या गोष्टी आकृतीसह स्पष्ट करणे अगत्याचे आहे.

प्रस्तुत ग्रंथात इंग्रजी शब्द कंसात दिले आहेत. नवीन परिभाषेत ग्रंथ असल्याने इंग्रजी शब्दा-वरून कल्पना समजण्यास मदत होते. परंतु नेहमीच्या वापरातील अनेक शब्द वारंवार कंसात दिले आहेत. वानगीदाखल "Variable" हा शब्द ग्रंथात १२ वेळा दिला असून काही पानावर दोन वेळा दिला आहे. तसेच "absolute figures" हा शब्द २११ पानावर तीन वेळा दिला आहे. ही गोष्ट अनावश्यक वाटते.

तथापी हा ग्रंथ संशोधन पद्धतीवरील मराठी माध्यमातील पहिला ग्रंथ आहे. सखोलचर्चा, सुसंगत विश्लेषणे ज्या त्या पानावर संदर्भासह तळटिपा या ग्रंथात आढळून येतात. बहुधा तळटिपेसह लिहिलेले हे पहिलेच क्रमिक पुस्तक असावे. ( निदान माझ्या वाचनातील पहिलेच. ) विषयाची मांडणी करीत असताना लेखकांनी वास्तववादी दृष्टिकोनातून चर्चा केलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्था व विशेषत: महाराष्ट्राची अर्थव्यवस्था डोळयासमोर ठेऊन उदाहरणे दिली आहेत हे या ग्रंथाचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. अनेक नवनवीन रूक्ष, किचकट संकल्पना लेखकांनी सविस्तरपणे मांडल्या आहेत.

प्रस्तुत ग्रंथाचे मुद्रण मात्र प्रभावी वा आकर्षक वाटत नाही. बऱ्याच ठिकाणी काही शब्द फिकट व पुसट उठले आहेत तर काही ठिकाणी शब्द जास्त ठळक उठले आहेत. काही ठिकाणी टाईप हलका आहे. मॉडर्न आर्टचे मुखपृष्ठ वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुखपृष्ठावर तीन लेखकांची नावे दिली आहेत. परंतु लेखकांची नावे लिहीत असताना ज. फा. ही मराठीतील आद्याक्षरे व के. जी. आणि पी. जे. ही इंग्रजी आद्याक्षरे विसंगत वाटतात. ग्रंथ मराठीतच असल्याने सर्व आद्याक्षरे मराठीतच लिहिली असती तर ते औचित्यपूर्ण झाले असते. कदाचित तीन लेखक असल्याने ही नजरचूक झाली असावी.

**शिवकुमार खोबरे**

## पत्रव्यवहार

१५ जानेवारी १९८१

मा. संपादक,
' अर्थसंवाद '

महोदय,

आपण ' अर्थसंवादा 'च्या जुलै-सप्टें. १९८० च्या अंकात आम्ही लिहिलेल्या ' भारतातील ग्रामीण बँकव्यवसाय ' या पुस्तकावर श्री. व. श्री. पटवर्धन यांनी लिहिलेले परीक्षण प्रसिद्ध केले आहे. त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. मात्र श्री. पटवर्धन यांच्या परीक्षणातील काही आक्षेपांचा स्वीकार करणे अवघड वाटत असल्याने हे पत्र लिहीत आहोत.

( १ ) परीक्षणात पुस्तकातील प्रकरण १, तक्ता क्र. १२ चा उल्लेख आहे. "१९५६–५७ आणि १९६३–६४" या दोन वर्षातील दरडोई खर्चाची तुलना करणे सयुक्तिक नसून अशा तुलनेसाठी १९५६–५७ च्या स्थिर किमतींच्या आधारे ग्रामीण जनतेच्या गटवारीची तुलना केली असती तर ते योग्य ठरले असते याचा लेखकांना विसर पडला असावा असे म्हटले आहे. परंतु सदरहू प्रकरण नीट सलगपणे वाचत गेल्यास कोणाच्याही लक्षात येईल की, आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप ग्रामीण भागातील बँकव्यवसायाच्या अभ्यासाच्या संदर्भातच पार्श्वभूमी म्हणून स्थूलमानाने समजावून देणे यासाठी पहिल्या प्रकरणाची आखणी करण्यात आली आहे. भारताच्या दारिद्र्याची निरनिराळ्या दृष्टिकोनांतून, निरनिराळ्या कालखंडाप्रमाणे सांगोपांग चर्चा करावी हा हे प्रकरण लिहिताना आमचा उद्देश नव्हता. समीक्षकांचा याबाबत गोंधळ झालेला दिसतो. तेव्हा स्थिर वर्ष मानून त्यानुसार आकडेवारीची तुलना करणे आम्ही तेथे टाळले आहे. तसेच गरिबीबाबत निष्कर्ष काढताना पान २३ ओळ २ वर '१९६३–६४ च्या आकडेवारीनुसार ' असे आम्ही स्पष्टपणे म्हटले आहे. तेव्हा चर्चेतील त्या मुद्द्याचा हेतू ध्यानात घेता परीक्षणकर्त्यांचा वर दिलेला शेरा आम्हास स्वीकारता येत नाही.

( २ ) त्याचप्रमाणे ' प्राथमिक संस्थांची राज्यवार परिस्थिती यानंतरच्या परिच्छेदात निरनिराळ्या राज्यांतील कर्जवाटप, येणेकर्ज, थकबाकी यासंबंधी आकडेवारी देणारा तक्ता दिलेला असता तर सोइस्कर झाले असते, त्याअभावी हा परिच्छेद अपुरा व पोकळ वाटतो ' हा शेराही स्वीकारता येत नाही. कारण अशा सर्व राज्यांची निरनिराळ्या वर्षांची माहिती द्यायची तसेच राज्यांची पुनर्रचना, माहितीची अनुपलब्धता, तुलनेतील मर्यादा याबाबतीतील सर्व स्पष्टीकरणे द्यायची, असे केल्यास त्या एका मुद्द्याचा विस्तार प्रमाणाबाहेर वाढला असता व प्रकरणाचा एकंदर तोलच बिघडला असता. मुळातच

हे प्रकारण पुष्कळ मोठे म्हणजे ४८ पानांचे झाले आहे. त्याशिवाय पान ८१ वरील त्या मुद्दयाच्या चर्चेतून (अ) संपूर्ण भारतात एकूण प्राथमिक शेतकरी पतसंस्थांची प्रगती करण्यास अजून वाव आहे, आणि (ब) राज्याराज्यांमधील प्रगती कमी जास्त असून पूर्व व ईशान्य भारत याद्दष्टीने मागासलेला आहे, एवढेच जाताजाता सुचवायचे होते. तेव्हा दिलेला मजकूर एखाद्यास अवांतरी व पोकळ वाटण्याचे कोणतेही रास्त कारण दिसत नाही.

(३) 'ग्रामीण कारागीर आणि ग्रामीण उद्योगधंद्यांना वित्तपुरवठा' या प्रकरणात अखिल भारतीय वित्तीय संस्थांची माहिती देण्याचे फारसे प्रयोजन नव्हते असे परीक्षणकर्ता म्हणतो. मात्र त्यास असे का वाटते हे त्याने स्पष्ट केलेले नाही. दुसरे असे की ग्रामीण वित्तपुरवठ्याचा विचार करताना या संस्थांचा उल्लेख केला तर काय बिघडले ? या संस्थांची तपशीलवार माहिती देणे आम्ही टाळले आहे. उदा. आयुर्विमा महामंडळाचे याबाबतीत फारसे काही काम न आढळल्याने ते आम्ही दोन ओळीतच संपवले आहे. तेव्हा परीक्षणकर्त्याच्या अशा संदिग्ध व बिनबुडाच्या टीकेचा स्वीकार कसा करता येईल ?

(४) या वित्तीय संस्थांचा 'अप्रत्यक्षसुद्धा लाभ ग्रामीण कारागिरांना झाला असण्याची शक्यता नाही' असे श्री. पटवर्धन यांनी पुढे म्हटले आहे. या त्यांच्या म्हणण्यास आधार काय ? एक म्हणजे ग्रामीण कारागिरांसाठी वित्तपुरवठ्याच्या सोयी काय आहेत ही माहिती देताना त्याचा लाभ कोणाला झाला हा प्रश्न त्या संदर्भात उपस्थित होत नाही. त्या प्रश्नाची चर्चा तेथे प्रस्तुत नाही. असे असताना वर दिलेले सरधोपट विधान परीक्षणकर्त्याने कशासाठी केले हेच समजत नाही.

(५) महाराष्ट्रातील बलुतेदारांसाठी असलेल्या योजनेचा उल्लेख उचित ठरला असता असे परीक्षणकर्ता म्हणतो. पण अशा तऱ्हेच्या कितीतरी योजना अनेक राज्यांमध्ये चालू आहेत, व त्यांचा किमान प्रमाणात उल्लेख करणेदेखील पुस्तकाच्या मर्यादेत बसले नसते. बरे ही माहिती महाराष्ट्रापुरती दिली असती तर ती सखोल किंवा तुलनात्मक नाही असा शेरा परीक्षणकर्त्याने मारला असताच !

सारांश काय, पुस्तकाचा मुख्य विषय नीट ध्यानात घेतला, व विवेचनाच्या व पुस्तकाच्या आकाराच्या मर्यादा लक्षात घेतल्या तर परीक्षणकर्त्याच्या टीकेचे मुद्दे गैरलागू आहेत हे लक्षात येईल. कोणत्याही पुस्तकाला मर्यादा या असतातच. दिलेला मजकूर चुकीचा, अप्रस्तुत असेल तर टीका समजू शकते पण एकामागून एक एक गैरलागू मुद्दे उपस्थित करण्याचा अट्टाहास कशाबद्दल ? तूर्त इतके पुरे !

कळावे,
आपले नम्र,
**स. श्री. मुतालिक-देसाई**
**सं. रा. दास्ताने**

संपादक अर्थसंवाद, स. न. वि. वि.

डॉ. श्री. स. मुतालिक-देसाई व प्रा. संतोष दास्ताने यांनी लिहिलेल्या "भारतातील ग्रामीण बँक-व्यवसाय" या पुस्तकावरील मी लिहिलेले ग्रंथपरीक्षण 'अर्थसंवाद'च्या जुलै-सप्टेंबर १९८० च्या अंकात प्रसिद्ध झाले. सदरहू परीक्षणातील काही आक्षेपांसंबंधीची लेखकद्वयांची प्रतिक्रिया आपण मजकडे अवलोकनार्थ पाठविली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. लेखकांच्या प्रतिक्रियेसंबंधी माझी भूमिका आपणाकडे कळविणे अगत्याचे वाटते म्हणून हे पत्र.

परिच्छेद ( १ ) मध्ये "भारताच्या दारिद्र्याची निरनिराळ्या दृष्टिकोणातून, निरनिराळ्या कालखंडाप्रमाणे सांगोपांग चर्चा करावी हा हे प्रकरण लिहिताना आमचा उद्देश नव्हता" असे लेखक म्हणतात. पुस्तकात लेखकांनी "१९५६–५७ मध्ये या वर्गात ( दरडोई ५० पैसे पेक्षाही कमी खर्च करणारा ) ५६% ग्रामीण जनता मोडत होती. १९६३–६४ मध्ये या परिस्थितीत थोडी सुधारणा झालेली दिसते" असे तौलनिक विधान केले आहे. म्हणूनच १९५६–५७ आणि १९६३–६४ या दोन वर्षांतील दरडोई खर्चांची तुलना करणे सयुक्तिक नसल्याचे मी परीक्षणात निदर्शनास आणून दिले आहे. तुलना ही तुल्य बाबींची होऊ शकते हे लेखकांना मान्य व्हावे. पुस्तकाच्या सुरुवातीस आपली भूमिका मांडताना "साहित्य आणि वाणिज्य शाखांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल," असे म्हटले आहे. अशा विद्यार्थ्यांकरिता लिहिलेल्या पुस्तकांत काटेकोरपणे विधाने केली पाहिजेत अशी माझी अपेक्षा होती व आहे. तेव्हा १९५६–५७ आणि १९६३–६४ या दोन वर्षांतील दरडोई खर्चांची तुलना करताना, लेखकांनी स्थिर किमतींची संकल्पना सांगून त्यांनी केलेल्या तुलनेच्या त्या संदर्भातील मर्यादा निदान एखाद्या वाक्यांत नमूद करायला पाहिजे होत्या असे माझे अजूनही स्पष्ट मत आहे. प्रत्यक्षात पाहिले तर या मध्यंतरीच्या कालावधीत ठोक व किरकोळ किमतींचा निर्देशांक २८ टक्क्यांची वाढ दर्शवितो. म्हणजेच १९६३–६४ चे ७० आणि ५० पैसे १९५६–५७ च्या अनुक्रमे ५५ व ३९ पैशांच्या क्रयमूल्याइतके ठरतात. या पार्श्वभूमीवर लेखकांनी '१९६३–६४ मध्ये या परिस्थितीत थोडी सुधारणा झालेली दिसते' असे विधान केले आहे. विद्यार्थ्यांसाठी ( किंबहुना कोणत्याही वाचकवर्गासाठी ) लिहिलेल्या पुस्तकांत नामवंत प्राध्यापकांनी अशी दिशाभूल करणारी विवेचन करणे अनिष्ट आहे हे आता स्पष्टपणेच नमूद केले पाहिजे.

परिच्छेद ( २ ) मध्ये लेखक म्हणतात "एवढेच जाताजाता सुचवायचे होते." माझ्या आक्षेपांना लेखकांनी नकळत पुष्टी दिली आहे. सहकार आणि ग्रामीण वित्तपुरवठा या ४८ पानांच्या प्रकरणात प्राथमिक संस्थांचे कर्जवाटप, येणेकर्ज, थकबाकी यासंबंधी आकडेवारी देणारा तक्ता घालता आला नाही यावरून या विषयाबाबतीतीत लेखकांना चटावर श्राद्ध उरकायचे होते असे मानण्यास प्रत्यवाय नसावा. पान ८१ व ८२ वरील मजकुराचा मथळा "प्राथमिक सहकारी संस्थांची राज्यवार परिस्थिती" असा आहे; या दीड पानात थकबाकीच्या प्रश्नाचा थकबाकीचे प्रमाण जास्त होते असे म्हणण्यापलीकडे विस्ताराने परामर्श घेतलेला नाही. लेखक म्हणतात – "या एका मुद्द्याचा विस्तार प्रमाणाबाहेर वाढला असता व या प्रकरणाच्या एकंदर तोलच बिघडला असता." प्राथमिक सहकारी संस्थांच्या थकबाकीच्या समस्येचा इतका त्रोटक विचार करून "सहकार आणि ग्रामीण वित्तपुरवठा" हे प्रकरण पुरे होऊ शकते असा लेखकांचा दृढ विश्वास दिसतो. यावर मी काय लिहावे ?

"ग्रामीण कारागीर आणि ग्रामीण उद्योगधंद्यांना वित्तपुरवठा" या प्रकरणात अखिल भारतीय संस्थांची माहिती देण्याचे प्रयोजन नव्हते. याचे कारण उघड आहे. ते नंतरच्या माझ्या वाक्यात स्पष्टही केले आहे, आय. एफ. सी., आय. सी. आय. सी. आय., आय. आर. सी. या संस्था प्रायः मोठ्या उद्योगधंद्यांना साहाय्य देत आल्या आहेत. लघु व मध्यम उद्योगांसाठी राज्य पातळीवर वित्तीय महामंडळे स्थापन झालेली आहेत. तेव्हा अखिल भारतीय पातळीवरील वित्तीय संस्थांची माहिती ग्रामीण व कुटीरोद्योगांच्या संदर्भात दिली तर काय बिघडले, असा प्रश्न लेखक विचारतात तेव्हा संभ्रम पडतो की लेखकांना परीक्षणातील मुद्दाच समजला नाही की काय ?

गंमत अशी की वर उल्लेख केलेल्या प्राथमिक सहकारी संस्थांच्या कामकाजाबद्दल एखादा तक्ता द्यावा असे सुचविले की सदर प्रकरणाचा तोलच बिघडेल असे लेखक समजतात. पण ग्रामीण वित्त-पुरवठ्याशी अर्थाअर्थी संबंध नसलेल्या अ. भा. वित्तीय संस्थांची माहिती देण्यात पान २५६ ते २६१ अशी पाच पाने खर्ची घालतात.

इति उप्पर माझी टीका लेखकांना संदिग्ध व बिनबुडाची वाटते !

परिच्छेद ( ४ ) मध्ये लेखक प्रश्न विचारतात की "या वित्तीय संस्थाचा अप्रत्यक्ष सुद्धा लाभ ग्रामीण कारागिरांना झाला असण्याची शक्यता नाही या त्यांच्या ( समीक्षकांच्या ) म्हणण्यास आधार काय ?" मुळात अखिल भारतीय वित्तीय संस्था ग्रामीण कारागिरांना वित्तपुरवठा करण्यासाठी स्थापन झालेल्या नाहीत व त्यांच्या वित्तपुरवठ्याचा अशा कारागिरांना लाभ झालेला नाही अशी सूर्यप्रकाशा-इतकीच स्वच्छ वस्तुस्थिती असताना लेखकांनी अ. भा. वित्तीय संस्थांच्या कामगिरीचे वर्णन प्रस्तुत प्रकरणात करणे चुकीचे व वाचकांची दिशाभूल करणारे आहे. तेव्हा असा लाभ ग्रामीण कारागिरांना झाला असेल तर ते दाखविण्याची जबाबदारी लेखकांची आहे. तशी आधारभूत आकडेवारी त्यांनी दिली असती तर मी माझे परीक्षणातील विधान केले नसते. लेखक पुढे म्हणतात : ही माहिती देताना त्याचा लाभ कोणाला झाला हा प्रश्न त्या संदर्भात उपस्थित होत नाही. निरनिराळ्या प्रकरणांतील मजकुरासंबंधीचे लेखकांचे धोरण इतके तर्कहीन असले तर या प्रकरणात जागतिक बँकेच्या कामकाजाचा उल्लेख त्यांनी केला तरी त्यांचे हात कोण धरणार ?

ग्रामीण कारागिरांच्या विकासाच्या संदर्भात बलुतेदार सहकारी संस्थांच्या कामाचा उल्लेख उचित ठरला असता असे परीक्षणात मी म्हटले आहे त्या सूचनेचाही लेखकांनी स्वीकार केलेला नाही.

लेखकांनी भूमिकेत "पुस्तकाची उपयुक्तता वाढण्याच्या दृष्टीने केल्या गेलेल्या सूचनांचे आम्ही स्वागत करू" असे म्हटले आहे. त्यास अनुसरून मी माझ्या परीक्षणात सूचना व टीका केली आहे. लेखकांना माझे परीक्षण म्हणजे "गैरलागू मुद्दे उपस्थित करण्याचा अट्टाहास" वाटतो. मी केलेल्या टीकेत व उपस्थित केलेल्या मुद्द्यांत त्यांना काहीच ग्राह्य वाटत नाही, असे त्यांच्या उत्तरावरून दिसते. परीक्षणात केलेल्या टीकेचा उद्देश पुस्तक अधिक उपयुक्त व्हावे आणि पुढील आवृत्तीत ते अधिक नेटके व्हावे हा होता.

माझ्या परीक्षणाकडे पाहण्याचा लेखकांचा दृष्टिकोन पूर्वग्रह दूषित आहे असा भास होतो. वाचकांनीच पुस्तक वाचून त्यावर व परीक्षणावर मत बनवावे. कळावे,

आपला

**व. श्री. पटवर्धन**

---

## वार्षिक वर्गणी

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्वसाधारण सदस्य आणि अर्थसंवादचे वर्गणीदार यांची वार्षिक वर्गणी ३१ मार्च १९८१ रोजी संपते. तेव्हा त्यांनी १९८१-८२ या वर्षाची वर्गणी ताबडतोब व्यवस्थापकीय पत्त्यावर पाठवून द्यावी अशी विनंती आहे.

**संपादक**

---

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सभासद

१. डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई
२. श्री. संतोष तेंडुलकर, मुंबई
३. प्रा. नी. वि. सोवनी, पुणे
४. डॉ. बी. आर. रायरीकर, मुंबई
५. प्रा. प्रभुराम ज. जोशी, मुंबई
६. श्री. गोविंद तळवलकर, मुंबई
७. डॉ. विष्णु विनायक बोरकर, औरंगाबाद
८. श्री. पांडुरंग वासुदेव गाडगीळ, मुंबई
९. श्री. विनायक राजगुरु, पुणे
१०. श्री. यशवंत सखाराम पंडित, पुणे
११. प्रा. सुरेश धोंडोपंत तेंडुलकर, दिल्ली
१२. प्रा. शामराव नानासाहेब यादव, सातारा
१३. श्री. शशिकांत मनोहर जावडेकर, पुणे
१४. डॉ. विजय लक्ष्मण केळकर, नवी दिल्ली
१५. प्रा. सुभाया पंढरी नाईक, मुंबई
१६. श्री. विवेक गोविंद लिमये, मुंबई
१७. डॉ. वसंत प्रभाकर पेठे, पुणे
१८. प्रा. शरद शंकर जोशी, पुणे
१९. प्रा. परशुराम विनायक पटवर्धन, पुणे
२०. डॉ. आनंद शांताराम नाडकर्णी, पुणे
२१. श्री. रावजी गुलाबचंद गांधी, मुंबई
२२. डॉ. राजाराम गोपाळ पैठणकर, पुणे
२३. प्रा. दे. अ. दाभोलकर, पुणे
२४. प्रा. गंगाधर गोपाळ गाडगीळ, मुंबई
२५. प्रा. जीवराज लुभचंद गांधी, पुणे
२६. प्रा. (श्रीमती) चंद्रा के. दलाया, मुंबई
२७. प्रा. रमेश गजानन पानसे, ठाणे
२८. श्री. विश्वनाथ विनायक देशपांडे, मुंबई
२९. प्रा. (श्रीमती) मीना श्रीकृष्ण आपटे, कोल्हापूर
३०. प्रा. मधुकर दत्तात्रेय देशपांडे, कोल्हापूर
३१. डॉ. स. ह देशपांडे, मुंबई
३२. प्रा. प्रमोद गोविंद ठोंबरे, कोल्हापूर
३३. प्रा. अण्णासाहेब नारायण जोंधळे, नंदुरबार
३४. प्राचार्य गणपती लक्ष्मण अभ्यंकर, मुंबई
३५. प्रा. वि. म. दांडेकर, पुणे
३६. डॉ. नरहर क. कुलकर्णी, सांगली
३७. प्रा. निलकंठ भालचंद्र सप्रे, पुणे
३८. श्री. बिंदुमाधव वाकणकर, मुंबई
३९. प्रा. सुकदेव दामोदर तुपे, श्रीरामपूर
४०. प्रा. (श्रीमती) कुमुदिनी चंद्रकांत देशपांडे, धुळे
४१. प्रा. (श्रीमती) कुमुदिनी वि. दांडेकर, पुणे
४२. प्रा. लक्ष्मण गंगाराम जाधव, पुणे
४३. प्रा. विठ्ठल महादेव रानडे, रत्नागिरी
४४. प्रा. (श्रीमती) वत्सला प्रेमचंद सरवाल, मुंबई
४५. श्री. सुरेश्वर गोस्वामी, मुंबई
४६. डॉ. भालचंद्र रामचंद्र ढेकणे, मुंबई
४७. प्रा. (श्रीमती) सुधा मोकाशी, मुंबई
४८. श्री. अशोक शंकर दांडेकर, मुंबई
४९. प्रा. अशोक गजानन मोडक, डोंबिवली
५०. डॉ. हरि कृष्ण परांजपे, पुणे
५१. प्रा. विनायक रामचंद्र शिरगुरकर, पुणे
५२. प्रा. दिनकर बोरीकर, औरंगाबाद
५३. प्रा. नारायण अनंत मावळंकर, पुणे

५४. श्री. मधुकर अनंत वाकरे, मुंबई
५५. प्रा. माणिकराव तुकाराम पवार, पुणे
५६. प्रा. वि. सी. जोशी, औरंगाबाद
५७. प्रा. सुहास रामचंद्र जोगळेकर, पुणे
५८. प्राचार्य एव्. व्ही. कौण्डिण्य, संगमनेर
५९. डॉ. मो. वा. तथा वसंत पटवर्धन, पुणे
६०. प्रा. मुकुंद सिद्धेश्वर महाजन, पुणे
६१. डॉ. पी. आर. ब्रह्मानंद, मुंबई
६२. प्राचार्य वसंत कृष्ण तुळकर, पुणे
६३. प्रा. वामनराव चोरघडे, नागपूर
६४. प्रा. जयकुमार फाजगौडा पाटील, सांगली
६५. डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे, नागपूर
६६. प्रा. खाँजासाहेब घुडुलाल पठाण, सांगली
६७. प्रा. संतोष रामचंद्र दास्ताने, पुणे
६८. डॉ. श्रीनिवास लक्ष्मण लोकरे, नागपूर
६९. प्रा. डॉ. दि. व. केरूर, पुणे
७०. श्री. सी. पं. खेर, धारवाड
७१. श्रीमती मंगला जयवंत मसुरकर, मुंबई
७२. प्रा. मोरेश्वर सदाशिव भावे, जळगाव
७३. प्रा. विजय प्रभाकर परांजपे, पुणे
७४. श्रीमती विद्या केशव साठे, पुणे
७५. श्रीमती रेखा दिलीप आपटे, पुणे
७६. श्रीमती विद्या रत्नाकर कुलकर्णी, पुणे
७७. श्रीमती अमरजा नेरूरकर, मुंबई
७८. डॉ. विठ्ठलराव बापूराव घुगे, कोल्हापूर
७९. प्रा. मनोहर दत्तात्रेय पाध्ये, औरंगाबाद
८०. प्रा. सदानंद वर्दे, मुंबई
८१. प्रा. (श्रीमती) कृष्णा भारद्वाज, नवी दिल्ली
८२. प्रा. जयंत सदाशिव राईलकर, मुंबई
८३. प्रा. वासुदेव यशवंत कोल्हटकर, पुणे
८४. प्रा. वसंतराव तातोबा चौगुले, सांगली
८५. प्रा. भगवान सोनाजीराव म्हस्के, औरंगाबाद
८६. डॉ. गि. सो. कल्याणकर, औरंगाबाद
८७. प्रा. चन्द्रकान्त केळकर, मुंबई
८८. प्रा. एस्. डी. बाळ, मुंबई
८९. प्रा. रामराव कृष्ण शिंदे, सातारा कॅम्प
९०. डॉ. श्यामसुंदर हरिदासजी जाजनुधिया, खामगाव
९१. डॉ. (श्रीमती) प्रिया वि. मुतालिक-देसाई, मुंबई
९२. प्रा. सी. टी. येवलेकर, मुंबई
९३. प्रा. नारायण शंकर आंबर्डेकर, सांगली
९४. डॉ. प्रभाकर रघुनाथ जोशी, मुंबई
९५. डॉ. गोविंद जिवाजी खुदानपूर, पुणे
९६. डॉ. जी. व्ही. कामत-हेलेकर, पणजी
९७. प्रा. जी. एम्. राजर्षि, मुंबई
९८. प्रा. दिनकर हरि महाजन, जळगाव
९९. प्रा. रघुनाथ शांताराम ओक, धुळे
१००. प्रा. रामकृष्ण दयाराम राणे, जळगाव
१०१. प्रा. या. शि. महाजन, जळगाव
१०२. डॉ. रंगनाथ भारद्वाज, मुंबई
१०३. प्राचार्य जे. जे. जोशी, जळगाव
१०४. डॉ. वसंत मार्तंड जासूडे, मुंबई
१०५. श्री. ए. डी. भोरकर, मुंबई
१०६. डॉ. अरुण प्रभाकर कुलकर्णी, पुणे
१०७. प्रा. अशोक देविदास गाढवे, बार्शी
१०८. डॉ. भगवंत नागेश दातार, मुंबई

■ ■

'अर्थसंवाद' या त्रैमासिक नियतकालिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

## फार्म ४ : नियम ८ अनुसार

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | — मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४. |
| २. | नियतकाल | — त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | — रवींद्र स. सबनीस |
| | राष्ट्रीयत्व | — भारतीय |
| | पत्ता | — ए-१४, आंबेकर नगर, परळ, मुंबई ४०० ०१२. |
| ४. | मुद्रणस्थळ | — महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, ९१५/१, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. |
| ५. | प्रकाशकाचे नाव | — वरीलप्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | — आनंद शांताराम नाडकर्णी |
| | राष्ट्रीयत्व | — भारतीय |
| | पत्ता | — ए-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी, एरंडवणे, पुणे ४११ ००४. |
| ७. | मालकाचे नाव | — मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४. |

मी रवींद्र स. सबनीस असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**रवींद्र स. सबनीस**
प्रकाशक मुद्रक